Kavikulaguru
Kalidas Sanskrit University,
Ramtek, Dist. Nagpur (MS)

NAAC Accredited - A+

Annual Report
2023 - 2024

Dt. 01-04-2023 to 31-03-2024

KKSU... Marching ahead under the Visionary leadership of
Hon'ble VC Prof. Hareram Tripathi

Hon'ble VC Prof. Tripathi A warm Greeting to Hon'ble Governor of Maharashtra & Chancellor of university **Shri. Rameshji Bais** - 24.06.23

Twelfth Convocation Ceremony 06.03.24

Hon'ble Governor Shri Ramesh Bais delivering the speech

Inauguration of Jnaneshwar Bhavana & Dr. Kamalakar Totade Hall 19.01.24

Hon'ble Shri Nitinji Gadkari inaugurating the Jnaneshwar Bhavana & Dr. Kamalakar Totade Hall, Respected **Mrs Kanchantai Gadkari, Hon'ble VC Prof Hareram Tripathi, Hon'ble VC Prof Shrinviasa Varakhedi & Hon'ble Former VC Prof Uma Vaidya & Hon'ble MLA Shri Ashish Jaiswal** were present

मा. श्री. रमेश बैस

महामहिम राज्यपाल
व
विश्वविद्यालयाचे मा. कुलपती
(१८.०२.२०२३ ते ३०.०७.२०२४)

मा. श्री. सी.पी.राधाकृष्णन्

महामहिम राज्यपाल
व
विश्वविद्यालयाचे मा. कुलपती
(३१.०७.२०२४ ते ११.०९.२०२५)

मा. श्री. आचार्य देवव्रत

महामहिम राज्यपाल
व
विश्वविद्यालयाचे मा. कुलपती
(१२.०९.२०२५ - .....)

चरैवेति चरैवेति...!

सत्र 2023–24 चा वार्षिक अहवाल आपल्यासमोर सादर करताना मला आनंद होत आहे. विश्वविद्यालयाने रजतमहोत्सव दिमाखदारपणे साजरा केला. विश्वविद्यालयाच्या रजत महोत्सवानिमित्ताने विविध प्रकारचे 100 हून अधिक कार्यक्रम संपन्न झाले. रजतोत्सवानिमित्ताने शैक्षणिक, संशोधन प्रगतीचा आलेख सादर करणे हे माझ्यासाठी अभिमानाचे आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे विश्वविद्यालयाला श्रेणी दोन मध्ये स्थान देण्यात आले असून, त्या अंतर्गत नियमातंर्गत स्वायत्तता विद्यापीठाला काही बाबतीत प्राप्त झाली आहे. याशिवाय सिंगापूरच्या अरबिंदो फाउंडेशनद्वारे विद्यापीठाला सर्वोत्तम अभ्यासक्रमांकरिता द प्रोग्रेस ग्लोबल ॲवॉर्ड 2023 प्राप्त झाला आहे. तसेच इंडिया टुडे या प्रतिष्ठानाद्वारे केलेल्या सर्वेक्षणातून संस्कृत विद्यापीठांमधून दुसरे आणि सर्व विद्यापीठांमध्ये 39 वे स्थान विश्वविद्यालयाने प्राप्त केले आहे, हे साभिमान नमूद करतो.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 नुसार सर्व अभ्यासक्रम तयार करण्यात आले असून, त्याची अंमलबजावणी सर्व स्तरांवर झाली आहे. या सत्रापासून बीसीए अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असू त्याला भारतीय तंत्रविज्ञान परिषदेची आणि राज्यशासनाची मान्यता मिळाली आहे. सर्व शैक्षणिक विभागांचे अंकेक्षण पूर्ण झाले आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावर नेपाळ संस्कृत विद्यापीठाशी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

विद्यापीठाला या वर्षात 6 नवे संशोधन प्रकल्प प्राप्त झाले आहेत. विद्यापीठाद्वारे भारतीय भाषा समितीच्या संयुक्त विद्यमाने अनुवाद कार्यशाळा आणि ध्येय वाक्य कार्यशाळा यांचे आयोजन करण्यात आले होते. विविध परिषदा, सेमिनार, कार्यशाळा, प्राध्यापक प्रशिक्षण कार्यशाळा आणि विविध कार्यक्रमांकरिता विविध राष्ट्रीय संस्थांद्वारे 52 लाख निधी प्राप्त झाला आहे.

विद्यापीठाचे गेल्या 10 वर्षांचे एजी ऑडिट पूर्ण झाले असून, 2023–24 या वर्षात विद्यापीठाला विविध पायाभूत सुविधांसाठी राज्यशासनाद्वारे जवळपास 70 कोटी प्राप्त झाले आहेत. तसेच संशोधक छात्रांसाठी विशेष छात्रावास आणि दीक्षांत समारोहासाठी विशेष सभागृहाचे उद्घाटन करण्यात आले.

विश्वविद्यालयाचे रत्नागिरी उपकेंद्र विविध नवनवीन अभ्यासक्रमांचे परिचालन, सामंजस्य करार , विविध कार्यक्रम, सेमिनार, परिषदा आणि प्राध्यापक प्रशिक्षण वर्ग याद्वारे आपला कार्यविस्तार वृद्धिंगत करीत आहे. विश्वविद्यालयाच्या मुक्त व दूरस्थ केंद्राद्वारे 38 अभ्यासक्रमांचे परिचालन केले जाते आज देशभरातील विद्यार्थी या केंद्राद्वारे विविध अभ्यासक्रमांचे अध्ययन करीत आहे.

विश्वविद्यालयाच्या विकासात मोलाचे योगदान देणारे सर्वच प्राध्यापक, कर्मयोगी आणि विद्यार्थी हे राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध पुरस्कार, प्रशंसा प्राप्त करीत असतात. हा विश्वविद्यालयाचा गौरव आम्हाला सतत चरैवेति चरैवेति ची प्रेरणा देत असतो.

प्रो. हरेराम त्रिपाठी

कुलगुरू

विश्वविद्यालयगीतम्

शतशतकोटिशरत्पर्यन्तम्
प्रवहतात् संस्कृतमन्दाकिनी ।।धृ।।

सिन्धु-शुतुद्री-सरस्वतीनाम्
तटे ऋषीणां ध्यानपराणाम्
होमधूमपावितलोकानाम्
अत्रिभृगूणां छन्दोवाणी ।।१।।
प्रवहतात् .....

वाल्मीकिमुनि-व्यासविरचिता
रामकृष्णयोः पावन-गाथा
अखण्डदीपो भगवद्गीता
कर्मयोगसंदेशवाहिनी ।।२।।
प्रवहतात् .....

राष्ट्रैक्यस्य च महती स्फूर्तिः
विना संस्कृतं नैव संस्कृतिः
पुष्टिं तुष्टिं समावहन्ती
इह परत्र कल्याणकारिणी ।।३।।
प्रवहतात् .....

रचयिता - महाकवि डॉ. ग. बा. पळसुले

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद् (नॅक) द्वारा

A+ श्रेणी प्राप्त

वार्षिक अहवाल

2023 –24

(अहवाल कालावधी – दि. 01 एप्रिल 2023 ते 31 मार्च 2024)

Kavikulaguru Kalidas Sanskrit University

Ramtek Office : Administrative Building, Mouda Rd., Ramtek 441 106, Dist. Nagpur (M.S.)

Nagpur Office : N.I.T. Sankul, 5th & 6th Floor, Near Morbhavan, Sitabuldi, Nagpur-440012 (M.S.)

Ramtek : (O) Ph.No. : (07114) 256476 Fax : (07114) 255549

Nagpur : (O) Ph.No. : (07114) 2560992 Fax : (07114) 2560992

Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac

Email :registrar@kksu.org

कविकुलगुरू–कालिदास–संस्कृत–विश्वविद्यालयः, रामटेकम्

वार्षिक अहवाल

ANNUAL REPORT

(2023-2024)

Editor in Chief : Hon'ble Vice-Chancellor,
Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Committee

Prof. Harekrushna Agasti	-	Chairperson
Dr. Amol Mandekar	-	Member
Dr. Aashish J.	-	Member
Dr. Renuka Bokare	-	Member Secretary
Dr. Shweta Sharma	-	Special Invitee
Ms. Shrivarda Malge	-	Special Invitee

Published by : **Registrar**
Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Copyright @ KKSU

Coverpage - Paper 250 gsm

Inner Page - Maplitho 70 gsm / Art Paper 120 gsm

Size - A4

Printed at : M/s.

Kavikulaguru Kalidas Sanskrit University
Ramtek Office : Administrative Building, Mouda Rd., Ramtek 441 106, Dist. Nagpur (M.S.)
Nagpur Office : N.I.T. Sankul, 5th & 6th Floor, Near Morbhavan, Sitabuldi, Nagpur-440012 (M.S.)
Ramtek : (O) Ph.No. : (07114) 256476 Fax : (07114) 255549
Nagpur : (O) Ph.No. : (07114) 2560992 Fax : (07114) 2560992
Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac
Email :registrar@kksu.org

अनुक्रमणिका

	पृष्ठ क्रमांक मराठी	इंग्रजी
• **मा. कुलगुरू यांचे मनोगत**		
• **विश्वविद्यालयाविषयी.....**	**5**	
• **व्यवस्थापन परिषद् सदस्यांची यादी**	**7**	
• **विद्वत्परिषद् सदस्यांची यादी**	**9**	
• **विभागनिहाय अहवाल**		
○ वेद तथा व्याकरण विभाग	13	161
○ संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग	24	175
○ भारतीय दर्शन विभाग	32	184
○ वेदांग ज्योतिष विभाग	38	190
○ शिक्षणशास्त्र विभाग	49	201
○ प.पु.गोळवलकरगुरूजी शैक्षणिक परिसर	53	204
○ अभिनवभारती वारंगा परिसर	57	209
○ रत्नागिरी उपकेन्द्र	68	221
○ मुक्ताध्ययनपीठम्	76	231
○ शिक्षण महाविद्यालय	82	238
○ संगणक विज्ञान विभाग	85	242
○ सामाजिक विज्ञान विभाग	87	246
○ लोकप्रशासन विभाग	88	248
• **विस्तार सेवा अहवाल**		
○ विस्तार सेवा मंडळ	89	
○ राष्ट्रीय सेवा योजना	94	250
○ छात्र कल्याण	101	259
○ आउटरिच कक्ष	111	270
○ भरतमुनी ललितकला केन्द्र	115	273
○ महिला कक्ष आणि अंतर्गत तक्रार समिती	117	
○ सांख्यिकी विभाग	118	275
• **प्रशासकीय अहवाल**		
○ आस्थापना विभाग	119	276
○ सामान्य प्रशासन विभाग	123	280
○ विद्यापीठ विकास व नियोजन मंडळ	125	282
○ विद्या विभाग	129	287
○ महाविद्यालय विभाग	138	298
○ वित्त विभाग	139	299
○ अभियांत्रिकी विभाग	140	300
○ ग्रंथालय	143	303
○ प्रकाशन विभाग	156	316
○ जनसंपर्क कक्ष	158	316
• **विश्वविद्यालयातील विशेष उपक्रम आणि उपलब्धी**		**319**

संस्कृतविषयी.....

संस्कृत ही भारताच्या अनमोल ठेवा असणाऱ्या प्राचीन ज्ञानभांडाराच्या ज्ञानप्राप्तीची एकमेव व म्हणूनच अतिशय महत्त्वपूर्ण भाषा आहे. संस्कृत म्हणजे ज्ञानवारसा संक्रमित, संरक्षित व संवर्धित करणारी भाषा! . प्राचीन काळीही नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला अशी नावाजलेली विद्यापीठे भारतात होती. या विद्यापीठांद्वारेच पाणिनी, पतंजली, कौटिल्य यांच्यासारखे स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या, ग्रंथकर्तृत्वाच्या जोरावर चिरायु कीर्ती मिळवणारे विद्वान निर्माण झाले. हा अभिमानास्पद व तेजोमय ज्ञानवारसा जतन व वृद्धिंगत करण्यासाठी संस्कृत भाषेचे अध्ययन करणे अनिवार्य आहे. म्हणूनच संपूर्ण भारतात संस्कृतचा प्रचार, प्रसार व्हावा याकरिता एकूण 15 संस्कृत विश्वविद्यालये कार्यरत आहेत.

भारतातील संस्कृत विश्वविद्यालये

- संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी (उत्तरप्रदेश)
- श्री जगन्नाथ संस्कृत विश्वविद्यालय, पुरी (ओरिसा)
- राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालय, तिरुपती (आंध्र प्रदेश)
- **कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक (महाराष्ट्र)**
- श्री शंकराचार्य संस्कृत विश्वविद्यालय, कालडी (केरळ)
- लालबहादूर शास्त्री संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली
- कामेश्वर संस्कृत विश्वविद्यालय, दरभंगा (बिहार)
- केन्द्रीय संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली
- जगद्गुरू रामानंद आचार्य संस्कृत विश्वविद्यालय, जयपूर (राजस्थान)
- सोमनाथ संस्कृत विश्वविद्यालय, (गुजरात)
- महर्षी पाणिनी संस्कृत विश्वविद्यालय, उज्जैन(मध्यप्रदेश)
- उत्तराखंड संस्कृत विश्वविद्यालय, हरिद्वार(उत्तराखंड)
- कर्नाटक संस्कृत विद्यापीठ, बंगलोर (कर्नाटक)
- कुमार भास्कर वर्मा संस्कृत व प्राचीन शिक्षा विद्यापीठ, नालबारी (आसाम)
- वेंकटश्वर वैदिक विद्यापीठ, तिरुपती (आंध्रप्रदेश)
- महर्षि वाल्मिकी संस्कृत विश्वविद्यालय, कैथाल (हरियाणा)
- कोलकत्ता संस्कृत विश्वविद्यालय, कोलकत्ता (पश्चिम बंगाल)

***

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

महाराष्ट्र शासनाने दि. 18 सप्टेंबर 1997 रोजी नागपूर जिल्हयातील रामटेक येथे महाकवी कालिदासाच्या चिरस्मरणार्थ कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाची स्थापना केली. महाकवी कालिदासाच्या अभिधानाने स्थापन झालेले हे महाराष्ट्रातील एकमेव संस्कृत विश्वविद्यालय असून या विश्वविद्यालयाला महाराष्ट्र व गोवा येथील शैक्षणिक संस्थांना संलग्नीकरण देण्याचा अधिकार आहे.

The Government of Maharashtra took up the issue and appointed a committee comprising of Sanskrit scholors and other educationists. On the basis of the report of the committee the State Government established the Sanskrit University at Ramtek and named it as Kavikulaguru Kalidas Sanskrit University. The University was established on 18th September 1997. The place Ramtek, which is a township in Nagpur district, was selected because it is connected to the name of great poet of the world Kavikulaguru Kalidas. This is the only Sanskrit University in Maharashtra. This university has right to give affiliation to other Educational Institutes within Maharashtra & Goa.

***

संकाय व शैक्षणिक विभाग

Sankayas (Faculties) & Teaching Departments

विभागांची यादी – अधिसूचना क्र – ककासंवि/विद्या/२०२२/९२, दि. २८.०७.२०२२ नुसार

अ. क्र.	संकाय	विभाग		
१	वेद विद्या संकाय	वेद आणि वैदिक विज्ञान विभाग	व्याकरण विभाग	————
२	संस्कृत तथा संस्कृतेत्तर भाषा संकाय	संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग	आधुनिक भाषा विभाग	पाली प्राकृत आणि इतर भारतीय भाषा विभाग
३	भारतीय धर्म तत्वज्ञान संस्कृती संकाय	भारतीय दर्शन विभाग	योग विज्ञान आणि समग्र आरोग्य विभाग	————
४	प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्र संकाय	वेदांग ज्योतिष विभाग	प्राचीन भारतीय वास्तुकला विभाग	संगणक विज्ञान विभाग
५	शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विज्ञाशाखा संकाय	शिक्षणशास्त्र विभाग	वाणिज्य आणि व्यवस्थापन विभाग	————

S.N.	Faculties	Department		
1	Faculty of Vedic Studies	Department of Veda & Vedic Science	Department of Vyakarana	--------
2	Faculty of Sanskrit and Other Languages	Department of Sanskrit Language and Literature	Department of Modern Language	Department of Pali, Prakrit and Indian Languages
3	Faculty of Indian Religion, Philosophy and Culture	Department of Bhartiya Darshana	Department of Yogic Sceince and Holistic Health	--------
4	Faculty of Ancient Indian Science and Humanities	Department of Vedanga Jyotish	Department of Ancient Indian Architecture	Department of Computer Science
5	Facult of Education and Other Branches of Learning	Department of Education	Department of Commerce & Management	--------

* * *

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Management Council (2023-2024)

Sr		Details	Name of the Person	Position
01	**25(2)(i)**	Kulaguru–Adhyaksha	**Prof. Hareram Tripathi** Hon'ble Vice-Chancellor KKSU, Ramtek	Chairman
02	**25(2)(ii)**	Sama-Kulaguru-Sadasya	Vacant	Ex-officio Member
03	**25(2)(iii)**	One Adhishthata as prescribed by Statutes	**Prof. Kavita Holey** Department of Sanskrit Sahitya, KKSU, Ramtek	Member
04	**25(2)(iv)**	One Person nominated by the Kuladhipati preferably from amongst the members of the Sanskrit SthayiSamiti of the Government of Maharashtra.	**Prof.Amba Kulkarni** Department of Sanskrit Studies University of Hyderabad	Member
05	**25(2)(v)**	One member of the Maharashtra Legislative Assembly to be nominated by the Speaker of the Maharashtra Legislative Assembly.	**Shri. Sameer Meghe** MLA	Member
06	**25(2)(vi)**	One member of the MLC to be nominated by the chairman of the MLC	**Shri. Sudhakar Adabale** MLC	Member
07	**25(2)(vii)**	The Secretary, Higher Education or his nominee not below the rank of Deputy Secretary	**Principle Secretary** Higher Education	Member
08	**25(2)(viii)**	The Director of Higher Education or his nominee not below the rank of Joint Director of Higher Education	**Director,** Higher Education, Pune	Member
09	**25(2)(ix)**	One Head of the University Department as prescribed by statutes	**Prof. Parag Joshi** Sanskrit And Sanskrit Literature, KKSU, Ramtek	Member
10	**25(2)(x)**	One Head of a college, institute, or Pathashala as prescribed by statutes.	**Dr. Bhau Dandade, (I/C),** Principal, CISFA College, Nagpur	Member
11	**25(2)(xi)**	One teacher from the University Departments as Prescribed by statutes.	**Prof. Lalita Joshi,** Department of Education, KKSU, Ramtek	Member

12	**25(2)(xii)**	One teacher who is not principal from amongst the teacher of the affiliated colleges and recognised institutions with ten year teaching experience as prescribed by statutes.	Vacant	Member
13	**25(2)(xiii)**	One Adhyaksha of Adhyayan Mandala as prescribed by statutes	**Prof. Dinkar Marathe,** Dean, Faculty of Ancient Indian Science and Humanities, KKSU, Ramtek	Member
14	**25(2)(xiv)**	One member of the Vidvat Parishad nominated by the Kulaguru	**Prof. Madhusudan Penna** Dean, Faculty of Indian Religion, Philosophy and Culture, KKSU, Ramtek	Member
15	**25(2)(xv)**	Sanchalaka – Niyojana-Vikasa Mandala	**Dr. Prasad Gokhale** (I/C), BPD, KKSU, Ramtek	Ex-officio Member
16	**25(3)**	Kulasachiva – Secretary	**Prof. Krushkumar Pandey,** KKSU, Ramtek	Ex-officio Member
17	**25(4)**	Vitta-Lekha Adhikari	**Prof. Kavita Holey** Finance Officer,KKSU, Ramtek	Permanent Invitees
18	**25(4)**	Pariksha Niyantraka	**Dr. Jaywant Chaudhari, (I/C)** Controllar of Examination KKSU, Ramtek	Permanent Invitees

*** * ***

Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek
Academic Council (2023-24)

Sr. No.	Clause	Provisions	Name of the members
1	27 (2) (a)	The *Kulaguru*– Chairman	Prof Madhusudan Penna (10-06-2022 to 06-06-2023) Prof. Hareram Tripathi (from 07.06.2023 onwards)
2	27 (2) (b)	The *Sama-Kulguru*	--
3	27 (2) (c)	The *Adhishthatas* of the *Sankayas*:	
		1. *Faculty of Vedic Studies*	Prof. Harekrushna Agasti
		2. *Faculty of Sanskrit and other Languages*	Prof. Kavita Holey
		3. Faculty of Indian Religion, Philosophy and Culture	Prof. Madhusudan Penna
		4. Faculty of Ancient Indian Sciences & Humanities	Prof. Krishnakumar Pandey
		5. Faculty of Education and other Branches of Learning	Prof. Lalita Chandratre
4	27 (2) (d)	The *Adhyakshas* of the *Adhyayan Mandalas*:	
		1. Adhoc Board of Studies for Veda	Dr. Jaywant Choudhari
		2. Adhoc Board of Studies for Vyakarana	Prof. Harekrushna Agasti
		3. Adhoc Board of Studies for Sanskrit Language and Literature	Prof. Kavita Holey
		4. Adhoc Board of Studies for Pali Prakrit and other Classical Languages & Literature	Dr. Rajendra C. Jain
		5. Adhoc Board of Studies for Modern Languages and Literature	Prof. Parag Joshi
		6. Adhoc Board of Studies for Kirtanshastra	Dr. Dinesh Rasal
		7. Adhoc Board of Studies for *Darshanashastra*	Prof. Kalapini Agasti
		8. Adhoc Board of Studies for Yoga and Alternative Therapies	Prof. KalapiniAgasti
		9. Adhoc Board of Studies for Visual Arts	Dr. Bhau Dandade
		10. Adhoc Board of Studies for Performing Arts	Dr. Sandhya Purecha
		11. Adhoc Board of Studies for Vedang Jyotish and Vastushastra	Dr. Dinakar Marathe
		12. Adhoc Board of Studies for Psychology	Dr. Sai Susarla
		13. Adhoc Board of Studies for Computer Science and Application	Dr. Vilas Mahatme
		14. Adhoc Board of Studies for Traditional Indian Sciences	Prof. Prasad Gokhale
		15. Adhoc Board of Studies for Administrative Services	Prof. Harekrushna Agasti

Sr. No.	Clause	Provisions	Name of the members
		16. Adhoc Board of Studies for Education	Prof. Kirti Sadar
		17. Adhoc Board of Studies for Hospitality Studies &Travel & Tourism	Dr. Urvashi Yashraoy
		18. Adhoc Board of Studies for Library & Information Science	Dr. Deepak Kapade
		19. Adhoc Board of Studies for Commerce & Business Administration	Dr. Shrinivas Manekar
		20. Adhoc Board of Studies for Social Science and Social work	Dr. Gopichand Nimbarte
		21. Adhoc Board of Studies for Journalism Media & Communication	Dr. Rakhi Tiwari
		22. Adhoc Board of Studies for Skill Oriented Program	Dr. Amol Mandekar
	27 (2) (e)	The *Sanchalaka* of the *Vistar Seva Mandal*	Prof. Krushnakumar Pandey
	27 (2) (f)	One principal each of the conducted or affiliated colleges, institutions or *pathashalas* to be nominated by rotation.	Dr. Sikander Manware
	27 (2) (g)	One professor from amongst the professors in the university departments or institutions, nominated by the *Kulaguru*	Dr. Dharmendra Turkar
	27 (2) (h)	One teacher representing each faculty to be coopted by the *Vidvat-Parishad* from amongst the teachers having not less than 10 years teaching experience, other than Principals of colleges, Heads of university departments and Heads of recognized institutions.	1) Dr. Rajshree Meshram 2) Prof. Prasad Gokhale
	27 (2) (i)	One head of an academic services unit of the university, nominated by the *Kulaguru.*	Dr. Rajshree Meshram
	27 (2) (j)	Two scholars nominated by the *Kuladhipati*from amongst the Sanskrit institution in the State.	1. Prof. Prasad Joshi
			2. Prof. Mahavir Agrawal
	27 (2) (k)	Two eminent Sanskrit scholars nominated by the *Kulaguru*	Dr. Manmohan Upadhyaya Dr. Lalitkumar Tripathi
	27 (2) (l)	The Director of Higher Education, Maharashtra State or his nominee not below the rank of Joint Director, Higher Education or his nominee.	Dr. Santosh Chavan
	27 (2) (m)	Honorary Sanskrit Organizer, if any, of the Government of Maharashtra	Vacant
	27 (3)	The *Kulasachiva* shall act as the Secretary.	Prof. Krushnakumar Pandey

* * *

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Board of Planning and Development

Committee Member List (2023-24)

Sr. No.		Members Name	Position
1	Kulaguru-Adhyaksha	**Prof. Hareram Tripathi,** Hon'ble Vice-Chancellor.	Chairperson
2	Sama-Kulaguru if any (The Pro-Kulaguru)	----	Member
3	One Dean of Faculty, nominated by the Vidvat Parishad	**Dr. Madhusudan Penna,** Dean, Faculty of Bharatiya Dharma, Tattvajanana tatha Sanskrit Sankay, KKSU, Ramtek	Member
4	One Head or Director from amongst the Heads or Directors of the University Institutions or departments, not below the rank of Professor and who is not a Dean nominated by Vidvat Parishad.	**Dr. Dinakar Marathe,** HoD, Vedanga Jyotisha Department, KKSU, Ramtek.	Member
5	One teacher imparting post-graduate instruction having not less than sixteen years of teaching experience, nominated by Kulaguru.	**Dr. Kavita Holey,** Professor, Faculty of Sanskrit and other Languages, KKSU, Ramtek.	Member
6	One teacher imparting under-graduate institution having not less than sixteen year of teaching experience, nominated by Vyavasthapana Parishad.	**Dr. Parag Joshi,** HoD, Department of Adhunik Bhasha, KKSU, Ramtek.	Member
7	One principal of an affiliated College of Sanskrit, nominated by the Vyavasthapana Parishad from among the principal who are members of the Vidvat Parishad.	**Dr. Rajashri Meshram,** Principal, Kalidas University's B.Ed. College, Ramtek.	Member
8	One principal of an affiliated professional College nominated by Kulaguru.	**Dr. Sandhya Purecha,** Principal, Sarfojiraje Bhosale Research Centre, Dadar, Mumbai.	Member
9	Two experts, co-opted by the Board from amongst the Heads of National and State Level research institutions.	**Dr. C. G. Vijayakumar,** Vice-chancellor, Maharshi Panini Sanskrit Evam Vaidik University, Ujjain.	Member
10		**Dr. Sacchidanand Mishra ,** Member, ICPR, New Delhi.	Member
11	Sanchalaka of Niyojana-Vikasa Mandala-Member Secretary.	**Dr. Prasad Gokhale,** Director (I/c), B.P.D., Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek.	Member Secretary

* * *

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Board of Examination

Sr. No	Name	Position
01	**Prof. Hareram Tripathi** Ho'Vice Chancellor Kavikulaguru Kalidas Sanskrit Vishwavidyalay, Ramtek	Chairman
02	**Dr. Madhusudan Penna** Dean, Faculty of Indian Religion, Philosophy & Culture Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
03	**Dr. Krishnakumar Pandey** Dean, Faculty of Ancient Indian Science and Humanities Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
04	**Dr. Lalita Chandratre** Dean, Faculty of Education and Sankirna Vidya shakha Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
05	**Prof. Kavita Holey** Dean, Faculty of Sanskrit Tatha Sanskritetar Bhasha sankay Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
06	**Prof. Harekrishna Agasti** Dean, Faculty of Vedvidya sankay Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
07	**Prof. Rajeshree Meshram**, Principal Kalidas College of Education Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
08	**Prof. Prasad Gokhale**, Vedang Jyotish Department Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
09	**Hon'ble Joint Director** (Higher Education) Nagpur Division, Nagpur	Member
10	**Dr. Jywant Choudhari** Controller of Examination	Secretary

* * *

वेद तथा व्याकरण विभाग

स्थापना – वर्ष 2000

संकाय – वेदविद्या संकाय

अभ्यासक्रम – एम्. ए., एम्. फिल्., पीएच्.डी. शास्त्री, आचार्य तथा विद्यावारिधी इ. (वैदिक साहित्य, व्याकरणशास्त्र)

अधिष्ठाता – डॉ. हरेकृष्ण अगस्ती, प्राध्यापक

विभाग प्रमुख – डॉ. हरेकृष्ण अगस्ती, प्राध्यापक

सहायक प्राध्यापक – डॉ. शिवराम भट्ट (लिनवर), डॉ. जयवंत चौधरी, प्रा. अमित भार्गव, डॉ. सुकांत प्रामाणिक, डॉ. पंकज भोई

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 08

उद्देश –

- प्राचीन वैदिक साहित्याचे अध्ययन–अध्यापन व संशोधन करणे.
- आधुनिक विज्ञान वा अन्य शाखांशी वैदिक साहित्याचे आंतरविद्याशाखीय अध्ययन व संशोधन करणे.
- वेदांगांचे अध्ययन व संशोधन करणे.
- व्याकरणशास्त्राचे पारंपरिक गुरूकुल पद्धतीने अध्यापन व संशोधन करणे.
- शास्त्रांचे संरक्षण, संवर्धन व नवीन पिढीत संक्रमण करणे.
- संस्कृत संभाषण शिबिरांच्या माध्यमातून संस्कृत भाषेचा प्रचार, प्रसार करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- नव्य आणि प्राचीन व्याकरणावर आधारित संशोधनास प्रोत्साहन देणे.
- संस्कृत व्याकरणाच्या दुर्मीळ हस्तलिखितांचे विद्यावारिधी पदवीसाठी संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे.
- विभागातील प्राध्यापकांचे महद् संशोधन प्रकल्पासाठी योगदान.
- गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी तज्ज्ञ विद्वज्जनांची व्याख्याने पीएच्.डी संशोधनासाठी आयोजित करणे.
- व्याकरणाचे शास्त्रीय ग्रंथ ई–पुस्तक स्वरूपात उपलब्ध करवून देणे.
- आंतरविद्याशाखीय संशोधनास प्रोत्साहन देणे.
- वर्तमानयुगातील गरजा लक्षात घेवून संशोधनक्षेत्रातील अद्ययावत ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने संशोधक छात्रांसाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करणे.

वेद तथा वैदिक विज्ञान विभाग

—: वेद तथा वैदिक विज्ञान विभागाद्वारे २०२३ —२४ मध्ये घेण्यात आलेले कार्यक्रम यज्ञांचे विवरण :—

१. गुरुपौर्णिमा :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**
ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **०३/०७/२०२३**
सहभागी :— **२५ विद्यार्थी व शिक्षक**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे दि. ०३ जुलै २०२४ रोजी **गुरुपौर्णिमेनिमित्त व्यासपूजन यज्ञाचे आयोजन** करण्यात आले होते. सदर यज्ञ पूजन विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरु, प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या हस्ते करण्यात आले. या यज्ञाकरिता विश्वविद्यालयातील मा. कुलसचिव, डॉ. रामचंद्र जोशी, प्रो. प्रसाद गोखले, प्रो. पराग जोशी, डॉ. राघवेंद्र भट्ट, डॉ. सचिन द्विवेदी, डॉ. राकेश रोशन, प्रा. पंकज भोई, डॉ. राजेंद्र मेश्राम, डॉ. आशिष जे, डॉ. किंजल गोर्फाड, डॉ. श्वेता शर्मा, डॉ. श्रीनीवास जे व वेद विभागप्रमुख, डॉ. जयवंत चौधरी प्रामुख्याने उपस्थित होते. यज्ञ वैदिक मंत्रांचे वाचन डॉ. अमित भार्गव, डॉ. निशांत मिश्रा व वेद विभागाचे विद्यार्थी यांनी केले.

२. आयुष्य याग :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**
ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **०१ ऑगस्ट २०२३**
सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे दि. ०१/०८/२०२३ रोजी विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरू, प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या जन्मदिवसानिमित्त आयुष्य प्राप्ती साठी विविध देवतांचा पूजन व यज्ञ करण्यात आले. या यज्ञात वेदांचा निर्माण, पूजन सामग्री संकलन, स्वस्तिवाचन इ., दिग्रक्षण, प्रधान संकल्प, गणेश अंबिका पूजन, नवमग्रह: इ. देवतांचा पूजन, कलश इ. पूजन, प्रधानदेव पूजा, आचार्य ऋत्विक पूजा, कुंड पूजा, कुश—कंडिका या सर्व देवतांचे वैदिक मंत्रांनी पूजन करण्यात आले. या यज्ञाकरिता विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरू, प्रो. हरेराम त्रिपाठी, मा. कुलसचिव, प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, प्रो. कविता होले, प्रो. प्रसाद गोखले. प्रो. हरेकृष्ण अगस्ती, प्रो. प्रसाद गोखले, प्रो. पराग जोशी, डॉ. जयवंत चौधरी प्रामुख्याने उपस्थित होते. यज्ञ वैदिक मंत्रांचे वाचन डॉ. अमित भार्गव, प्रा. निशांत मिश्रा व वेद विभागाचे विद्यार्थी यांनी केले.

३. मृत्युंजय याग:—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**
ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **०९ ऑगस्ट २०२३**
सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

दि. ०३ ऑगस्ट २०२३ रोजी विद्यापीठाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरात जातवेदसी यज्ञशाळेत शास्त्रविद्यागुरुकुलम् वेद वैदिक विज्ञान विभागातर्फे मृत्युंजय याग आयोजन सकाळी ९ ते १०.३० वाजता

करण्यात आले होते. उपरोक्त कार्यक्रमात सर्वप्रथम स्वस्तिवाचनाने कार्यक्रमाची सुरुवात करून पूजा क्रमाने प्रधानसंकल्प, श्रीगणपती पूजन, कलश पूजन, रूद्रपूजन, कुशकंडिका, कुंड पूजन, अग्निस्थापन, त्यानंतर महामृत्युंजय मन्त्र द्वारा हवन करण्यात आले. यज्ञ वैदिक मंत्रांचे वाचन डॉ. अमित भार्गव, प्रा. निशांत मिश्रा व वेद विभागाचे विद्यार्थी यांनी केले.

४. श्रावणी उपाकर्म :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**
ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **३० ऑगस्ट २०२३**
सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे श्रावण पौर्णिमा निमित्त श्रावणी उपाकर्मचे आयोजन करण्यात आले होते. उपरोक्त कार्यक्रमात वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांना वेदोक्त पद्धतीने प्रायश्चित संकल्प स्वस्तिवाचन द्वारे पुष्प अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली, त्यानंतर दशविधीस्नान व पितृर्पण, सूर्योपासना, सप्तर्षी पूजा झाली. वेद विभागाचे प्राध्यापक अमित भार्गव व श्री निशान्त मिश्र यांच्या मार्गदर्शनाखाली उपरोक्त कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमात समस्त गुरुकुल प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

५. गणपती याग :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**
ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **३१ ऑगस्ट २०२३**
सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

३१/०८/२०२३ रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे गणपती याग चे आयोजन सकाळी ९ ते १०.३० वाजता करण्यात आले होते. उपरोक्त कार्यक्रमात सर्वप्रथम स्वस्तिवाचनाने कार्यक्रमाची सुरुवात करून पूजा क्रमाने प्रधानसंकल्प, श्रीगणपती पूजन, कलश पूजन, नंतर कुशकंडिका, कुंड पूजन, अग्निस्थापन, त्यानंतर गणेशाथर्वशीर्ष द्वारा हवन करण्यात आले. उपरोक्त कार्यक्रमास वेदविद्या संकाय प्रमुख, प्रो. हरेकृष्ण अगस्ती व विद्यार्थी उपस्थित होते.

६. गणपती उत्सव :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**
ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**
सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरात वेद वैदिक विज्ञान विभाग द्वारे गणेश उत्सव निमित्त मुर्ती प्रतिष्ठापण यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात गणेश मुर्तीच्या प्रतिष्ठापनेने झाली, मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली गणेश मुर्तीचे अभिषेक करण्यात आले. दररोज सकाळी १० वाजता व सायंकाळी ७ वाजता श्रीगणेशाची आरतीचे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उपरोक्त गणेश उत्सव कार्यक्रमाचे अर्हणा समन्वयक वेदविज्ञान विभागाचे प्राध्यापक डॉ. अमित भार्गव यांनी आयोजित केलेल्या उपरोक्त कार्यक्रमात मा. कुलगुरु व समस्त विद्यार्थी उपस्थित होते.

७. लक्ष्मीयाग :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**

ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**

दिनांक :— **०७/०९/२०२२**

सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

दि. ०७/०९/२०२२ रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे श्रीलक्ष्मीयाग चे आयोजन सकाळी ९ ते ११ या वेळेत करण्यात आले होते. उपरोक्त कार्यक्रमात सर्वप्रथम स्वस्तिवाचनाने कार्यक्रमाची सुरुवात करून पूजा क्रमाने प्रधानसंकल्प, श्रीगणपती पूजन, कलश पूजन, लक्ष्मीपूजन, नंतर कुशकंडिका, कुंड पूजन, अग्निस्थापन व श्रीसूक्त द्वारा हवन करण्यात आले. कार्यक्रमाची पूर्णाहुति विश्वविद्यालयचे मा. संचालक, बीपीडी, प्रो. प्रसाद गोखले व वेदविभाग प्रमुख डॉ. जयवन्त चौधरी यांनी केली. उपरोक्त कार्यक्रमात वेद विभागाचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

८. श्रीसूर्ययाग :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**

ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**

दिनांक :— **१५/११/२०२३**

सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

१५/११/२०२३ रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे श्रीसूर्ययाग आयोजन सकाळी ८ ते १० या वेळेत करण्यात आले होते. उपरोक्त कार्यक्रमात सर्वप्रथम स्वस्तिवाचनाने कार्यक्रमाची सुरुवात करून पूजा क्रमाने प्रधानसंकल्प, श्रीगणपती पूजन, कलश पूजन, सूर्यपूजन, नंतर कुशकंडिका, कुंड पूजन, अग्निस्थापन, त्यानंतर सूर्यसूक्त द्वारा हवन करण्यात आले. उपरोक्त कार्यक्रमात वेद विभागाचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

९. श्रीसरस्वती याग (मकर संक्रान्ति):—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**

ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**

दिनांक :— **१५/०१/२०२४**

सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

१५/०१/२०२४ रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे श्रीसरस्वतीयाग आयोजन सकाळी ८ ते १० या वेळेत करण्यात आले होते. उपरोक्त कार्यक्रमात सर्वप्रथम स्वस्तिवाचनाने कार्यक्रमाची सुरुवात करून पूजा क्रमाने प्रधानसंकल्प, श्रीगणपती पूजन, कलश पूजन, सरस्वतीपूजन, नंतर कुशकंडिका, कुंड पूजन, अग्निस्थापन, त्यानंतर सरस्वतीसूक्त द्वारा हवन करण्यात आले. उपरोक्त कार्यक्रमात वेद विभागाचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

१०. वास्तु शान्ती :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**

ठिकाण :— **सव. डॉ. कमलाकर तोतडे सभागृह, क.का.सं.वि.,रामटेक**

दिनांक :— **१९/०१/२०२४**

सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

१९/०१/२०२४ रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे सव. डॉ. कमलाकर तोतडे सभागृह नवनिर्मित सभागृह उद्घाटन समारोह निमित्त वास्तु शान्ती यज्ञ चे आयोजन सकाळी ७ ते १२ या वेळेत करण्यात आले होते. उपरोक्त

कार्यक्रमात सर्वप्रथम स्वस्तिवाचनाने कार्यक्रमाची सुरुवात करून पूजा क्रमाने प्रधानसंकल्प, श्रीगणपती पूजन, कलश पूजन, वास्तुपूजन, नंतर कुशकंडिका, कुंड पूजन, अग्निस्थापन, त्यानंतर वैदिकमन्त्रां द्वारा, हवन करण्यात आले. उपरोक्त यज्ञाकरिता विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरू, प्रो. हरेराम त्रिपाठी तथा समस्त संकाय प्रमुख, विभाग प्रमुख प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. यज्ञ वैदिक मंत्रांचे वाचन वेद विभागाचे प्राध्यापक डॉ. अमित भार्गव, डॉ. अश्विनी शुक्ला, प्रा. निशांत मिश्रा (गुरुकुल), प्रा. निशांत मिश्रा (वेद विभाग) तसेच वेद विभागाचे विद्यार्थी यांनी केले.

११. राम मन्दिर प्राण प्रतिष्ठा (रामयाग) :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**

ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**

दिनांक :— **२२/०१/२०२४**

सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

१०/०२/२०२३ रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे रामयाग आयोजन सकाळी ८ ते १० या वेळेत करण्यात आले होते. उपरोक्त कार्यक्रमात सर्वप्रथम स्वस्तिवाचनाने कार्यक्रमाची सुरुवात करून पूजा क्रमाने प्रधानसंकल्प, श्रीगणपती पूजन, कलश पूजन, रामपूजन, कुशकंडिका, कुंड पूजन, अग्निस्थापन, त्यानंतर श्रीसूक्त द्वारा हवन करण्यात आले. कार्यक्रमाची पूर्णाहुति मा. कुलगुरू व वेदविभाग प्रमुख डॉ जयवन्त चौधरी यांनी केली. उपरोक्त यज्ञ करिता वेद विभागाचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

१२. सारस्वतव्याख्यानमाला :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**

ठिकाण :— **शास्त्रार्थशाला, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**

दिनांक :— **३०/०१/२०२४**

सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरात दि. ३०/०१/२०२४ रोजी वेद तथा वैदिक विज्ञान विभागद्वारे सारस्वतव्याख्यानमाला चे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानालेच्या अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरू, प्रो. हरेराम त्रिपाठी उपस्थित होते. व्याख्यानमालेकरिता विशेष वक्ता म्हणून श्री लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालयातील वेद विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. रामराज उपाध्याय उपस्थित होते. प्रा. रामराज उपाध्याय यांचे वैदिक जीवने कल्पसूत्रस्य श्रवतम् या विषयावर विशेष व्याख्यान झाले. वक्त्यांनी सांगितले की, वैदिक साहित्यात वेदांगोला विशेष महत्त्व आहे. आणि वेदांमध्ये वर्णन केलेल्या श्रौत–स्मार्त यागांच्या ज्ञानासाठी आणि कार्यक्षमतेसाठी, वेदांमधील कल्पाचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. कल्पाचे चार प्रकार आहेत. १. श्रौतसूत्रम्, २. गृह्यसूत्रम्, ३. धर्मसूत्रम् ४. शुल्बसूत्रम् अनुक्रमे वरील सर्व प्रकारांचे सविस्तर वर्णन व्याख्यानात करण्यात आले, तसेच त्यांनी स्पष्ट केले की, मानवी जीवनातील चारही प्रयत्न साध्य करण्यासाठी कल्पातील यज्ञपद्धतीने सर्व प्रकारचे संकल्प केले पाहिजेत. मानवी जीवन पूर्ण होऊ शकते. उपरोक्त व्याख्यानमालाकरिता मा. संचालक, शैक्षणिक परिसर, रामटेक, प्रो. हरेकृष्ण अगस्ती तसेच डॉ. के. रा. जोशीजींचा मुलगा, मुलगी आणि इतर कुटुंबीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. व्याख्यान कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शास्त्रविद्यागुरुकुलमचे प्राध्यापक डॉ. अमित भार्गव यांनी केले. उपरोक्त व्याख्यानमालाकरिता उपस्थित सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे आभार शास्त्रविद्यागुरुकुलमचे प्राध्यापक श्री. निशांत मिश्रा यांनी मानले. व्याख्यानमालेकरिता सर्व गुरुकुल प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

१३. श्रीसरस्वतीयाग :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**
ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **१४/०२/२०२४**
सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

१४/०२/२०२४ रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे वसंतपंचमी च्या स्मरणार्थ श्रीसरस्वतीयाग चे आयोजन सकाळी ८ ते १० या वेळेत करण्यात आले होते. उपरोक्त कार्यक्रमात सर्वप्रथम स्वस्तिवाचनाने कार्यक्रमाची सुरुवात करून पूजा क्रमाने प्रधानसंकल्प, श्रीगणपती पूजन, कलश पूजन, सरस्वतीपूजन, नंतर कुशकंडिका, कुंड पूजन, अग्निस्थापन, त्यानंतर सरस्वतीसूक्त द्वारा हवन करण्यात आले. उपरोक्त यज्ञ करिता वेद विभागाचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

१४. महाशिवरात्रि रुद्रअभिषेक :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**
ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **०८/०३/२०२४**
सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

दि. ०८/०३/२०२४ रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे महाशिवरात्रि निमित्त रुद्रभिषेक चे आयोजन सकाळी ९ ते १० या वेळेत करण्यात आले होते. उपरोक्त कार्यक्रमात सर्वप्रथम स्वस्तिवाचनाने कार्यक्रमाची सुरुवात करून पूजा क्रमाने प्रधानसंकल्प, श्रीगणपती पूजन, कलश पूजन, शिवपूजन, दूग्धाभिषेक वैदिकमन्त्रां द्वारा करण्यात आले. उपरोक्त यज्ञ करिता वेद विभागाचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

१५. दिक्षांत समारोह च्या निमित्याने सरस्वती याग :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**
ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **०६/०३/२०२४**
सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे दि. ०६/०३/२०२४ रोजी दिक्षांत समारोह निमित्त सरस्वतीयाग चे आयोजन सकाळी ९ ते १० या वेळेत करण्यात आले होते. उपरोक्त कार्यक्रमात सर्वप्रथम स्वस्तिवाचनाने कार्यक्रमाची सुरुवात करून पूजा क्रमाने प्रधानसंकल्प, श्रीगणपती पूजन, कलश पूजन, सरस्वतीपूजन, नंतर कुशकंडिका, कुंड पूजन, अग्निस्थापन, त्यानंतर वैदिकमन्त्रां द्वारा, हवन करण्यात आले. उपरोक्त यज्ञामध्ये पुर्णाहूती करिता मा. कुलगुरू, प्रो. हरेराम त्रिपाठी, मा. परिक्षा नियंत्रक, डॉ. जयवन्त चौधरी, मा. कुलसचिव तथा मा. अधिष्ठता, प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्र संकाय, प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, मा. अधिष्ठाता, वेदविद्या संकाय, प्रो. हरेकृष्ण अगस्ती, मा. अधिष्ठता, भारतीय धर्म तत्वज्ञान तथा संस्कृती संकाय, प्रो. मधुसूदन पेन्ना, मा. अधिष्ठता, शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा संकाय, प्रो. ललिता चंद्रात्रे, मा. अधिष्ठता, संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय, प्रो. कविता होले प्रामुख्याने उपस्थित होते. यज्ञ वैदिक मंत्रांचे वाचन वेद विभागाचे प्राध्यापक डॉ. अमित भार्गव, डॉ. अश्विनी शुक्ला, प्रा. निशांत मिश्रा (गुरुकुल्), प्रा. निशांत मिश्रा (वेद विभाग) तसेच वेद विभागाचे विद्यार्थी यांनी केले.

१६. श्रीरामयाग (श्रीरामनवमी) :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**

ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**

दिनांक :— **१७/०४/२०२४**

सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे दि. १७/०४/२०२४ रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेत श्रीराम यागाचे आयोजन करण्यात आले होते. रामनवमी उत्सवानिमित्त मानवतेच्या कल्याणासाठी विद्यापीठाच्या अधिक विकासासाठी या यज्ञात क्रमाने स्वस्तिवाचन, दिगर्क्षण, प्रधान संकल्प, गणपती पूजा, वरुण पूजा, प्रधान देवपूजा, कुंड पूजा, कुषकंडिका आणि देवतांना नैवेद्य अर्पण केला जातो. यज्ञ वैदिक मंत्रांचे वाचन वेद विभागाचे प्राध्यापक डॉ. अमित भार्गव, डॉ. अश्विनी शुक्ला, प्रा. निशांत मिश्रा (गुरुकुल्), प्रा. निशांत मिश्रा (वेद विभाग) तसेच वेद विभागाचे विद्यार्थी यांनी केले. पूजेच्या शेवटी सर्व प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी पूर्णाहुती अर्पण केली.

१७. हनुमंत याग (हनुमान जयंती) :—

विभाग :— **वेद तथा वैदिक विज्ञान विभाग**

ठिकाण :— **जातवेदसी यज्ञशाळा, परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि.,रामटेक**

दिनांक :— **२३/०४/२०२४**

सहभागी :— **विद्यार्थी व प्राध्यापक गण**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी गुरुकुलम् परिसरातील जातवेदसी यज्ञशाळेमध्ये वेदवैदिक विज्ञान विभाग द्वारे दि. २३/०४/२०२४ रोजी सकाळी हनुमान जयंती निमित्त श्री हनुमान यागाचे आयोजन करण्यात आले होते. या यज्ञामध्ये स्वस्तिवाचन, दिग्रक्षण, प्रधान संकल्प, गणपती पूजा, वरुण पूजा, प्रधान देवपूजा, आचार्य ऋत्विक पूजा, कुंड पूजा, कुशकंडिका आणि आह्वान केलेल्या देवांना नैवेद्य अर्पण केले. या यज्ञाच्या उपस्थित सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांनी हनुमान चालीसाचे वाचन करुन यज्ञ मध्ये पुर्णाहूती अर्पण केली. यज्ञ वैदिक मंत्रांचे वाचन वेद विभागाचे प्राध्यापक डॉ. अमित भार्गव, डॉ. अश्विनी शुक्ला, प्रा. निशांत मिश्रा (गुरुकुल), प्रा. निशांत मिश्रा (वेद विभाग) तसेच वेद विभागाचे विद्यार्थी यांनी केले.

* * *

व्याकरण विभाग

—: व्याकरण विभागाद्वारे वर्ष २०२३—२४ मध्ये घेण्यात आलेले कार्यक्रम व स्पर्धांचे विवरण :—

१. संस्कृत महोत्सव २०२३ — शब्दरूपकण्ठपाठस्पर्धा

विभाग : — व्याकरण विभाग
ठिकाण :— शास्त्रार्थशाला, क. का. सं. वि., रामटेक
दिनांक :— २६/०८/२०२३
सहभागी :— २० विद्यार्थी

दि. २६/०८/२०२३ रोजी संस्कृत महोत्सव २०२३ संस्कृत सप्ताह अन्तर्गत व्याकरण विभाग द्वारे शब्दरूपकण्ठपाठस्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे आयोजन मा. कुलगुरु, प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शब्दरूपकण्ठपाठस्पर्धांचे परीक्षण डॉ. सचिन द्विवेदी, सहा.प्रा. शास्त्रविद्यागुरुकुलम् यांनी केले स्पर्धेमध्ये प्राक्शास्त्री, शास्त्री व आचार्य या सर्व अभ्यासक्रमातील एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	नाव	वर्ग	विभाग	प्राप्त क्रमांक
१.	अथर्व भारद्वाज	शास्त्री तृतीय वर्ष	व्याकरण विभाग	प्रथम क्रमांक
२.	वेदश्री कुलकर्णी	शास्त्री तृतीय वर्ष	व्याकरण विभाग	द्वितीय क्रमांक
३.	लोकेश प्रधान	शास्त्री प्रथम वर्ष	व्याकरण विभाग	तृतीय क्रमांक

स्पर्धेमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ग्रंथ व पेन पारितोषिक स्वरूपात देऊन त्यांच्या सत्कार करण्यात आला. तसेच स्पर्धेमध्ये उत्तीर्ण व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धेचे नियोजन डॉ. जयवन्त चौधरी, सहा. प्राध्यापक, व्याकरण विभाग यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वीतेकरिता डॉ. सुकान्त प्रामाणिक व प्रा. पंकज भोई यांनी मोलाचे सहकार्य केले.

२. संस्कृत महोत्सव २०२३ — धातुरूपकण्ठपाठस्पर्धा

विभाग :— व्याकरण विभाग
ठिकाण :— क. का. सं. वि., रामटेक
दिनांक :— २६,२७/०८/२०२३
सहभागी :— १५ विद्यार्थी

दि. २६,२७/०८/२०२३ रोजी संस्कृत महोत्सव २०२३ संस्कृत सप्ताह अंतर्गत व्याकरण विभागा द्वारे धातुरूपकण्ठपाठस्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे आयोजन मा. कुलगुरु, प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. धातुरूपकण्ठपाठस्पर्धेचे परीक्षण डॉ. राकेश रौशन, सहा. प्रा. साहित्य विभाग यांनी केले. उपस्थित होते. स्पर्धेमध्ये प्राक्शास्त्री, शास्त्री व आचार्य या सर्व अभ्यासक्रमातील एकूण १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	नाव	वर्ग	विभाग	प्राप्त क्रमांक
१.	वेदश्री कुलकर्णी	शास्त्री तृतीय वर्ष	व्याकरण विभाग	प्रथम क्रमांक
२.	अथर्व भारद्वाज	शास्त्री तृतीय वर्ष	व्याकरण विभाग	द्वितीय क्रमांक
३.	नूपुर कुलकर्णी	शास्त्री द्वितीय वर्ष	व्याकरण विभाग	तृतीय क्रमांक

स्पर्धेमध्ये उत्तीण विद्यार्थ्यांना ग्रंथ व पेन पारितोषिक स्वरूपात देऊन त्यांच्या सत्कार करण्यात करण्यात आला. तसेच स्पर्धेमध्ये उत्तीर्ण व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धेचे नियोजन डॉ. जयवंत चौधरी, सहा.

प्राध्यापक, व्याकरण विभाग यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वीतेकरिता डॉ. सुकान्त प्रामाणिक व प्रा. पंकज भोई यांनी मोलाचे सहकार्य केले.

३. संस्कृत महोत्सव २०२३ – संस्कृत संभाषण शिबीर

विभाग :– व्याकरण विभाग
ठिकाण :– क.का.सं.वि. रामटेक
दिनांक :– २२/०८/२०२३ ते ३१/०८/२०२३
सहभागी :– ७० कर्मचारी

दि. २२/०८/२०२३ ते ३१/०८/२०२३ संस्कृत महोत्सव २०२३ संस्कृत सप्ताह अंतर्गत व्याकरण विभागाद्वारे १० दिवसीय संस्कृत संभाषण शिबीर चे आयोजन करण्यात आले होते. संस्कृत संभाषण शिबीराचे उद्घाटन प्रो. कविता होले, मा. विभागप्रमुख, साहित्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. उद्घाटन सत्रात मुख्य अतिथि म्हणून प्रो. प्रसाद गोखले व सारस्वत अतिथी डॉ. दीपक कापडे उपस्थित होते. उद्घाटन सत्राचे प्रास्ताविक प्रो. हरेकृष्ण अगस्ती, मा. विभागप्रमुख, व्याकरण विभाग यांनी केले. तसेच उद्घाटन सत्राच्या अध्यक्ष प्रो. कविता होले यांनी विश्वविद्यालयातील संस्कृतेतर प्राध्यापक व कर्मचारी यांना १० दिवसीय संस्कृत संभाषण शिबीरात सहभागी होण्याकरिता आपल्या उद्बोधन भाषाणातून प्रेरित केले. उद्घाटन सत्रात उपस्थित सर्व अतिथी, प्राध्यापक व कर्मचारी यांचे आभार डॉ. जयवंत चौधरी यांनी मानले. उद्घाटन सत्राच्या यशस्वीतेकरिता व्याकरण विभागाचे प्राध्यापक डॉ. सुकान्त प्रामाणिक व प्रा. पंकज भोई यांनी मोलाचे सहकार्य केले.

१० दिवसीय संस्कृत संभाषण शिबीरामध्ये विश्वविद्यालयाच्या एकूण ७० संस्कृतेतर शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला तसेच सर्व सहभागी शिक्षक व कर्मचाऱ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

४. सरल संस्कृत पुस्तक प्रदर्शनी

विभाग :– व्याकरण विभाग व संस्कृत भारती, रामटेक
ठिकाण :– क. का. सं. वि., रामटेक
दिनांक :– ०२/०९/२०२३
सहभागी :– १०० कर्मचारी व विद्यार्थी

संस्कृत महोत्सव २०२३ संस्कृत सप्ताह अंतर्गत, दि. ०२ सप्टेंबर, २०२३ रोजी, व्याकरण विभाग व संस्कृत भारती, रामटेकद्वारे सरल संस्कृत पुस्तक विक्री–केंद्राचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांची संस्कृत बद्दल आवड लक्षात घेऊन संस्कृत भारतीच्या व्याकरणाशी संबंधित काही सोप्या पुस्तकांचा आणि संस्कृत भारतीच्या सरलमानक संस्कृत पुस्तकांचा स्टॉल लावण्यात आला होता. यामध्ये विद्यापीठातील विद्यार्थी, कर्मचारी आणि शिक्षकांनी उत्साहाने सुमारे २०००/– रुपयांची पुस्तके खरेदी केली. विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १०:३० ते सायंकाळी ०५:३० या वेळेत झालेल्या या उपक्रमात सुमारे १०० पुस्तकांची विक्री झाली व हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

५. राष्ट्रिय शास्त्रार्थ सभा

विभाग :– व्याकरण विभाग
ठिकाण :– ऑनलाईन
दिनांक :– ०४/०९/२०२३
सहभागी :– ६० कर्मचारी व विद्यार्थी

संस्कृत महोत्सव २०२३ संस्कृत सप्ताह अन्तर्गत, दि. ०४ सप्टेंबर, २०२३ वेदविद्या संकाय द्वारे राष्ट्रिय शास्त्रार्थ सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेचे अध्यक्ष म्हणून मा.कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सारस्वत अतिथी म्हणून प्रो. मधुसूदन पेन्ना, मा. अधिष्ठाता, भारतीय संस्कृती धर्म तत्वज्ञान संकाय उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रो. हरेकृष्ण अगस्ती, मा.संकाय प्रमुख, वेदविद्या संकाय यांनी केले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील

चार अभ्यासकांना व्याख्याने सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमात मुद्देनहल्ली कॅम्पसचे प्रसिद्ध विद्वान व सहाय्यक शिक्षक आचार्य शंभूनाथ भट्ट यांनी "लः कर्मणि च भावे चाकर्मकेभ्यः" या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान सादर केले. त्यानंतर राजीव गांधी परीसर, शृंगेरी येथील रिसर्च स्कॉलर नरसिंग गणेश भट्ट यांनी "इको गुणवृद्धि" या विषयावर व्याख्यान सादर केले. रामकृष्ण मिशन विवेकानंद कॉलेज, चेन्नई येथील आचार्य गुरुप्रसाद यांनी "असिद्धं बहिरङ्गमन्तरङ्गे" या विषयावर व्याख्यान सादर केले. त्यानंतर आदर्श कॉलेज, मुंबईचे आचार्य कार्तिक भागवत यांनी "अधिकरणकारकम्" या विषयावर व्याख्यान सादर केले. कार्यक्रमाला विद्यापीठातील सुमारे ६० शिक्षक व विद्यार्थी प्रेक्षक म्हणून उपस्थित होते.

६. राष्ट्रीय गणित दिवस

विभाग :— व्याकरण विभाग
ठिकाण :— क. का. सं. वि., रामटेक
दिनांक :— २२/१२/२०२३
सहभागी :— १५० कर्मचारी व विद्यार्थी

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या व्याकरण विभागद्वारे दि. २२/१२/२०२३ रोजी राष्ट्रीय गणित दिनानिमित्त विद्यार्थ्यांचा भारतीय गणितीय ज्ञानाच्या विकास या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यान उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलसचिव, प्रो. कृष्णकुमार पांडेय उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रो. हरेकृष्ण अस्ती यांनी केले. व्याख्यानाकरिता गणित विषयतज्ञ मा. शेफाली जोशी, नागपूर यांना निमंत्रित केले होते. त्यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले की, गणित दिवस म्हणजे संख्या आणि गणनेचे महत्त्व आणि सौंदर्य यांचा उत्सव. विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रात क्रांती घडवून आणणाऱ्या गणितज्ञांनी इतिहासात केलेल्या विलक्षण योगदानाची कबूली देण्याचा हा दिवस आहे. या विशेष दिवसाचा उद्देश लोकांना गणिताच्या सामर्थ्याचे कौतुक करण्यासाठी आणि आपल्या दैनंदिन जीवनात त्याची मूलभूत भूमिका समजून घेण्यासाठी प्रेरित करणे आहे. तसेच त्यांनी तयार करुन आणलेल्या पीपीटी च्या माध्यमाने विद्यार्थ्यांना गणिताविषयी माहिती दिली.

व्याख्यानामध्ये उपस्थित सर्वांचे आभार प्रदर्शन डॉ. जयवंत चौधरी यांनी केले. या व्याख्यानासाठी विद्यापीठातील सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

७. सारस्वतव्याख्यानमाला

विभाग :— व्याकरण विभाग
ठिकाण :— प्रज्ञाभारती, शास्त्रार्थशाला, शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि., रामटेक
विषय :— शाब्दबोधप्रक्रिया
दिनांक :— १७/०१/२०२४
सहभागी :— ६० विद्यार्थी

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या व्याकरण विभागद्वारे दि. १७/०१/२०२४ रोजी मा. कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या अध्यक्षतेखाली सारस्वत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रो. हरेकृष्ण अगस्ती, मा. अधिष्ठता, वेदविद्यासंकाय यांनी केले. व्याख्यानासाठी श्री लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालयाचे आचार्य रामसल्लाहि द्विवेदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच डॉ. जयवंत चौधरी, वेद तथा वैदिक विज्ञान विभाग, डॉ. अमित भार्गव, डॉ. सुकांत प्रामाणिक, डॉ. अश्विनी शुक्ला, प्रा. पंकज भोई व प्रा. निशांत मिश्र आदि प्राध्यापक गण प्रामुख्याने उपस्थित होते. आचार्य रामसल्लाही द्विवेदी यांनी शाब्दबोध प्रक्रिया या विषयांवर विविध ग्रंथांचे स्वरूप अतिशय सोप्या भाषेत स्पष्ट केले, त्यांनी विद्यार्थ्यांना वेद व्याकरण संबंधीत नूतन विषयांची माहिती दिली. या व्याख्यानमालेत सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

८. एक दिवसीय सरलमानक संस्कृत कार्यशाला

विभाग :— व्याकरणविभाग:
ठिकाण :— क.का.सं.वि. रामटेक
दिनांक :— १०/०२/२०२४
सहभागी :— ६० विद्यार्थी

भारतीय भाषा समिती आणि व्याकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृत भाषेच्या सुलभीकरणासाठी एक दिवसीय सरलमानक संस्कृत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ही कार्यशाळा १०/०२/२४ रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक मा. कुलसचिव प्रो.कृष्णकुमार पांडे होते. या कार्यक्रमाचे समन्वयक वेदविद्यासंकाय प्रमुख प्रो. हरेकृष्ण अगस्ती होते. कार्यक्रमाचे विशेष व्याख्याते उत्तर प्रदेशराज्याचे संस्कृत भारतीचे शिक्षण प्रमुख कौशल किशोर तिवारी, व नागपूर येथील संस्कृत विदुषी डॉ.नंदा पुरी. संस्कृत भाषा शिकवण्यासाठी हा उपक्रम अतिशय उपयुक्त ठरला, सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

* * *

संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग

स्थापना – वर्ष 2000

संकाय – संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय

अभ्यासक्रम – 1 आगम संस्कृत, 2 आगम प्राकृत, 3 बी.ए. संस्कृत विशारद, 4 शास्त्री, 5 आचार्य, 6 एम्. ए., 7 एम्. फिल्., 8 विद्यावारिधी, 9 पीएच्. डी., 10 डी. लिट्. इ.

अधिष्ठाता – प्रो. डॉ. कविता होले

विभाग प्रमुख – प्रो. डॉ. कविता होले

प्राध्यापक – डॉ. पराग जोशी,

सहायक प्राध्यापक – डॉ. राजेंद्र जैन

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 22

उद्देश –

- प्राचीन संस्कृत साहित्य, भाषा यांचे अध्यापन, संशोधन
- आंतरविद्या शाखीय व तौलनिक अध्यापन, संशोधनास प्रोत्साहन
- संस्कृत भाषा जनसामान्यांपर्यंत, संस्कृतानुरागींना सहज आत्मसात करता यावी यासाठी विशेष आगम, विशारद इ. अभ्यासक्रमांचे अध्यापन
- संस्कृतसह अन्य प्राचीन भाषा प्राकृत, पाली इ. भाषांचे अभ्यासक्रम जिज्ञासूंना उपलब्ध करवून देणे.
- संस्कृतसह जर्मन, फ्रेंच इ. विदेशी भाषांचे पदविका अभ्यासक्रम चालविणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- समकालीन संस्कृत साहित्य आणि साहित्यशास्त्र
- आंतरविद्याशाखीय संशोधन
- मार्गदर्शकांसह संशोधकांचे संशोधन लेख प्रकाशित करणे
- संशोधक विद्यार्थ्यांकरिता एकदिवसीय रिसर्च मीट दर दोन महिन्यांनी आयोजित करणे

संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक येथे पदव्युत्तर संस्कृतभाषा व साहित्य विभागातर्फे घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा तसेच विभागातर्फे राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

१. कालिदास दिन समारोह (व्याख्यान) –

आषाढाच्या प्रथम दिवशी संस्कृतभाषा व साहित्य विभागातर्फे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षी कालिदास दिन साजरा करण्यात येतो. यावर्षी सुद्धा सोमवार दि १९.०६.२०२३ रोजी कालिदास दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सकाळी १०.०० वाजता मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी यांनी विद्यापीठ परिसरातील महाकवी कालिदास यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. कुलसचिव व वित्त विभाग अधिकारी मा. डॉ. रामचंद्र जोशी यावेळी उपस्थित होते.

त्यानंतर संस्कृत भाषा व साहित्य विभागाचे **प्रो. पराग जोशी** यांचे **'कविकुलगुरु कालिदास'** या विषयावर विशिष्ट व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मा कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. तसेच, संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता मा. प्रो. कविता होले यांनी प्रास्ताविक केले. विश्वविद्यालयाचे सर्व संकायप्रमुख, सर्व विभागप्रमुख तसेच सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी या वेळी उपस्थित होते. डॉ. राजेंद्र जैन यांनी मान्यवरांचे आभार व्यक्त केले. शांतिमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

दुपारी विद्यार्थ्यांना रामटेक येथील कालिदास स्मारकावर नेऊन त्यांच्याकडून मेघदूताचा पाठ करून घेतला. त्याठिकाणी विभागातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी तसेच इतर प्राध्यापक सुद्धा उपस्थित होते.

२. गुरुपौर्णिमा कार्यक्रम –

कविकुलगुरु–कालिदास–संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक तसेच वारंगा परिसर येथे दि. ०३.०७.२०२३ रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी रामटेक येथे पारंपरिक विद्यार्थ्यांनी तसेच, गुरुकुल अध्यापकांनी मांगलिक यज्ञाचे आयोजन केले. वर्णेकर सभागृहात विभागीय सर्व विद्यार्थ्यांनी अध्यापकांना आमंत्रित करून गुरुपदी आसनस्थ करून त्यांचा यथोचित सन्मान व कौतुक केले. कार्यक्रमात प्रो. कविता होले अधिष्ठाता संस्कृत–संस्कृतेतर भाषा संकाय तसेच संस्कृतभाषा–साहित्य विभागप्रमुख क.का.सं.वि., रामटेक यांची विशेषोपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन, प्रास्तविक व ऋणनिर्देश विभागातील एम.ए. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींनी केले. आदरणीय प्रो. कविता होले यांनी गुरुसेवा, मोक्ष, ज्ञानप्राप्ती या विषयावर मार्गदर्शनपर विचार प्रस्तुत केले. गुरुशिष्यांच्या नात्यावर सुद्धा प्रकाश टाकला.

३. पंचदिवसीय MOOC's कार्यशाळा

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या स्वयम्, संस्कृत भाषा व साहित्य विभाग आणि पालि–प्राकृत–भारतीय भाषा विभाग क. का. सं. वि. रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने २५ ऑगस्ट २०२३ ते २९ ऑगस्ट २०२३ या कालावधीत पंचदिवसीय MOOCs कार्यशाळेचे आयोजन केले होते. श्री. भा. वर्णेकर सभागृहात दि. २५ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या अध्यक्षतेत या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. प्रो. सच्चिदानंद मिश्र हे मुख्य अतिथी, श्री. श्रीश देवपुजारी, संस्कृत भारती, दिल्ली, हे सारस्वत अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच मंदार भानुशे, सहा. प्रा., दूरस्थ आणि मुक्त अध्ययन केंद्र, मुंबई विश्वविद्यालय, मुंबई, प्रो. एस. पी. शर्मा, परिसर संचालक, प्रो. हरेकृष्ण अगस्ती, कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी, आय. क्यु. ए. सी. संचालक, प्रो. कविता होले आणि कार्यशाळेचे समन्वयक डॉ. राजेंद्र जैन व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यशाळेकरिता श्री. अभिषेक कुमार, वैज्ञानिक – E (CS) INFLIBNET centre, गांधीनगर, श्री. मंदार भानुशे, सहा. प्रा., दूरस्थ आणि मुक्त अध्ययन केंद्र, मुंबई विश्वविद्यालय, मुंबई, हे उपस्थित होते. डॉ. शीतल शर्मा, जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय, नवी दिल्ली आणि प्रो. रेखा शर्मा, निवृत्त प्रो., नागपूर विश्वविद्यालय, नागपूर. यांची

वदसपदम पद्धतीने विशेष उपस्थिती होती. यांनी वेगवेगळे वदसपदम अभ्यासक्रम तयार करणे शिकविले. तसेच वेगवेगळ्या विषयांवर माहिती दिली.

२९ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता कार्यशाळेचा समारोप झाला.

४. एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

संस्कृत भाषा व साहित्य विभागाद्वारे कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक परिसरातील श्री. भा. वर्णेकर सभागृहात दि. १७ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता **'संस्कृतमधील पाठचिकित्सा'** या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटनप्रसंगी मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी अध्यक्षस्थानी होते. मा. राज्यपाल महोदय हे ऑनलाईन माध्यमाने उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून श्री. लालबहादूर शास्त्री संस्कृत विद्यापीठ, दिल्ली येथील कुलगुरु प्रो. मुरली मनोहर पाठक, विशेष अतिथी म्हणून संस्थापक कुलगुरु डॉ. पंकज चांदे, कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी, प. पू. गो. गु. शैक्षणिक परिसर संचालक प्रो. हरेकृष्ण अगस्ती, राष्ट्रीय परिषद समन्वयिका प्रो. कविता होले, अधिष्ठाता, संस्कृत–संस्कृतेतर भाषासंकाय, राष्ट्रीय परिषद समन्वयिका, प्रो. पराग जोशी, विभागप्रमुख, आधुनिक भाषा विभाग व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच विभागागातील डॉ. राजेंद्र जैन, डॉ. राघवेंद्र भट आणि इतर प्राध्यापक, विद्यापीठातील अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

उद्घाटनानंतर प्रज्ञाभारती श्री. भा. वर्णेकर सभागृहात प्रो. मधुसूदन पेन्ना, क. का. सं. वि. रामटेक यांनी 'Methods of Textual Criticism', प्रो. मंजुश्री सरदेशपांडे, इंग्रजी विभागप्रमुख, धरमपेठ महाविद्यालय, नागपूर यांचे 'Critical Analysis of the Novel, Time Shelter' आणि प्रो. नंदा पुरी पूर्व अधिष्ठाता क. का. सं. वि. रामटेक यांचे 'Textual Criticism of Mahabharata' अशा वेगवेगळ्या विषयांवर या तीन निमंत्रित व्यक्तींचे सादरीकरण झाले.

त्यानंतरचे तिसरे सत्र दोन ठिकाणी घेण्यात आले. एक खोली क्र. १२ आणि श्री. भा. वर्णेकर सभागृहात संपन्न झाले. त्या दोन ठिकाणी अध्यक्ष प्रो. हरेकृष्ण अगस्ती आणि प्रो. कृष्णकुमार पाण्डेय होते. दोन्ही ठिकाणी संशोधन छात्रांनी वेगवेगळ्या विषयांवर सादरीकरण केले. त्यानंतर दुपारी ४.००वाजता प्रो. पराग जोशी यांनी 'Textual Criticism' या विषयावर प्रायोगिक सत्र घेतले.

दुपारी ४.३० वाजता श्री. भा. वर्णेकर सभागृहात राष्ट्रीय परिषदेचा समारोप कार्यक्रम झाला. या समारोहात प्रमुख अतिथी म्हणून प्रो. शीतला प्रसाद शुक्ला, अधिष्ठाता, लाल बहादूर शास्त्री विद्यापीठ, दिल्ली, प्रो. नंदा पुरी पूर्व अधिष्ठाता क. का. सं. वि. रामटेक, प्रो. मधुसूदन पेन्ना, क. का. सं. वि. रामटेक, अध्यक्ष मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी, समन्वयिका प्रो. कविता होले व्यासपीठावर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. पल्लवी कावळे यांनी केले. विभागातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी या परिषदेसाठी सहकार्य केले. या परिषदेसाठी एकूण ७५ नोंदणी झाल्या आणि २५ पेक्षा जास्त शोधपत्र प्रस्तुत केले.

५. हस्तलिखितशास्त्र या विषयावर विशेष व्याख्याने

डॉ. पल्लवी कावळे, सहायक प्राध्यापिका संस्कृत भाषा व साहित्य विभाग यांचे ०८ ते ११ जानेवारी २०२४ या कालावधीत हस्तलिखितशास्त्र या विषयावर विशेष व्याख्याने झाली. यात ०८ जानेवारी रोजी हस्तलिखितशास्त्राचे महत्त्व, ०९ जानेवारी रोजी लेखन साहित्य आणि साधने, १० जानेवारी रोजी हस्तलिखित ग्रंथालय व ११ जानेवारी रोजी हस्तलिखितांचे संवर्धन ही व्याख्याने झाली. या व्याख्यानाला एकूण ४५ विद्यार्थी उपस्थित होते. व्याख्यान कक्ष क्र. ५०१ मध्ये झाले.

६. वृत्त आणि अलंकार या विषयावर विशेष व्याख्यान

प्रा. कविता होले, अधिष्ठाता संस्कृत–संस्कृतेतरभाषा–संकाय आणि विभागप्रमुख, संस्कृत भाषा व साहित्य विभाग यांचे १६जानेवारी २०२४ रोजी अभिनव भारती वारंगा परिसर येथे वृत्त आणि अलंकार या विषयावर विशेष व्याख्यान

झाले. भारतीय धर्म, संस्कृती आणि तत्त्वज्ञान विभागाचे अधिष्ठाता माननीय प्रा.मधुसूदन पेन्ना, अध्यक्षस्थानी होते. ३ दिवस चाललेल्या या व्याख्यानाला एकूण ३३ विद्यार्थी उपस्थित होते. व्याख्यान कक्ष क्र. ५०१ मध्ये झाले.

७. स्वयंम आणि MOOCs या विषयावर विशेष व्याख्यान

डॉ. राजेंद्र जैन, सहाय्यक प्राध्यापक, संस्कृत भाषा आणि साहित्य विभाग यांनी १९ जानेवारी २०२४ रोजी अभिनव भारती वारंगा कॅम्पस येथे स्वयंम आणि MOOCs या विषयावर विशेष व्याख्यान दिले. व्याख्यानाला एकूण ३६ विद्यार्थी उपस्थित होते. व्याख्यान कक्ष क्र. ५०१ मध्ये झाले.

८. एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजन

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक (पर्यटन तथा सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन), श्रीराम–महासंस्कृति–महोत्सव, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य–अमृत–महोत्सवांतर्गत समायोजित एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे दि. २० जानेवारी २०२४ रोजी आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रासाठी केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली यांच्याकडून आर्थिक अनुदान प्राप्त झाले होते. या चर्चासत्राचा विषय **'सांस्कृतिकपृष्ठभूमौ महाकविः कालिदासः'** हा होता.

या चर्चासत्राच्या उद्घाटनासमारोहाप्रसंगी रामटेकचे आमदार श्री. आशीष जयस्वाल हे विशेष अतिथी, विद्यापीठाच्या माजी कुलगुरु प्रो. उमा वैद्य या सारस्वत वक्ता, माजी पोलीस महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय हे विशेष वक्ता म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी होते, तसेच कुलसचिव प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, प. पू. गो. गु. शैक्षणिक परिसराचे संचालक प्रो. हरेकृष्ण अगस्ती आणि चर्चासत्राच्या समन्वयिका प्रो. कविता होले व्यासपीठावर उपस्थित होते. प्रो. कृष्णकुमार पाण्डेय यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. राजेंद्र जैन यांनी कार्यक्रमाचे संचालन तर प्रो. कविता होले यांनी आभार मानले.

त्यानंतर दुपारी १२.३० वाजता दुसरे सत्र झाले. त्यात प्रो. मधुसूदन पेन्ना, प्रो. नंदा पुरी, प्रो.कृष्णकुमार पाण्डेय, प्रो. कविता होले, प्रो. प्रसाद गोखले या पाच व्याख्यात्यांचे कालिदासाशी संबंधित वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यान झाले. नंतर दुपारी २.३० वाजता चर्चासत्राच्या तिसऱ्या सत्रात प्रो. कलापिनी अगस्ती, प्रो. हरेकृष्ण अगस्ती, प्रो. ललिता चंद्रात्रे, प्रो. पराग जोशी, डॉ. जयवंत चौधरी आणि डॉ. राजेंद्र जैन यांचे कालिदासासबंधित वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यान झाले. त्यानंतरच्या सत्रात सर्व मान्यवर, शोधछात्रा आणि विद्यार्थी यांच्यात मुक्तचर्चा झाली.

नंतर दुपारी ४.३० वाजता समापन समारोहात माजी अधिष्ठाता प्रो. नंदा पुरी मुख्य अतिथी, परीक्षा नियंत्रक डॉ. जयवंत चौधरी, अध्यक्ष प्रो. कविता होले उपस्थित होते. समारोहाचे संचालन आणि आभारप्रदर्शन डॉ. राजेंद्र जैन यांनी केले.

९. शिलालेख आणि त्यांचे महत्त्व या विषयावर विशेष व्याख्याने

डॉ.मृदुला तापस, सहायक प्राध्यापिका संस्कृत भाषा आणि साहित्य विभाग यांनी शिलालेख आणि त्यांचे महत्त्व या विषयावर विशेष व्याख्याने दिली. २२ फेब्रुवारी २०२४ रोजी शिलालेख आणि भारत, तसेच २३ फेब्रुवारी २०२४ रोजी शिलालेखांचे साहित्यिक आणि ऐतिहासिक महत्त्व या विषयावर व्याख्याने झाली. व्याख्यानाला एकूण ४६ विद्यार्थी उपस्थित होते. व्याख्यान कक्ष क्र. ५०१ मध्ये झाले.

१०. मराठी भाषा गौरव दिन

विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरात संस्कृतभाषा–साहित्य विभागातर्फे मराठीभाषा गौरव दिनाचे आयोजन दिनांक २७.०२.२०२४ रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन मा. प्रो. पराग जोशी, आधुनिकभाषा विभाग, विभागप्रमुख यांनी केले होते. कार्यक्रमात मराठी भाषेचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी भाषा आणि भाषावाद प्रांतरचना याबद्दल मार्गदर्शन केले. मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी अध्यक्ष होते. तसेच संस्कृत–संस्कृतेतर भाषासंकायाच्या अधिष्ठाता आणि संस्कृतभाषा व साहित्य विभागाच्या विभागप्रमुख मा. प्रो. कविता होले यांनी विद्यार्थ्यांना

मार्गदर्शन केले. विद्यापीठातील इतर प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांची उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली. विभागातील सहाय्यक प्राध्यापक आणि प्राध्यापिका यांनी या कार्यक्रमाचे काम पाहिले.

११. चार दिवसीय लिपी कार्यशाळा

संस्कृत भाषा आणि साहित्य विभाग अभिनव भारती वारंगा परिसर येथे ११ मार्च ते १४ मार्च २०२४ या कालावधीत पॅलिओग्राफी आणि विविध लिप्यांवर चार दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यात ११ मार्च रोजी डॉ. पल्लवी कावळे यांनी ब्राह्मी लिपी, १२ मार्च रोजी डॉ. मृदुला तापस यांची खरोष्ठी लिपी, १३ मार्च रोजी डॉ. पल्लवी कावळे यांची शारदा लिपी, १४ मार्च रोजी डॉ. मृदुला तापस यांची मोडी लिपी या विषयावर माहितीपूर्ण व्याख्याने झाली. या व्याख्यानाला एकूण ३५ विद्यार्थी उपस्थित होते. व्याख्यान कक्ष क्र. ५०१ मध्ये झाले.

१२. ईशावास्योपनिषद या विषयावर तीन दिवसीय व्याख्यानमाला

संस्कृत भाषा आणि साहित्य विभाग अभिनव भारती वारंगा कॅम्पसमध्ये २ एप्रिल ते ४ एप्रिल २०२४ या कालावधीत ईशावास्योपनिषद या विषयावर तीन दिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती, भारतीय धर्म, संस्कृती आणि तत्त्वज्ञान विभागाचे अधिष्ठाता माननीय प्रा.मधुसूदन पेन्ना यांनी या मालिकेत व्याख्याने दिली. ३ दिवस चाललेल्या या व्याख्यानाला एकूण ३६ विद्यार्थी उपस्थित होते. व्याख्यान कक्ष क्र. ५०१ मध्ये झाले.

१३. सौंदर्यशास्त्र या विषयावर विशेष व्याख्यान

प्रो. नंदा पुरी, सेवानिवृत्त अधिष्ठाता संस्कृत–संस्कृतेतरभाषा–संकाय, ककासंवि यांनी १३ एप्रिल २०२४ रोजी अभिनव भारती वारंगा कॅम्पस येथे संस्कृत सौंदर्यशास्त्र या विषयावर विशेष व्याख्यान दिले. या व्याख्यानाला भारतीय धर्म, संस्कृती आणि तत्त्वज्ञान विभागाचे अधिष्ठाता माननीय प्रा.मधुसूदन पेन्ना यांची विशेष उपस्थिती लाभली. या व्याख्यानाला एकूण ४० विद्यार्थी उपस्थित होते. व्याख्यान कक्ष क्र. ५०१ मध्ये झाले.

१४. संशोधन पद्धतीवर विशेष व्याख्यान

ककासंवि च्या आधुनिक भाषा विभागाचे प्रमुख प्रा. पराग जोशी यांनी अभिनव भारती वारंगा कॅम्पस येथे ०४ नोव्हेंबर २०२४ रोजी संशोधन पद्धतीवर विशेष व्याख्यान दिले. व्याख्यानाला एकूण ३१ विद्यार्थी उपस्थित होते. व्याख्यान कक्ष क्र. ५०१ मध्ये झाले.

१५. ग्रंथालय परिचय व भेट –

संस्कृतभाषा व साहित्य विभागातर्फे क.का.सं.वि. रामटेक येथे 'ग्रंथालय परिचय' या विषयावर ग्रंथपाल मा. डॉ. दीपक कापडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अतिशय सुलभपणे त्यांनी ग्रंथालयाची सुविधा आणि त्यासाठी करावी लागणारी प्रक्रिया यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कृत–संस्कृतेतर भाषासंकायाच्या अधिष्ठाता मा. प्रा. कविता होले, प्रा.पराग जोशी, डॉ. राजेंद्र जैन यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन विभागातील प्राध्यापक यांनी केले.

१६. विविध कामगिरीत विभागाचा सहभाग–

विश्वविद्यालयात वर्ष २०२३–२४ च्या सुरुवातीपासून प्रवेशप्रक्रिया, शैक्षणिक योजना व संकल्पसभा, NEP अभ्यासक्रम निर्माण, अभ्यासमंडळ सभा, संकाय सभा, विद्वतपरिषद सभा, नवनियुक्त अध्यापक विकास कार्यक्रम, संस्कृ तसप्ताह, कालिदास व्रती पुरस्कार, IKS प्रकल्प कार्य, परीक्षा विभागाशी संबंधित पेपर सेटिंग मॉडरेशन व वेळोवेळी प्रशासनिक कार्ये पार पाडली.

१७. प्राध्यापकांचा शैक्षणिक व इतर कार्य आढावा –

शैक्षणिक सत्र २०२३–२०२४ मध्ये विभागातील सर्व प्राध्यापकांनी विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्र व परिषदांमध्ये सहभाग घेऊन शोधनिबंध सादर केले व त्याकरिता विविध ठिकाणी भेटी दिल्या. त्यापैकी काही उल्लेखनीय बाबी–

१. विभागाच्या प्राध्यापिका, संकायाच्या मा. अधिष्ठाता व विभागप्रमुख प्रो. डॉ. कविता होले यांनी संकायप्रमुख आणि विभागप्रमुख म्हणून कार्यभार पार पाडला. महाराष्ट्र राज्य कालिदास साधना पुरस्कार समितीच्या छाननी व निवड सचिवपदाचा कार्यभार सांभाळला. त्यांनी विश्वविद्यालयाच्या IQAC संचालक आणि वित्त व लेखा अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभारही या वर्षी साभाळला. भासनाटकचक्रम् प्रकल्पा अंतर्गत त्यांनी एका नाट्याचे मराठीत भाषांतर व सर्व कृतींचे संपादन केले.

यांची यावर्षातील प्रकाशित शोधपत्रे ०४ प्रस्तुत शोधपत्रे ०३ असून ०८ विद्यार्थ्यांना पीएच. डी. करिता मार्गदर्शन करीत आहे. यांनी विविध (१ ठिकाणी) निमन्त्रित व्याख्याता म्हणून व्याख्याने दिली. यांना ०३ पुरस्कार प्राप्त झालेले आहे. सध्या दोन शोधप्रकल्पावर त्यांचे कार्य सुरु आहे.

२. प्रो. डॉ. पराग जोशी प्राध्यापक पदावर कार्यरत असून यांनी संशोधन (कोर्सवर्क) समन्वयक म्हणून अतिरिक्त कार्यभार सांभाळला. त्यांनी विश्वविद्यालयाच्या IQAC समन्वयक आणि विशेष कर्तव्य अधिकारी (OSD) पदाचा अतिरिक्त कार्यभारही या वर्षी सांभाळला. आधुनिक भाषा विभागाचे विभागप्रमुखांचा अतिरिक्त कार्यभार सुद्धा सांभाळला. भासनाटकचक्रम् प्रकल्पा अंतर्गत त्यांनी एका नाट्यचे मराठीत भाषांतर व सर्व कृतींचे कार्यकारी संपादन म्हणून कार्य केले.

यांची यावर्षातील प्रकाशित लेख ०३व शोधपत्रे ०१, प्रस्तुत शोधपत्रे ०४ असून यांनी आमंत्रित व्याख्याता म्हणून १२ ठिकाणी व्याख्याने दिली. यांना **'अलंकार विद्वन्मणि'** हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. ०५ विद्यार्थ्यांना पीएच. डी. करिता मार्गदर्शन करीत आहे.

३. डॉ. राजेन्द्र जैन हे सहायक प्राध्यापक पदावर कार्यरत असून यांनी हस्तलिखित स्रोत केंद्राचे (MRC) समन्वयक म्हणून कार्यभार पाहिला. हस्तलिखित संरक्षण केंद्राची (MCC) सामंजस्य करार पुरस्सर स्थापना केली व समन्वयक पदाचा अतिरिक्त कार्यभार ग्रहण केला. विद्यापीठ स्वयं समन्वयक तसेच, आय.एल.एम.एस. समन्वयक म्हणून देखील अतिरिक्त कार्यभार यांना देण्यात आला. भासनाटकचक्रम् प्रकल्पा अंतर्गत त्यांनी एका नाट्यचे मराठीत भाषांतर केले. राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालय, तिरुपती येथून **'संस्कृतरूपकेषु प्राकृतस्य स्थानं, स्वरूपं योगदानञ्च'** या विषयात डॉ. राजेन्द्र जैन यांनी द्वितीय पीएच. डी. जमा केली आहे.

यावर्षातील यांची प्रकाशित शोधपत्रे ०१ व प्रस्तुत शोधपत्रे ०३ आहेत. आमंत्रित व्याख्याता म्हणून ०४ ठिकाणी व्याख्याने दिली. ०३ विद्यार्थ्यांना पीएच. डी. करिता मार्गदर्शन करीत आहे.

४. डॉ. राघवेन्द्र भट हे सहायक प्राध्यापक पदावर रुजू झाले असून यांनी गुरुकुलमचा प्रधानाचार्य म्हणून पदभार सांभाळला, NAAC दस्तावेज निर्माण कार्यात यांचे विशेष सहकार्य लाभले. शास्त्रविद्यागुरुकुलमचा संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळला. या वर्षातील यांची प्रकाशित शोधपत्रे ०२ प्रस्तुत शोधपत्रे ०३ आहे. यांनी निमंत्रित व्याख्याता म्हणून ०१ ठिकाणी व्याख्यान दिले. भासनाटकचक्रम् प्रकल्पा अंतर्गत त्यांनी एका नाट्यचे मराठीत भाषांतर केले. एक पुरस्कार प्राप्त झालेला आहे. ०३ विद्यार्थ्यांना पीएच. डी. करिता मार्गदर्शन करीत आहे.

५. डॉ. राकेश रोशन हे (अस्थायी) सहायक प्राध्यापक पदावर रुजू झाले असून विभागातील पदवी व पदव्युत्तर वर्गांना त्यांनी विभागप्रमुखांच्या सूचनेनुसार अध्यापन केले. विभागाच्या वेगवेगळ्या कार्यात सहकार्य लाभले.

६. डॉ. पल्लवी कावळे या (अस्थायी) सहायक प्राध्यापक पदावर कार्यरत असून विभागातील पदवी व पदव्युत्तर वर्गाना त्यांनी विभागप्रमुखांच्या सूचनेनुसार अध्यापन केले. विभागाच्या वेगवेगळ्या कार्यात सहकार्य लाभले.

७. डॉ. मृदुला तापस या (अस्थायी) सहायक प्राध्यापक पदावर कार्यरत असून विभागातील पदवी व पदव्युत्तर वर्गाना त्यांनी विभागप्रमुखांच्या सूचनेनुसार अध्यापन केले. यावर्षातील यांची प्रकाशित शोधपत्रे ०२ व प्रस्तुत शोधपत्रे ०२ आहेत. विभागाच्या वेगवेगळ्या कार्यात सहकार्य लाभले.

८. डॉ. शुभंकर बसक हे (अस्थायी) सहायक प्राध्यापक पदावर कार्यरत असून विभागातील पदवी व पदव्युत्तर वर्गाना त्यांनी विभागप्रमुखांच्या सूचनेनुसार अध्यापन केले. यावर्षातील यांची प्रकाशित शोधपत्रे ०२ व प्रस्तुत शोधपत्रे ०२ आहेत. विभागाच्या वेगवेगळ्या कार्यात सहकार्य लाभले.

९. सौ. सुवर्णा केवटे या (अस्थायी) सहायक प्राध्यापक पदावर कार्यरत असून विभागातील पदवी व पदव्युत्तर वर्गाना त्यांनी विभागप्रमुखांच्या सूचनेनुसार अध्यापन केले. यावर्षातील यांची प्रकाशित शोधपत्रे ०५ व प्रस्तुत शोधपत्रे ०४ आहेत. विभागाच्या वेगवेगळ्या कार्यात सहकार्य लाभले.

१८. विद्यार्थ्यांचे यश, पुरस्कार व बक्षीसे –

खालीलप्रमाणे विद्यार्थ्यानी पुरस्कार व बक्षीसे प्राप्त करून यश संपादित केले.

१) अखिल भारतीय रूपक महोत्सव स्पर्धा

केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालय, दिल्ली यांच्याद्वारे दि. ०६ ते ९ मार्च २०२४ या कालावधीत जयपुर येथे आयोजित अखिल भारतीय रूपक महोत्सवात विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांची चमू सहभागी झाली होती. त्यात संस्कृत भाषा व साहित्य विभागाच्या कु. अद्वैता कुलकर्णी, कु. विरती गाला, कु. नुपूर कुलकर्णी, कु. देविका हिंगणीकर, या विद्यार्थ्यानी सहभाग घेतला होता. त्यापैकी कु. अद्वैता कुलकर्णी हिला **'बंडु अभिनयं करोति।'** या संस्कृत नाटकाच्या सादरीकरणासाठी प्रथम क्रमांक प्राप्त झाला. तसेच या नाटकासाठी राष्ट्रस्तरीय विशेष पुरस्कार स्वरूपात प्रमाणपत्र, स्मृतिचिह्न व रोख पारितोषिक सुद्धा प्राप्त झाले. प्रस्तुत नाटकाचे दिग्दर्शन प्रो.पराग जोशी, संस्कृत भाषा व साहित्य विभाग यांनी केले होते तसेच प्रो. कविता होले, संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय यांचे मार्गदर्शन लाभले.

२) पदवी प्रदान समारंभात सुवर्ण पदके व पीएच डी उपाधी प्राप्ती–

विश्वविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या अकरावे पदवी प्रदान समारंभात एम ए स्तरावर प्रथम म्हणून कु. राधा देशकर हिला सर्व विभागांमध्ये जास्त म्हणजेच एकूण सात सुवर्णपदके प्राप्त झाली आणि रोख पारितोषिक देखील देण्यात आले. तिला ही सुवर्णपदके सर्व विभागांमध्ये एम ए स्तरावर प्रथम राहिल्याबद्दल प्रदान करण्यात आली. तसेच, पदवी प्रदान समारंभात एम ए स्तरावर द्वितीय म्हणून कु. अद्वैता कुलकर्णी हिला देखील सुवर्णपदक आणि रोख पारितोषिक बहाल करण्यात आले.

तसेच देवव्रत चेटर्जी, अंजली जोशी, रोहिणी देशमुख, रोहिणी नांदे, अर्पिता हरडे, सरिता गिल्लुरकर, यास पीएच. डी. पदवी बहाल करण्यात आली. या कार्यात अनुक्रमे विभागीय प्राध्यापक प्रा. कविता होले, प्रा. पराग जोशी व प्रा. राजेंद्र जैन यांनी मार्गदर्शन केले होते.

३) संस्कृत सप्ताह स्पर्धामधील सहभाग

विश्वविद्यालयाच्या विस्तारसेवामंडळाच्या वतीने २२ ऑगस्ट २०२३ पासून आयोजित केलेल्या संस्कृत सभाहातील कार्यक्रमात विभागाच्या वतीने विभागीय स्नातक तसेच स्नातकोत्तर विद्यार्थ्याचा प्रश्नमंजूषा इत्यादि कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग राहिला.

४) संस्कृत संभाषण व प्रेरण वर्ग

विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरात परिसर संचालकांच्या मार्गदर्शनात जुलै २०२३ मध्ये सत्रारंभी संस्कृत संभाषण व प्रेरण वर्ग घेण्यात आला होता. प्रा. सुकान्त प्रामाणिक यांनी सर्व विभागीय विद्यार्थ्याकरिता प्रशिक्षित केले होते. सदर वर्गात विभागीय सर्व शास्त्री, एम ए आचार्य विद्यार्थ्याचा सहभाग यात होता.

५) धिषणा परिषद व शास्त्रार्थसभा सहभाग –

विश्वविद्यालयात प्रती सप्ताह धिषणा परिषद व प्रती माह शास्त्रार्थ सभेचे आयोजन केले जाते. धिषणा परिषदेत शास्त्री आचार्य तसेच, सामान्य बी ए व एम ए चे विद्यार्थी शास्त्रविषयावर संस्कृतात विषय प्रस्तुती करतात. यात विशेषत्वाने प्रती माह सर्व विभागीय विद्यार्थी गुरुकुल विभागाच्या वतीने शास्त्रार्थ शाळेत संस्कृत विषयावर पारंपरिक पद्धतीने शास्त्रार्थ व वाक्यार्थ केला जातो. यात विभागीय कु. माहेश्वरी आकरे, कु. निशा दुधकवरे, कु. ज्ञानेश्वरी बोरकर, कु.धनश्री शर्मा, कु. आचल वालदे, कु. अनुज मंचावार, कु. विरती गाला, कु. देविका हिंगणीकर, कु. सई कावडकर, कु. राजरी ढबाले , कु. जानकी फोलाने, कु. रेवती येनारकर यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

६) संक्रमणोत्सव सहभाग –

विश्वविद्यालयात १४ फेब्रुवारी २०२४ रोजी संक्रमणोत्सवाचे (कॉलेज डे) आयोजन करण्यात आले होते. यात विभागीय सर्व विद्यार्थ्यानी विविध स्पर्धामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

* * *

भारतीय दर्शन विभाग

स्थापना – **वर्ष 2000**

संकाय – **भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय**

अभ्यासक्रम – **सम्मानित शास्त्री (दर्शन), आचार्य (दर्शन) एम्. ए., एम्. फिल्., पीएच्.डी. दर्शनशास्त्र आणि योगशास्त्र**

अधिष्ठाता – **प्रो. मधुसूदन पेन्ना**

विभाग प्रमुख व प्राध्यापिका – डॉ. कलापिनी अगस्ती, सहयोगी प्राध्यापिका

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 24

उद्दिष्टे –

- प्राचीन भारतीय धर्मविषयक तथ्यांचा अभ्यास करणे
- भारतीय दर्शन परंपरेचे अध्ययन व संशोधन करणे
- भारतीय आणि अन्य संस्कृती यांचा तौलनिक अभ्यास करणे
- भारतीय व पाश्चात्त्य दर्शन तसेच तत्त्वज्ञानविषयक विचार व ग्रंथ यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- संशोधनातील गुणवत्ता राखण्यासाठी आणि वाढविण्यासाठी संशोधनाधारित कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- रूसा अंतर्गत काही संशोधन प्रकल्पांचा प्रस्ताव सादर.
- भारतीय दर्शन या अंतर्गत तसेच वेदान्त, योग–सांख्य दर्शन इ. मध्ये एम्. फिल्., आचार्य पदवीसाठी संशोधन

भारतीय दर्शन विभाग

गीता जयंती उत्सव 20-22 डिसेंबर 2023

दरवर्षीप्रमाणे या वर्षी गीता जयंती ही 22 डिसेंबर रोजी असल्याने त्यानिमित्त कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे तीन दिवसीय गीता पारायणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. दि. 20 डिसेंबर 2023 रोजी सकाळी 8.30 वाजता भगवद्गीतेच्या सामुहिक पारायणाला सुरुवात झाली. प्रत्येक दिवशी सहा अध्यायांचे सामुहिक पारायण या निमित्ताने करण्यात येते. या सामुहिक पारायणात विश्वविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच अन्य नागरिक यांनी सहभाग घेतला. हे पारायण योग विज्ञान विभागाच्या अंतर्वीक्षा ध्यानकेन्द्रात घेण्यात आले. दि. 20 डिसेंबर 2023 रोजी पहिल्या दिवशी विद्यार्थी व शिक्षक मिळून एकूण 38 जणांनी गीता पारायण केले. दुसऱ्या दिवशी 21 डिसेंबर 2023 रोजी एकूण 45 जणांनी यात सहभाग नोंदवला. तर तिसऱ्या दिवशी म्हणजेच गीता जयंतीच्या दिवशी 22 डिसेंबर 2023 रोजी विद्यार्थी, शिक्षक व नागरिक असे एकूण 63 जणांनी सामुहिक गीता पारायण केले. गीता पारायणाची सांगता गीतेच्या आरतीने करण्यात आली. आरती करिता प्रमुख अतिथी म्हणुन प्रो. हरेकृष्ण अगस्ती, परिसर संचालक, प.पू. गुरुजी गोळवलकर गुरुकुलम् परिसर, क.का.सं.वि., रामटेक आणि प्रो. कलापिनी अगस्ती, विभाग प्रमुख, भारतीय दर्शन विभाग, क.का.सं.वि., रामटेक हे उपस्थित होते. आरती नंतर सर्वांना प्रसाद वितरण करण्यात आला. या कार्यक्रमाचे संयोजन प्रो. कलापिनी अगस्ती यांनी केले तर समन्वयन व सूत्रसंचालन श्री. सचिन डावरे, सहायक प्राध्यापक, भारतीय दर्शन विभाग, क.का.सं.वि., रामटेक यांनी केले. हा कार्यक्रम घडवुन आणण्याकरीता भारतीय दर्शन विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे साहाय्य केले.

भारतीय भाषा अनुवाद कार्यशाला

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 च्या अनुषंगाने भारतीय भाषेचे महत्त्व लक्षात घेऊन भारतीय भाषेमध्ये अनुवादाची गरज वाढत चालली आहे. सद्यस्थितीत बहुभाषिकतेस प्रोत्साहन देण्याकरीता अनुवाद कार्य महत्त्वपूर्ण झाले आहे. तसेच विविध विषयांचे साहित्य भारतीय भाषेत भाषांतरीत करणे याची देखिल आवश्यकता वाढत आहे. भारतीय भाषांतून अनुवादाची एक सशक्त व्यवस्थी निर्माण करण्यासाठी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे आणि भारतीय भाषा समितीद्वारे द्विदिवसीय ''भारतीय भाषा अनुवाद कार्यशाला'' आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेकरीता भारतीय भाषा समितीकडुन अनुदान प्राप्त झाले. ही कार्यशाळा 6 व 7 जानेवारी 2024 या दिवशी घेण्यात आली. या द्विदिवसीय कार्यशाळेत एकूण आठ सत्र घेण्यात आले. या कार्यशाळेची कल्पना व प्रेरणा विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी यांची राहिली. मार्गदर्शक म्हणुन विश्वविद्यालयाचे मा. कुलसचिव प्रो. कृष्णकुमार पाण्डेय यांनी कार्य पाहिले. या कार्यशाळेकरीता स्रोत तज्ञ म्हणुन श्री. सुधीष्ठ मिश्रा, श्री. संजीव कुमार व डॉ. तिलक राव ही तज्ञ मंडळी उपस्थित राहिली. या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन भारतीय धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृती संकायाचे अधिष्ठाता प्रो. मधुसूदन पेन्ना यांनी केले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणुन भारतीय दर्शन विभागाच्या विभाग प्रमुख प्रो. कलापिनी अगस्ती तसेच भारतीय भाषा समितीचे शैक्षणिक समन्वयक डॉ. चंदन श्रीवास्तव यांनी कार्य पाहिले. सहसमन्वयक म्हणुन शास्त्रविद्यागुरुकुलम् चे सहायक प्राध्यापक श्री सचिन द्विवेदी आणि भारतीय दर्शन विभागाचे सहायक प्राध्यापक श्री. सचिन डावरे यांनी

कार्य पाहिले. या कार्यशाळेकरीता विद्यार्थी, शोधछात्र व प्राध्यापक अशा 214 सहभागींनी उपस्थिती नोंदविली. ही कार्यशाळा प्रत्यक्ष व आभासी माध्यमाने सहभागींकरीता उपलब्ध होती. यामध्ये 100 जणांचा प्रत्यक्ष सहभाग तर आभासी माध्यमाने एकूण 114 जणांनी सहभाग नोंदविला. सर्व सहभागींना व आयोजकांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

अखिलभारतीया दशदिवसीय तर्कसङ्ग्रह-न्यायबोधिनी-पदकृत्य दीपिकासहिता कार्यशाला

अखिलभारतीया दशदिवसीय तर्कसङ्ग्रह-न्यायबोधिनी-पदकृत्य दीपिकासहिता कार्यशाला दि. 11.03.2024 ते 20.03.2024 पर्यंत ऑनलाईन माध्यमाने घेण्यात आली. या कार्यशाळेकरीता खालीलप्रमाणे विविध विश्वविद्यालयातील प्राध्यापकांची व्याख्याने झाली.

Sr. No	***Day***	***Sessions***
1	11 मार्च 2024 5.00 pm - 6.00 pm प्रो. हरेराम त्रिपाठी, मा. कुलगुरु, क.का.सं.वि., रामटेक प्रो. सच्चिदानंद मिश्र, ICPR, सदस्य सचिव	**उद्घाटन सत्र** **Inaugural Session** • About the workshop • Key expectations/outcomes • Inaugural addresses by invited dignitaries उद्देशप्रकरणम् • मङ्गलाचरणम् • पदार्थभेदाः • द्रव्यभेदाः • गुणभेदाः • कर्मभेदाः • सामान्यविशेषभेदाः • समवायलक्षणम् • अभावभेदाः
2	12 मार्च 2024 5.00 pm - 6.00 pm प्रो. मधुसूदन पेन्ना, क.का.सं.वि., (मा. अधिष्ठाता, भारतीय धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृती संकाय)	द्रव्यलक्षणप्रकरणम् • पृथिव्याः लक्षणं तद्भेदाश्च • अपां लक्षणं तद्भेदाश्च • तेजसो लक्षणं तद्भेदाश्च • वायोर्लक्षणं तद्भेदाश्च • अथ कार्योत्पत्तिविनाशक्रमः • आकाशलक्षणं • काललक्षणं • भेदपूर्वकमात्मनो लक्षणम् • मनसो लक्षणम्

3	13 मार्च 2024 5.00 pm - 6.00 pm प्रो. मधुसूदन पेन्ना, क.का.सं.वि., (मा. अधिष्ठाता, भारतीय धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृती संकाय)	**गुणलक्षणप्रकरणम्** • रूपलक्षणं तद्भेदाश्च • रसलक्षणं तद्भेदाश्च • सभेदगन्धलक्षणम् स्पर्शलक्षणम् • पाकप्रक्रियानिरूपणम्
4	14 मार्च 2024 5.00 pm - 6.00 pm प्रो. विष्णुपद महापात्र, न्यायविभाग, SLBSNSU, New Delhi	**गुणलक्षणप्रकरणम्** • सङ्ख्यानिरूपणम् • परिमाणलक्षणं तद्भेदाश्च • पृथक्त्व-संयोग-विभाग-परत्वापरत्व-गुरुत्व-सभेदद्रवत्व-स्नेह-सभेदशब्दलक्षणम्
5	15 मार्च 2024 5.00 pm - 6.00 pm प्रो. विष्णुपद महापात्र, न्यायविभाग, SLBSNSU, New Delhi	गुणलक्षणप्रकरणम् • बुद्धिलक्षणम् • स्मृतेर्लक्षणम् • अनुभवलक्षणम् • सोदाहरणं यथार्थानुभवलक्षणम् • सोदाहरणमयथार्थानुभवलक्षणम् • करणसहितयथार्थानुभवभेदाः
6	16 मार्च 2024 5.00 pm - 6.00 pm प्रो. महानन्द झा, न्याय विभाग, SLBSNSU, New Delhi.	गुणलक्षणप्रकरणम् • करणलक्षणम् • कारण-कार्य लक्षणम् • कारणभेदास्तल्लक्षणानि च • कारणस्य निकृष्टलक्षणम् • सभेदप्रत्यक्षनिरूपणम् • सभेदसन्निकर्षनिरूपणम्
7	17 मार्च 2024 5.00 pm - 6.00 pm प्रो. रामचन्द्र शर्मा, न्याय विभाग, SLBSNSU, New Delhi.	अनुमानप्रकरणम् • अनुमाननिरूपणम् • परामर्शलक्षणम् • व्याप्तिनिरूपणम् • पक्षधर्मतालक्षणम्

8	18 मार्च 2024 5.00 pm - 6.00 pm प्रो. विष्णुपद महापात्र, न्यायविभाग, SLBSNSU, New Delhi	अनुमानप्रकरणम् • सावयवानुमानभेदनिरूपणम् • स्वार्थ-परार्थानुमितेः करणम् • विभागपूर्वकलिङ्गनिरूपणम् • पक्षादिनिरूपणम् • हेत्वाभासनिरूपणम्
9	19 मार्च 2024 5.00 pm - 6.00 pm प्रो. सच्चिदानंद स्नेही, CSU, श्री. रघुनाथ कीर्ति परिसर, देवप्रयाग (उत्तराखण्ड)	उपमाननिरूपणम् शब्दनिरूपणम् • शब्दप्रमाणस्वरूपम् • वाक्यार्थज्ञाने हेत्वस्तानि लक्षणानि • वाक्यभेदाः शाब्दज्ञानस्वरूपञ्च • प्रामाण्यवादनिरूपणम्
10	20 मार्च 2024 5.00 pm - 6.00 pm 1) प्रो. हरेराम त्रिपाठी (अध्यक्ष) 2) प्रो. रामकिशोर त्रिपाठी (अतिथी) 3) प्रो. रामनारायण द्विवेदी (सारस्वत अतिथी)	अवशिष्टगुणनिरूपणम् • अयथार्थभेदनिरूपणम् • तर्कस्य लक्षणोदाहरणम् • स्मृतिभेदनिरूपणम् • सुखादेर्लक्षणानि • कर्मलक्षणं तद्भेदाश्च • सभेदसामान्यनिरूपणम् • विशेष-समवाय-अभाव-निरूपणम् समापन समारोह

ही सर्व व्याख्याने भारतीय दर्शन विभागाद्वारे ध्वनिमुद्रित करण्यात आली आहेत. ही सर्व व्याख्याने विश्वविद्यालयाच्या आय.एल.एम. एस. प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करण्यात येतील. या कार्यशाळेकरीता अन्य विश्वविद्यालयातून 7 विद्वान व्याख्याते तर कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातून 1 अशा सर्व व्याख्यातांनी एकूण 9 दिवस9 व्याख्याने दिली. या कार्यशाळेकरीता एकूण 212 प्रतिभागींनी पंजीकरण केले. त्यांपैकी 60 प्रतिभागी नियमित पणे या कार्यशाळेकरीता उपस्थित राहिले. या कार्यशाळेचे संयोजन भारतीय दर्शन विभागाच्या विभागप्रमुख प्रो. कलापिनी अगस्ती यांनी केले. समन्वयक म्हणुन भारतीय दर्शन विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. नवीन कुमार यांनी कार्य पाहिले. सहसमन्वयक म्हणुन सहायक प्राध्यापक श्री. सचिन डावरे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुक्तस्वाध्यायपीठाचे सहायक प्राध्यापक डॉ. मोहनलाल शर्मा यांनी केले. कार्यशाळेकरीता एकूण खर्च **रू.18,000/-** एवढा खर्च झाला.

जगद्गुरु श्री. शङ्कराचार्य विचारगोष्ठी

मा. कुलगुरुंच्या आदेशान्वये भारतीय दर्शन विभाग आणि भारतीय भाषा समितीद्वारे जगद्गुरु श्री. शङ्कराचार्य विचारगोष्ठी कार्यक्रम दि. 27 मार्चे 2024 रोजी विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरात घेण्यात आला. या एकदिवसीय विचारगोष्ठी मध्ये खालील पाच व्याख्यात्यांची व्याख्याने झाली.

अ.क्र.	नाव	पद
1.	प्रो. पराग जोशी	विभाग प्रमुख, आधुनिक भाषा व संस्कृत भाषा विभाग, क.का.सं.वि., रामटेक
2.	प्रो. प्रसाद गोखले	विभागप्रमुख, वेदांग ज्योतिष विभाग, क.का.सं.वि., रामटेक
3.	प्रो. कृष्णकुमार पाण्डेय	संकायप्रमुख, प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्र, क.का.सं.वि., रामटेक
4.	डॉ. अमित भार्गव	सहायक प्राध्यापक, शास्त्रविद्यागुरुकुलम्, क.का.सं.वि., रामटेक
5.	डॉ. सचिन द्विवेदी	सहायक प्राध्यापक, शास्त्रविद्यागुरुकुलम्, क.का.सं.वि., रामटेक

या कार्यक्रमामध्ये विश्वविद्यालयाचे विद्यार्थी, शोधछात्र, अध्यापक, कर्मचारी तसेच अन्य नागरिकांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाकरीता एकूण 144 सहभागींनी नोंदणी केली. कार्यक्रमाची सुरुवात उद्घाटनसत्राने झाली. सकाळी 10.30 वाजता विचारगोष्ठीचे उद्घाटन विश्वविद्यालयाचे मा. कुलसचिव प्रो. कृष्णकुमार पाण्डेय यांच्या अध्यक्षतेत करण्यात आले. पहिल्या सत्रात प्रो. पराग जोशी यांचे व्याख्यान झाले. त्यानंतर प्रो. प्रसाद गोखले यांचे व्याख्यान झाले. दुपारी 1.30 वाजता भोजनाकरीता अवकाश देण्यात आला. भोजनानंतर डॉ. अमित भार्गव यांचे व्याख्यान झाले. त्यानंतर डॉ. सचिन द्विवेदी यांचे व्याख्यान झाले.

शेवटी समारोप सत्रामध्ये प्रो. कृष्णकुमार पाण्डेय यांचे व्याख्यान व मार्गदर्शन सर्व सहभागींना लाभले. समारोप सत्रात सहभाग्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात आपला अभिप्राय व्यक्त केला. श्री. शङ्कराचार्य द्वारा रचित स्तवन गायनाने विचारगोष्ठीचा समारोप झाला. समारोप सत्रानंतर सर्व सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले. या सर्व कार्यक्रमाचे समन्वयन भारतीय धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृती संकायाचे संकायप्रमुख प्रो. मधुसूदन पेन्ना यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारतीय दर्शन विभागाची शोधछात्रा श्रद्धा देवपुजारी , शास्त्री दर्शन च्या विद्यार्थीनी कृतिका जैन आणि ईशा मशानकर यांनी केले. कार्यक्रमाचे सहसमन्वयन भारतीय दर्शन विभागाच्या विभागप्रमुख प्रो. कलापिनी अगस्ती यांनी केले. या कार्यक्रमाकरीता भारतीय दर्शन विभागाचे अध्यापक व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

* * *

वेदांग ज्योतिष विभाग

स्थापना – वर्ष 2009

संकाय – प्राचीन भारतीय विज्ञान आणि मानव्यशास्त्रे संकाय

अभ्यासक्रम – एम्. ए., एम्. फिल्., पीएच्.डी. वेदांग ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र

अधिष्ठाता – प्रो. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय

विभाग प्रमुख – प्रो. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय

प्राध्यापक – डॉ. प्रसाद गोखले

सहयोगी प्राध्यापक – डॉ. दिनकर मराठे

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 05

उद्दिष्टे –

- प्राचीन भारतीय विज्ञान आणि आधुनिक विज्ञानाचे तौलनिक अध्ययन करणे
- वेदांग ज्योतिष हे प्राचीन भारतीय शास्त्र म्हणून समाजात प्रस्थापित करणे.
- वेदांग ज्योतिष आणि वास्तुशास्त्राबद्दलचे गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करणे.
- वैदिक साहित्यात दिसून येणाऱ्या प्राचीन भारतीय विज्ञानाच्या बीजांचे सखोल संशोधन करणे
- संस्कृत साहित्याचे मानव्यशास्त्रासाठी असलेले योगदान विविध परिषदा, अध्ययन, सेमिनार या माध्यमातून प्रभावीपणे अधोरेखित करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

1 **आंतरविभागीय संशोधन**

वास्तु व आधुनिक स्थापत्यशास्त्र, सिद्धान्त ज्योतिष व आधुनिक खगोलविज्ञान, मेघ गर्भ लक्षण आणि आधुनिक पर्जन्य अंदाज, आधुनिक ज्योतिषशास्त्र व आयुर्वेद यांमधील आंतविभागीय संशोधनास चालना देणे.

2 **हस्तलिखितांचे संपादन**

- विभागाद्वारे प्राचीन हस्तलिखितांचा अभ्यास, संशोधन व संपादन करण्यास एम्. फिल्. व पीएच्.डी. च्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे.
- 'जैमिनी सूत्रावरील हस्तलिखिताचे त्याच्या सर्व टीकांसहित पाठचिकित्सा व संपादन' या प्रकल्पाचे कार्य सुरू आहे.

वेदांग ज्योतिष विभाग

- **३९वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा** :

  ०३/०७/२०२३ रोजी ३९वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. **"गुरु पूर्णिमा"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, व्याख्याता प्रो. प्रसाद गोखले, संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ. अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ३५ विद्यार्थी उपस्थित होते.

- **सप्त-दिवसीय "ज्योतिष शास्त्र" कार्यशाळा** :

  १२-१९/०७/२०२३ रोजी वेदांग ज्योतिष विभाग द्वारा **"ज्योतिष शास्त्र"** या विषयावर सप्त-दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे अध्यक्ष वेदांग ज्योतिष विभाग प्रमुख मा. प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, प्रशिक्षक डॉ. आशिष जे., डॉ.ऋषिकेश साहू, डॉ.पंकज शर्मा, डॉ.अंबालिका सेठिया, डॉ. प्रणव मुळे, संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ.अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ३८ विद्यार्थी उपस्थित होते.

- **४०वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा** :

  २६/०७/२०२३ रोजी ४०वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. **"अधिक मास"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, व्याख्याता प्रो. प्रसाद गोखले, संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ. अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ५२ विद्यार्थी उपस्थित होते.

- **४१वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा** :

  ०४/०८/२०२३ रोजी ४१वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. **"चातुर्मास"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, प्रमुख व्याख्याता डॉ. ऋषिकेश साहू, सारस्वत व्याख्याता डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ. अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ४५ विद्यार्थी उपस्थित होते.

- **आर्यभट्ट नक्षत्र दर्शन (तारामंडळ) :**

  कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक येथील आईकेएस केंद्रा तर्फे 1 ते 5 ऑगस्ट 2023 पर्यन्त "रिविस्टिंग इंडिक हेरिटेज: एन एक्सपेरिमेंटल वर्कशॉप" या पांच दिवसीय कार्यशाळे चे आयोजन केले गेले, यावेळी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदांग ज्योतिष विभागाने प्रतिभागिंसाठी **'आर्यभट्ट नक्षत्र दर्शन कार्यक्रम'** 4 ऑगस्ट , 2023 रोजी सायंकाळी 5.30 वा , अकादमिक भवन, रामटेक परिसर , रामटेक येथे आयोजित केला विद्यार्थी आणि सामान्य लोकांनी

तारामंडळाचा अनुभव घेतला आणि नक्षत्रांबद्दल माहिती घेतली, या कार्यक्रमात ५२ लोकांनी उत्साहपूर्वक सहभाग घेतला' या आयोजनात डॉ. आशीष यांनी तांत्रिक साहाय्य प्रदान केले तसेच उदघाटन प्रो. कृष्णकुमार पांडेय यांच्या हस्ते झाले.

- **४२वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा :**

  १५/०८/२०२३ रोजी ४२वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. संस्कृत महोत्सवांतर्गत **"श्रावण मास"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, प्रमुख व्याख्याता श्री. प्रसाद अयाचित, संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ. अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ३४ विद्यार्थी उपस्थित होते.

- **४३वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा :**

  ०२/०९/२०२३ रोजी ४३वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. संस्कृत महोत्सवांतर्गत **"कृष्ण जन्माष्टमी"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, व्याख्याता डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ. अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ३७ विद्यार्थी उपस्थित होते.

8. **ज्योतिष संवाद :**

   4-09-2023 रोजी, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेकच्या वेदांग ज्योतिष विभागामध्ये समाजाच्या कल्याणासाठी आणि ज्योतिषाच्या प्रचारासाठी, संस्कृत महोत्सवांतर्गत या सर्व विषयांवर "ज्योतिष संवादाचे" आयोजन करण्यात आले होते. ज्योतिषशास्त्र का आणि काय शिकले पाहिजे यावर चर्चा केली.त्याचा व्यवहारात उपयोग. या बैठकीत वेदांग ज्योतिष व विस्तार मंडळाचे विभागप्रमुख प्रा.कृष्णकुमार पांडेय अध्यक्षस्थानी होते. या विषयावर डॉ.पंकज शर्मा यांचे एक विशेष व्याख्यान झाले असून या विषयावर विशेष व्याख्यान डॉ.आशिष जे. यांनी दिले. या संवादात अनेकांनी सहभाग घेतला आणि त्यांचे वैयक्तिक प्रश्नही विचारले ज्यांना आमचे विभाग प्रमुख श्री कृष्ण कुमार पांडेय यांनी उत्तरे दिली. या संवादात वेदांग ज्योतिषाचे इतर प्राध्यापकही उपस्थित होते. सकाळच्या सत्रात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

- **'वास्तु संवाद':**

  4-09-2023 रोजी सकाळी 10 ते 11 या वेळेत कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेकच्या वेदांग ज्योतिष विभागातर्फे संस्कृत महोत्सवांतर्गत **"वास्तु संवाद"** हे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वास्तु आणि त्याचे समाजात मूल्य आणि वास्तुशास्त्र हे कसे विज्ञान आणि कला आहे या विषयावर वास्तु संवादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात युनिव्हर्सल ऑरा स्कॅनरचा प्रयोग करण्यात आला. युनिव्हर्सल ऑरा स्कॅनर एखाद्या व्यक्तीमधील सकारात्मक आणि नकारात्मक उर्जेची टक्केवारी शोधतो, मोजतो आणि त्याचे विश्लेषण करतो. ऑरा स्कॅनिंग उपकरणे एखाद्या

संरचनेतील संभाव्य वास्तुदोष (असंतुलन) ओळखण्यासाठी लोक कसे वापरले जातात. ही सर्व माहिती वेदांगचे विभागप्रमुख ज्योतिष प्रा. कृष्ण कुमार पांडे डॉ. आशिष ज, डॉ हृषिकेश साहू, डॉ. पंकज शर्मा, श्री अनुज शर्मा, श्री. अक्षय पांडे यांनी दिली. हा कार्यक्रम मुख्य गेटच्या गड मंदिर येथे पार पडला.

- **"ज्योतिष शास्त्र गोष्ठी"** –

०८/०९/२०२३ रोजी वेदांग ज्योतिष विभाग द्वारा संस्कृत महोत्सव २०२३ च्या अन्तर्गत **"ज्योतिष शास्त्र गोष्ठी"** चे आयोजन महालक्ष्मी मंदीर, जयप्रकाश नगर, नागपुर येथे जनसामान्यांमध्ये करण्यात आले होते. यामध्ये अध्यक्ष म्हणून वेदांग ज्योतिष विभाग प्रमुख मा. प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ.अंबालिका सेठिया होत्या. ३२ सहभागी प्रत्यक्षरूपाने उपस्थित होते.

- **"वास्तु शास्त्र प्रश्नोत्तरी"**:

०९/०९/२०२३ रोजी वेदांग ज्योतिष विभाग द्वारा संस्कृत महोत्सव २०२३ च्या अन्तर्गत **"वास्तु शास्त्र प्रश्नोत्तरी"** चे आयोजन श्री हनुमान मंदीर, गोपाल नगर, नागपुर येथे जनसामान्यांमध्ये करण्यात आले होते. यामध्ये अध्यक्ष म्हणून वेदांग ज्योतिष विभाग प्रमुख मा. प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ.अंबालिका सेठिया होत्या. ६ सहभागी प्रत्यक्षरूपाने उपस्थित होते.

- **Pannal Discussion on Jyotish Shastra"**:

११/०९/२०२३ रोजी वेदांग ज्योतिष विभाग द्वारा संस्कृत महोत्सव २०२३ च्या अन्तर्गत **"Pannal Discussion on Jyotish Shastra"** चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अध्यक्ष म्हणून वेदांग ज्योतिष विभाग प्रमुख मा. प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, Pannal Discussion कर्त्यांमध्ये प्रो. प्रसाद गोखले व डॉ. दिनकर मराठे होते व संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ.अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ५८ विद्यार्थी उपस्थित होते.

- **४४वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा**

२९/०९/२०२३ रोजी ४४वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. **"पितृपक्ष"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, व्याख्याता डॉ. दिनकर मराठे, संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ. अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ४३ विद्यार्थी उपस्थित होते.

- **भास्कराचार्य व्याख्यानमाला** :

13-10-2023 रोजी दुपारी 4.30 वाजता कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वेदांगज्योतीष विभागातर्फे 2023-24 या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाचे रामटेक परिसरातले शास्त्रार्थशाळा येथे **भास्कराचार्य व्याख्यानमालेचे** आयोजन करण्यात आले होते. वक्ते होते प्रा. विनोद कुमार शर्मा, प्रमुख, ज्योतिष विभाग, श्री लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी-दिल्ली. 'ज्योतिष-

शास्त्रे-कर्मसिद्धांत' या विषयावर आपले विचार मांडताना प्रा. विनोद कुमार शर्मा यांनी विद्यार्थ्यांसाठी दैनंदिन जीवनातील उदाहरणासह संकल्पना स्पष्ट केली. कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे विभाग शिक्षक आणि ७८ विद्यार्थी आणि संशोधक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

- **४५वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा** :

१४/१०/२०२३ रोजी ४५वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. **"शारदीय नवरात्र"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, व्याख्याता डॉ. आशिष जे., संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ. अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ४४ विद्यार्थी उपस्थित होते.

- **४६वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा** :

२७/१०/२०२३ रोजी ४६वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. **"शरद् पूर्णिमा"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, व्याख्याता डॉ. अंबालिका सेठिया व संयोजक डॉ. प्रणव मुळे होते. वेदांग ज्योतिषविभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ३८ विद्यार्थी उपस्थित होते.

- **४७वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा** :

०८/११/२०२३ रोजी ४७वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. **"दीपावली"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, व्याख्याता प्रो. प्रसाद गोखले, संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ. अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ५५ विद्यार्थी उपस्थित होते.

- **त्रि-दिवसीय कार्यशाळा "कालविमर्श":**

२२-२४/११/२०२३ रोजी वेदांग ज्योतिष विभाग द्वारा **"कालविमर्श"** या विषयावर त्रि-दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे अध्यक्ष वेदांग ज्योतिष विभाग प्रमुख मा. प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, प्रशिक्षक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ.अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं १८ विद्यार्थी उपस्थित होते.

- **त्रि-दिवसीय कार्यशाळा "ग्रहयोग"**

२२-२४/११/२०२३ रोजी वेदांग ज्योतिष विभाग द्वारा **"ग्रहयोग"** या विषयावर त्रि-दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे अध्यक्ष वेदांग ज्योतिष विभाग प्रमुख मा. प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, प्रशिक्षक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ.अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं १९ विद्यार्थी उपस्थित होते.

- **“वास्तुशास्त्र व्याख्यानमाला”:**

  २३/११/२०२३ ते २५/११/२०२३ वेळ संध्याकाळी ७:३० ते ८:३० पर्यंत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे त्रिदिवसीय **“वास्तुशास्त्र व्याख्यानमालेचे”** आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रेरक मा. कुलगुरु आचार्य हरेराम त्रिपाठी महोदय व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय महोदय होते. व्याख्यानकर्ती डॉ. अंबालिका सेठिया तर समन्वक डॉ. प्रणव मुळे होते. या त्रिदिवसीय व्याख्यानमालेत वास्तुशास्त्राच्या विविध विषयांवर विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करण्यात आले. वास्तुउत्पत्ती, वास्तु प्रकार, भूमि परीक्षा, शुभाशुभ भूमी लक्षण, शल्य-शल्योद्धार, गृहस्वामी कर्तव्य, भूमीशुद्धी, पंचवास्तु, एकाशीतिपदवास्तु, द्विशाल-त्रिशाल वास्तु, पिण्ड साधन, गृह मेलापक, द्वार विचार, द्वारवेध, शुभाशुभ वृक्ष विचार, जलाशय विचार, ग्रामवास, काकिणी, नराकृती, गृहारंभ मुहूर्त, गृहप्रवेश मुहूर्त ईत्यादी वास्तुशास्त्रीय विषयांवर डॉ. अंबालिका सेठिया यांनी व्याख्यानमालेला उपस्थित ७१ विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. Online व Offline माध्यमाने या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते, यात M.A. 1st sem ज्योतिर्विज्ञान (NEP) चे १६ विद्यार्थी, P.G. Diploma in वेदांग ज्योतिष चे १८ विद्यार्थी, P.G. Diploma in वास्तुशास्त्र चे १० विद्यार्थी, Diploma in वास्तुशास्त्र चे ६ विद्यार्थी, M.A. हिन्दू Studies चे ७ विद्यार्थी, ODL Certificate course in वास्तुशास्त्र चे ६ विद्यार्थी, Diploma in वास्तुशास्त्र रत्नागिरी चे ८ विद्यार्थी असे एकून ७ अभ्यासक्रमांचे विद्यार्थी उपस्थित होते.

- **“अष्टकवर्ग प्रशिक्षणवर्ग”:**

  २३/११/२०२३ ते २५/११/२०२३ वेळ सकाळी ११:३० ते दुपारी १:३० पर्यंत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे त्रिदिवसीय **“अष्टकवर्ग प्रशिक्षणवर्गाचे”** आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रेरक मा. कुलगुरु आचार्य हरेराम त्रिपाठी महोदय व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय महोदय होते. प्रशिक्षक डॉ. अंबालिका सेठिया तर समन्वक डॉ. प्रणव मुळे होते. या त्रिदिवसीय व्याख्यानमालेत अष्टकवर्ग म्हणजे काय?, अष्टकवर्ग विधि व नियम, सूर्यादी ग्रहांच्या अष्टकवर्ग कुण्डली, सर्वरेख्य चक्र, जातकाच्या जीवनातीन तीन अवस्था फळे, शुभाशुभ फल ईत्यादी विषयांवर डॉ. अंबालिका सेठिया यांनी व्याख्यानमालेला उपस्थित विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. Online व Offline माध्यमाने या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

- **४८वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा:**

  १५/१२/२०२३ रोजी ४८वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. **“धनुर्मास”** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, व्याख्याता श्री. अनुज शर्मा, संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ. अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ३६ विद्यार्थी उपस्थित होते.

- **४९वीं वाक्यार्थ सभा** :

  ३०/१२/२०२३ रोजी ४९वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. **"सौरगणना"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, व्याख्याता डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ. अंबालिका सेठिया होत्या. वेदांगज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ३१ विद्यार्थी उपस्थित होते.

- **५०वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा :**

  १३/०१/२०२४ रोजी ५०वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. **"उत्तरायण"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, व्याख्याता डॉ. अंबालिका सेठिया व संयोजक डॉ. प्रणव मुळे होते. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ४८ विद्यार्थी उपस्थित होते.

- **५१वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा** :

  ३०/०१/२०२४ रोजी ५१वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. **"श्री राम प्रतिष्ठा"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, व्याख्याता प्रो. प्रसाद गोखले, संवाद कर्ता डॉ. अंबालिका सेठिया, डॉ. प्रणव मुळे, डॉ. ऋषिकेश साहू, श्री अनुज शर्मा, संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ. अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं ५८ विद्यार्थी उपस्थित होते.

- **"मुन्था प्रशिक्षण वर्ग":**

  २१/२/२०२४ वेळ सकाळी ११:३० ते दुपारी १:३० पर्यंत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे एकदिवसीय **"मुन्था प्रशिक्षण वर्गाचे"** आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रेरक मा. कुलगुरु आचार्य हरेराम त्रिपाठी महोदय व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय महोदय होते. प्रशिक्षक डॉ. अंबालिका सेठिया तर समन्वक वेदांग ज्योतिष विभाग होता. या एकदिवसीय प्रशिक्षण वर्गात ताजिकशास्त्राचा परिचय, ताजिकशास्त्राचे महत्व, फलादेशाकरिता ताजिकशास्त्राचा उपयोग, मुन्था गणना विधि, मुन्था शुभाशुभ स्थान, मुन्था भावफळ, मुन्थेश व अरिष्ट भंग, मुन्थेश फळ, पात्यायनी दशा व मुन्थेश फळ, मुन्थेश पंचवर्गी बल, मुन्थेश पंचाधिकारी फल ईत्यादी शास्त्रीय विषयांवर डॉ. अंबालिका सेठिया यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. Online व Offline माध्यमाने या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

- **"वर्गकुण्डली प्रशिक्षण वर्ग":**

  २२, २६, २७ फेब्रुवारी २०२४ वेळ दुपारी २:३० ते दुपारी ४:०० पर्यंत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे त्रिदिवसीय **"वर्गकुण्डली प्रशिक्षण वर्गाचे"** आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रेरक मा. कुलगुरु

आचार्य हरेराम त्रिपाठी महोदय व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय महोदय होते. प्रशिक्षक डॉ. अंबालिका सेठिया तर समन्वक वेदांग ज्योतिष विभाग होता. या त्रिदिवसीय प्रशिक्षण वर्गात वर्गकुण्डलींचे षोडश भेद, षोडश वर्गकुण्डलींचे विषय, सूक्ष्म फलादेशातील महत्व, वर्गकुण्डली बघण्याचे नियम, पारिजातादि वर्ग, विविध कुण्डल्यांचा अभ्यास, व कुण्डली बघण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले. विभागातील ३५ विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. अंबालिका सेठिया यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन Online व Offline माध्यमाने केले.

- **५२वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा :**

  २३/०२/२०२४ रोजी ५२वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा आयोजित करण्यात आली. "माघ पूर्णिमा" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, व्याख्याता श्री. प्रसाद अयाचित, संयोजक डॉ. प्रणव मुळे व समन्वयिका डॉ. अंबालिका सेठिया होत्या. वेदांग ज्योतिष विभागीय सर्व प्राध्यापक गण एवं २९ विद्यार्थी उपस्थित होते.

- **"ताजिकशास्त्रोक्त अरिष्ट-अरिष्टभंग प्रशिक्षण वर्ग"**:

२६, २७ फेब्रुवारी २०२४ वेळ सकाळी ११:३० ते दुपारी १:३० पर्यंत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे एकदिवसीय **"ताजिकशास्त्रोक्त अरिष्ट-अरिष्टभंग प्रशिक्षण वर्गाचे"** आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रेरक मा. कुलगुरु आचार्य हरेराम त्रिपाठी महोदय व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय महोदय होते. प्रशिक्षक डॉ. अंबालिका सेठिया तर समन्वक वेदांग ज्योतिष विभाग होता. या एकदिवसीय प्रशिक्षण वर्गात ताजिकशास्त्राचा परिचय, ताजिकशास्त्राचे महत्व, फलादेशाकरिता ताजिकशास्त्राचा उपयोग सांगून, ताजिकशास्त्रोक्त विविध अरिष्ट योगांचे व अरिष्ट भंग योगांचे कुण्डलीच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले. लग्न-लग्नेशाचे महत्व, मुन्था-मुन्थेश, वर्षेशाची शुभाशुभ स्थिति व अरिष्ट योग-अरिष्टभंग योग, गुरू-शुक्र-चंद्राद्वारे अरिष्टभंग योग, ईक्कबालादी षोडश योगांद्वारे अरिष्टभंग योग, सहम द्वारे अरिष्ट योगांचे फलादेश व अरिष्ट भंग योग ईत्यादी शास्त्रीय विषयांवर डॉ. अंबालिका सेठिया यांनी उपस्थित २५ विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. Online व Offline माध्यमाने या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

- **"वर्षतन्त्र कार्यशाळा"**:

  २८ फेब्रुवारी २०२४, वेळ दुपारी १२:३० ते २:३० पर्यंत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे एकदिवसीय **"वर्षतन्त्र कार्यशाळेचे"** आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रेरक मा. कुलगुरु आचार्य हरेराम त्रिपाठी महोदय व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय महोदय होते. प्रशिक्षक डॉ. अंबालिका सेठिया तर समन्वक वेदांग ज्योतिष विभाग होता. या एकदिवसीय प्रशिक्षण वर्गात ताजिकशास्त्राचा परिचय, ताजिकशास्त्राचे महत्व, फलादेशाकरिता ताजिकशास्त्राचा उपयोग सांगून, ताजिकशास्त्रोक्त विविध योगांचे शुभाशुभ फलनिर्णयाकरिता वर्षकुण्डली आनयन, वर्षकुण्डली स्थान निश्चय, वर्षेश

निर्णय, पंचाधिकारी निर्णय, पंचवर्गी बल, हद्दा-हद्देश, द्वादशवर्ग, वर्षकुण्डलीत बनणारे ईक्कबालादि शुभाशुभ षोडश योग, ५० सहम विचारणीय विषय ईत्यादी अनेक महत्वपूर्ण विषयांवर परिचयात्मक माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली, उपस्थित २८ विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. Online व Offline माध्यमाने या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

- **"गोल गणितम् कार्यशाळा":**

  २९ फेब्रुवारी २०२४, वेळ दुपारी ०३:३० ते ५:३० पर्यंत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे एकदिवसीय **"गोल गणितम् कार्यशाळेचे"** आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रेरक मा. कुलगुरु आचार्य हरेराम त्रिपाठी महोदय व कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रशिक्षक आचार्य कृष्णकुमार पाण्डेय महोदय होते. या कार्यशाळेत सचित्र गोलक्षेत्र, स्वदेश, खमध्य, ध्रुवस्थान, भूगोल स्वरूप व कक्ष्याक्रम, याम्योत्तरवृत्त, क्षितिजवृत्त, नाडीवृत्त व क्रान्तिवृत्त आकृतीद्वारे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. यात एकूण २३ विद्यार्थी उपस्थित होते.

- **"लघुजातकम् कार्यशाळा":**

  २९ फेब्रुवारी २०२४, वेळ सकाळी १०:३० ते ५:३० पर्यंत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे एकदिवसीय **"लघुजातकम् कार्यशाळेचे"** आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रेरक मा. कुलगुरु आचार्य हरेराम त्रिपाठी महोदय व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय महोदय होते. प्रशिक्षक डॉ. अंबालिका सेठिया तर समन्वक वेदांग ज्योतिष विभाग होता. या एकदिवसीय प्रशिक्षण वर्गात जातकशास्त्राचे महत्व, वराहमिहिरकृत भटोत्पलटीका सहित लघुजातकम ग्रंथाचे वैशिष्ट्य, १६ अध्यायांचा परिचय, व या अध्यायांतील महत्वपूर्ण विषयांचा आढावा या कार्यशाळेमध्ये घेण्यात आला. कुण्डलीद्वारे विविध योगांचे प्रशिक्षण देण्यात आले. कार्यशाळेत २४ विद्यार्थी उपस्थित होते.

- **"वास्तुरत्नाकर कार्यशाळा":**

  १ व २ मार्च २०२४ वेळ दुपारी १:३० ते ३:३० पर्यंत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे एकदिवसीय **"वास्तुरत्नाकर कार्यशाळेचे"** आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रेरक मा. कुलगुरु आचार्य हरेराम त्रिपाठी महोदय व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय महोदय होते. प्रशिक्षक डॉ. अंबालिका सेठिया तर समन्वक वेदांग ज्योतिष विभाग होता. या द्वीदिवसीय प्रशिक्षण वर्गात वास्तुरत्नाकर ग्रंथ परिचय, १२ अध्यायांचे विषय व वास्तुउत्पत्ती, वास्तु प्रकार, भूमि परीक्षा, शुभाशुभ भूमी लक्षण, शल्य-शल्योद्धार, गृहस्वामी कर्तव्य, भूमीशुद्धी, पंचवास्तु, एकाशीतिपदवास्तु, द्विशाल-त्रिशाल वास्तु, पिण्ड साधन, गृह मेलापक, द्वार विचार, द्वारवेध, शुभाशुभ वृक्ष विचार, जलाशय विचार, ग्रामवास, काकिणी, नराकृती, गृहारंभ मुहूर्त, गृहप्रवेश मुहूर्त ईत्यादी वास्तुशास्त्रीय विषयांवर डॉ. अंबालिका सेठिया यांनी व्याख्यानमालेला उपस्थित २८ विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. Online व Offline माध्यमाने या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

- **५३वीं ज्योतिष वाक्यार्थ सभा** :

11. **दिनांक 23/03/2024** रोजी दिव्या शर्मा यांनी एम एस सी योग विज्ञान प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी संजय खोंडे सर यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते.
12. **दिनांक 18/03/2024** रोजी दिव्या शर्मा यांनी एम एस सी योग विज्ञान प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी भग्यालाता पाल यांचे ध्यान सत्र आयोजित केले होते.
13. **दिनांक 2/04/2024 ते 6/04/2024** दरम्यान एम एस सी योग विज्ञान चतुर्थ सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. गौरव सर व मिथिलेश सर यांचे विशेष योग संशोधनावर सत्र आयोजित करण्यात आले.
14. **दिनांक 07 एप्रिल 2024** – सकाळी 7.30 ते 10.00

लघुशंखप्रक्षालन शिबिर -

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या अभिनव भारती वारंगा परिसर नागपूर येथे लघुशंखप्रक्षालन शिविरचे आयोजन करण्यात आले होते. हा शिविर एम- एस- सी- द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. या शिबिराचे आयोजन सहाय्यक प्राध्यापिका पूजा मस्के यांनी केले होते. शौचालयांची संख्या पाहता एकूण चार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सहाय्यक प्राध्यापिका पूजा मस्के यांनी विद्यार्थ्यांना लघु प्रक्षालन करण्या अगोदरची पूर्व तयारी] विधी] फायदे सविस्तर समजावून सांगितली व त्यानंतर लघुशंखप्रक्षालन क्रिया घेण्यात आली. हा शिविर अत्यंत सुरळीतपणे पार पडला.

15. **दिनांक 07/04/2024 ते 09/04/2024 – तीन दिवसीय योग शिबिर -**

एम एस सी योग विज्ञानच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थी *स्वप्नील सहारे* याने *मध्यवर्ती कारागृह नागपूर* येथे दिनांक रोजी पाच दिवसीय योग शिविर घेतला. या शिबिरात अनेक कैदी सहभागी झाले होते. तसेच त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. शिविराला माननीय अधीक्षक - म.पानसरे] माननीय शिक्षक लक्ष्मण साळवे उपस्थित होते- या शिबिरात सहभागी कैदी संख्या खालीलप्रमाणे होती -पहिला दिवस **07/04/2024 :** 38 कैदी] दुसरा दिवस 08/04/2024 : 51 कैदी] तिसरा दिवस **09/04/2024** : 58 कैदी-

16. **दिनांक 28 मे 2024 -**कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या अभिनव भारती वारंगा परिसरातील योग विज्ञान आणि समग्र स्वास्थ विभागाच्या *एम. एस. सी. द्वितीय वर्षातील* विद्यार्थी स्वप्नील साहारे, सुरभी हमने, शैलजा ढोरे व संध्या घरसेले गायत्री शक्तीपीठ जगनाडे चौक द्वारे घेतल्या जाणाऱ्या युवा शिबिरात 28 मे 2024 रोजी योग शिबिर घेण्यात आला आहे. हे शिबिर मा. संचालकांच्या मार्गदर्शनाखाली सहायक प्राध्यापिका कु. पूजा मस्के यांनी आयोजित केले आहे.

प्रस्तावित कार्यक्रम :

17. **दिनांक 6 मे 2024 ते 11 मे 2024: योग आणि वैकल्पिक चिकित्सा कार्यशाळा** –

अभिनव भारती वारंगा परिसरात योग विज्ञान आणि समग्र स्वास्थ विभागातर्फे विद्यार्थी तसेच बाहेरील व्यक्तिंकरिता ऑनलाईन माध्यमाद्वारे सहा दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्याचे ठरले आहे. कार्यशाळा मा. संचालकांच्या मार्गदर्शनाखाली सहायक प्राध्यापिका कु. पूजा मस्के यांनी आयोजित केले आहे. या कार्यशाळेमध्ये एकूण 7 विद्वानांचे सेशन्स ठेवण्यात आले आहेत. त्यांची यादी व त्यांच्या द्वारे घेण्यात येणाऱ्या विषयांची यादी पुढीप्रमाणे आहे.

1) डॉ. सुनील लाबडे - मुद्रा आणि मॅग्नेटो थेरपी
2) मीरा पिंगळे मॅडम- बेसिक्स ऑफ न्युट्रिशन "माय हेल्थ माय लाईफ"
3) द्रव्येकर मॅडम- ओम मेडिटेशन फॉर फिजिकल अँड मेंटल हेल्थ
4) राम सर - वस्त्र धौती आणि शंखप्रक्षालान
5) पूर्व वर्मा- योगा फॉर वुमन
6) दिव्या शर्मा- रेकी

18. **दिनांक -मे 2024 : सात दिवसीय योग शिबिर -**कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या अभिनव भारती वारंगा परिसरातील योग विज्ञान आणि समग्र स्वास्थ विभागाच्या एम. एस. सी. योग विज्ञानच्या विद्यार्थ्यांना मे महिन्यात 2024 मध्ये सात दिवसीय योग शिबिर घ्यावयाचे आहेत. हे शिबिर मा. संचालकांच्या मार्गदर्शनाखाली सहायक प्राध्यापिका कु. पूजा मस्के यांनी आयोजित केले आहेत- 12 मे 2024 पर्यंत या बाबतचे रिपोर्ट विद्यार्थ्यांना सादर करण्यास सांगण्यात आलेले आहे.

* * *

रत्नागिरी उपकेंद्र

वार्षिक अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४

महाराष्ट्र दिन: ०१/०५/२०२३

रत्नागिरी उपकेंद्रामध्ये ०१ मे २०२३ रोजी महाराष्ट्र दिनाचे आचरण करण्यात आले. उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे यांचे हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. उपस्थितांना उद्देशुन उद्‌बोधनपर भाषण देण्यात आले. या कार्यक्रमाला उपकेंद्रातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

महामहोपाध्याय डॉ. पांडुरंग वामन काणे जयंतीय: ०७/०५/२०२३

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतरत्न डॉ. पांडुरंग वामन काणे संस्कृत अध्ययन केंद्र रत्नागिरी उपकेंद्रामध्ये आज भारतरत्न डॉ. पांडुरंग वामन काणे यांची जयंती साजरी करण्यात आली.

गुरूपौर्णिमा: दिनांक ०३/०७/२०२३

रत्नागिरी उपकेंद्रामध्ये आज दिनांक ०३ जुलै २०२३ रोजी गुरूपौर्णिमेचे आचरण करण्यात आले. यावेळी व्यासांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी उपकेंद्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

लोकमान्य टिळक जयंती: दिनांक २३/०७/२०२३

२३ जुलै २०२३ रोजी भारतीय समाज सुधारक व स्वातंत्र्यसैनिक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्ताने रत्नागिरी उपकेंद्रामध्ये सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे यांच्या हस्ते टिळकांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले.

स्वातंत्र्य दिन: १५/०८/२०२३

रत्नागिरी उपकेंद्रामध्ये दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजी हर घर तिरंगा अभियान राबविण्यात आले. या अभियानादरम्यान रत्नागिरी उपकेंद्राद्वारे सर्व विद्यार्थी कर्मचारी यांना संचालकांच्या हस्ते ध्वज वितरण करण्यात आले. दिनांक १५ ऑगस्ट २०२२ रोजी उपकेंद्राचे संचालक डॉ.दिनकर मराठे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

संस्कृत महोत्सवांतर्गत स्तोत्र पठण स्पर्धा: २७/०३/२०२३

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक, डॉ. भारतरत्न पांडुरंग वामन काणे संस्कृत अध्ययन केंद्रात संस्कृत महोत्सवाच्या निमित्ताने दिनांक २७ ऑगस्ट रोजी ०५.०० वाजता सद्यस्क माध्यमाने संस्कृत स्तोत्र पठन (गणेश पञ्चरत्न) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

ज्यूनियर गटामध्ये एकूण १५ विद्यार्थी यात सहभागी झाले होते. परीक्षणार्थ श्री. अनुज शर्मा, रामटेक आणि कु. उदया भानु, केरळ हे परीक्षक म्हणून उपस्थित होते. यामधून प्रथम क्रमांक– साई सुहास अनिरुद्ध, द्वितीय क्रमांक श्रेयस प्रसाद गोखले, तृतीय क्रमांक– पौरस संकेत जगदाले यांना पारितोषिक आणि प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. तर सिनियर गटामध्ये एकूण १९ विद्यार्थी सहभागी झाले होते. परीक्षणार्थ प्रा. पल्लवी कावले, रामटेक आणि कु. एस. ह्या जी, केरळ हे परीक्षक म्हणून उपस्थित होते. यामधून प्रथम क्रमांक – D.S. वासुदेव तन्त्री, द्वितीय क्रमांक प्रणव रायाराथील व तृतीय क्रमांक – कु. समृद्धी बोराडे यांना पारितोषिक आणि प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. डॉ. दिनकर मराठे, आणि श्री. अविनाश चव्हाण यांनी या स्पर्धेचे समन्वय केले. अशाप्रकारे संस्कृत स्तोत्र पठन स्पर्धा सुसंपन्न झाली.

ज्ञान– विज्ञानभाषा संस्कृतम्: २९/०८/२०२३

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक, डॉ. भारतरत्न पांडुरंग वामन काणे संस्कृत अध्ययन केंद्रात संस्कृत महोत्सवादरम्यान दिनांक २९ ऑगस्ट रोजी ०५.०० वाजता सद्यस्क माध्यमाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले

होते. व्याख्याते श्री. रघुवीर रामदासी, सांगली यांनी 'ज्ञानविज्ञानभाषा संस्कृतम्' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. रत्नागिरी उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे, आणि सहाय्यक प्राध्यापक श्री. अविनाश चव्हाण यांनी या कार्यक्रमाचे समन्वयन केले.

अध्यापक प्रशिक्षण कार्यशाळा YOGA FOR HOLISTIC HEALTH; २७ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२३

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक भारतरत्न डॉ. पांडुरंग वामन काणे संस्कृत अध्ययन केंद्र आणि महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था MSFDA यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ ऑगस्ट पासून ३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत या पाच दिवसाच्या कालावधीत रत्नागिरी उपकेंद्रामध्ये YOGA FOR HOLISTIC HEALTH समग्र स्वास्थ्यासाठी योग या विषयावर अध्यापक विकास प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण चाळीस अध्यापक सहभागी झाले होते.

स्वत:पासून ते समाजापर्यंत आणि समाजापासून ते राष्ट्रापर्यंत विकास घडवायचा असल्यास प्राध्यापक हाच विकासाचा मंत्र आहे. जेव्हा शैक्षणिक क्षेत्राचा विचार केला जातो तेव्हा अध्यापन करणारे शिक्षक आणि केंद्रस्थानी असलेले अध्ययन करणारे विद्यार्थी हे या प्रणालीतील महत्वाचे घटक होत. अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांना आपल्या दैनंदिन जीवनामध्ये तसेच शैक्षणिक क्षेत्रामध्ये विविध समस्यांना सामोरे जावे लागत असते दैनंदिन जीवन आणि आपले शैक्षणिक कार्यक्षेत्र यामध्ये समतोल साधत आपले कार्य उत्तमरीतीने करता यावे यासाठी शारीरिक, मानसिक स्वास्थ्य यांचे संतुलन साधत आपली कार्यक्षमता, जागरुकता, संवेदनशीलता वृद्धींगत व्हावी यासाठी काही उपयुक्त सुलभ अशा योग पद्धती व आसने यांचे प्रशिक्षण देवून अध्यापकांना समग्र स्वास्थ्यासाठी योगाची उपयुक्तता, महत्त्व पटवून देणे या उद्देशाने सदरच्या अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

योगाक्षेत्रातील विविध तज्ञ मंडळींच्या व्याख्यानांद्वारे योग विषयाची माहिती, प्रात्याक्षिके यांद्वारे प्रशिक्षणार्थी अध्यापकांना उद्‌बोधन करण्यात आले. दररोज सकाळी ०६.३० ते संध्याकाळी ०६.०० या वेळेत रोज योगविषयक प्रात्यक्षिक सत्र आणि व्याख्याने, चर्चासत्रे, क्षेत्र भेट अशा प्रकारे कार्यशाळेचे स्वरूप आखण्यात आले होते. कोकणातील प्रसिद्ध क्षेत्र गणपतीपुळे येथील निसर्गाच्या सानिध्यात वसविण्यात आलेल्या आणि समग्र कोकणी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या प्राचीन कोकण या ठिकाणी क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

या पाच दिवसाच्या कार्यशाळेत महाराष्ट्राच्या मुंबई, जळगाव, लातूर, सांगली, कोल्हापूर, पालघर, नांदेड, उस्मानाबाद, अहमदनगर, सिंधुदुर्ग आदि विविध भागातून आलेले सर्व चाळीस अध्यापक सहभागी झाले होते. सहभागी झालेल्या प्राध्यापकांना समर्ग स्वास्थ्यासाठी योग हा उत्तम मार्ग असल्याने योगाच्या विविध पद्धती पारंपारिक ज्ञान व प्रात्यक्षिक यांद्वारे दैनंदिन व्यवहारात उपयुक्त असलेली आसने, ध्यान इ. च्या माध्यमाने शारीरिक, मानसिक संतुलन साधता यावे यासाठी प्रशिक्षित करण्यात आले.

शिक्षक दिन: ५ सप्टेंबर २०२३ –

रत्नागिरी उपकेंद्रामध्ये दिनांक ५ सप्टेंबर २०२३ रोजी शिक्षक दिनाचे आचरण करण्यात आले. या प्रसंगी उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे यांच्या हस्ते डॉ. राधाकृष्णन् यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थितांना उद्देशून मा. संचालकांनी उद्‌बोधनपर भाषण केले. त्यावेळी शिक्षण हाच खरा विकासाचा मंत्र असून शिक्षक हेच भावी पिढीचे शिल्पकार आणि समाज परिवर्तनाचे माध्यम आहेत असे विचार मा. संचालकांनी व्यक्त केले. शीलवान, क्षमाशील, कर्तव्यदक्ष अशा सर्व शिक्षकांचे स्मरण करत उपकेंद्रातील शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी अनुभवकथन व मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी पतंजली योगपीठाचे योग शिक्षक श्री. विनय साने उपस्थित होते. पतंजली योगपीठाचे योग शिक्षक श्री. विनय साने व उपस्थित सर्व शिक्षकांचा सत्कार या वेळी करण्यात आला. कार्यक्रमानंतर सर्वांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. अशाप्रकारे रत्नागिरी उपकेंद्राचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत शिक्षक दिनाचा कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला.

गणेशोत्सव: ११/०९/२०२३

रत्नागिरी केंद्रामध्ये माननीय संचालक आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांच्या उपस्थितीत गणेशोत्सवाचे आचरण करण्यात आले.

संस्कृत संभाषण वर्ग: २५/०९/२०२३

संस्कृतभारती रत्नागिरी व कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे रत्नागिरी उपकेंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरी शहरात संस्कृत संभाषण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.
शिबिराचा कालावधी– दिनांक २५ सप्टेंबर ते ०३ नोव्हेंबर २०२३
वेळ – प्रतिदिन संध्याकाळी ०४:०० – ०६:००
ठिकाण – रत्नागिरी उपकेंद्र
शिबिरचालक– कु. कल्पजा जोगळेकर, कु. मीरा काळे.

उद्घाटन – संभाषण शिबिराचे उद्घाटन उपकेंद्रातील सहाय्यक प्राध्यापक श्री. अविनाश कडू चव्हाण यांच्या उपस्थितीत पार पडले. त्यांनी दीपप्रज्वलन, सरस्वतीपूजन व भारतमातापूजन करून शिबीराचे उद्घाटन केले. याप्रसंगी श्री. अविनाश चव्हाण यांनी सहभागींना संस्कृत संभाषण करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. संभाषण शिबिरात व्यवहारात आवश्यक संस्कृत संभाषण शिकवण्यात आले. संस्कृतभारतीच्या कार्यकर्त्यांनी संभाषण शिबिराला वेळोवेळी भेट दिली. या शिबिरासाठी रत्नागिरी मधील एकूण १५ जणांनी नावनोंदणी केली होती.
समारोप – १०दिवसीय संस्कृत संभाषण शिबिराचा समारोप दिनांक ०३ नोव्हेंबर २०२३ रोजी संध्याकाळी ०४:३० ते ०६:०० या वेळेत रत्नागिरी उपकेंद्रामध्ये पार पडला.

नाट्यशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम उद्घाटन: ०५/११/२०२३

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक भारतरत्न डॉ. पांडुरंग वामन काणे संस्कृत अध्ययन केंद्र रत्नागिरी उपकेंद्रामध्ये दिनांक ०५ नोव्हेंबर २०२३ रोजी रंगभूमी दिनाचे औचित्य साधून आयोजित नाट्यशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन डॉ. प्रफुल्लदत्त कुलकर्णी, प्राचार्य, गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी यांचे हस्ते संपन्न झाले.

या प्रसंगी प्रमुख अतिथी – डॉ. श्री. अलीमिया परकार कार्यकारी विश्वस्त, परकार मेडिकल फौंडेशन, विशेष अतिथी – श्री. गजानन उर्फ आबा पाटील, अध्यक्ष, कवी केशवसुत स्मारक, मालगुंड, रत्नागिरी उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे, या अभ्यासक्रमाचे मार्गदर्शक डॉ. शशांक पाटील आदि मान्यवर मंडळी मंचावर उपस्थित होती.
आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रफुल्लदत्त कुलकर्णी म्हणाले उपकेंद्राद्वारे पुढे कलात्मक शिक्षणास वाव मिळेल व या नाट्यशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या प्रयोगात्मक प्रशिक्षणाद्वारे व्यक्तिमत्व विकास उत्तम प्रकारे साधला जाईल.
डॉ. श्री. अलीमिया परकार यांनी उत्साही, होतकरू, कलाप्रेमी स्थानिक मुलांसाठी शासनाचे पाठबळ असलेल्या संस्थेद्वारे सुरु होत असलेल्या नाट्य चळवळीला शुभेच्छा देत कला, क्रीडा यांचे प्रेम रत्नागिरी करांना आहेच असे म्हंटले . कला, क्रीडा, संस्कृती यांची जाणीव व या जाणीवेच्या जोपासनेचे कार्य या रत्नागिरी शहरात अव्याहतपणे सुरु असून या शहराची ही समृद्धी आहे. कलेच्या जोपासनेने व्यक्तीला उत्तम आरोग्याची प्राप्ती होते व रोगांपासून मुक्ती मिळते. आज या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून कलाक्षेत्रात रुची असलेल्या स्थानिक मुलांना उत्तम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे ही अभिमानाची गोष्ट असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतात म्हटले.
श्री. गजानन उर्फ आबा पाटील यांनी सुरु होत असलेल्या अभ्यासक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. शशांक पाटील यांनी या अभ्यासक्रमाची माहिती व स्वरूप समजावून सांगताना म्हटले भारतीय नाट्यशास्त्र आणि स्टॅनिस्लावस्की यांचे आधुनिक सिद्धान्त या प्राचीन व आधुनिक दोहोंची सांगड या अभ्यासक्रमात घातली जाणार आहे. उपस्थितांपैकी प्रसिद्ध गझलकार खानसर, रत्नागिरीतील नामवंत उद्योजक श्री. गद्रे, अमेय धोपटकर यांनी या अभ्यासक्रमाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाप्रसंगी रत्नागिरीतील विविध क्षेत्रातील तज्ञ मंडळी, विद्यार्थी, नाट्यप्रेम रसिक उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे यांनी केले. सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक श्री. अविनाश चव्हाण यांनी केले. सहाय्यक प्राध्यापिका कश्मिरा दळी यांनी धन्यवाद समर्पण केले.

Free Online Certificate Course on Tarkasangraha; २० नोव्हेंबर २०२३ पासून दिनांक ३० नोव्हेंबर २०२३.
दिनांक २० नोव्हेंबर २०२३ पासून दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत 'Free Online Certificate Course On Tarkasangraha' हा दहा तासांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला होता. हा अभ्यासक्रम सलग दहा दिवस सांयकाळी ०६:०० ते ०७:०० या वेळेत घेण्यात आला. हा अभ्यासक्रम नि:शुल्क होता आणि एकूण १४ विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम

पूर्ण केला. श्री. नारायण बबन शेट्ये, सहाय्यक प्राध्यापक, चिन्मय विश्वविद्यापीठ यांनी हा १०तासांचा अभ्यासक्रम चालविला.

संविधान दिवस: २६/११/२०२३

रत्नागिरी उपकेंद्रामध्ये दिनांक २६/१२/२०२३ रोजी संविधान दिनाचे आचरण करण्यात आले. या प्रसंगी उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण केले व उपस्थितांना उद्देशून उद्‌बोधनपर वक्तव्य केले. उपकेंद्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

गीता जयंती: २२/१२/२०२३

दिनांक २२/१२/२०२३ रोजी रत्नागिरी उपकेंद्र रत्नागिरीतील गीता मंडळ, जयस्तंभ, रत्नागिरी, गो. जो. महाविद्यालय (स्वायत्त), रत्नागिरी, नारायणी पठण मंडळ, स्वानंद पठण मंडळ, रत्नागिरी संस्कृत भारती अशा विविध संस्थांनी एकत्र येऊन गीता भवन येथे गीता जयंती कार्यक्रम साजरा केला. यावेळी समग्र भगवद्‌गीतेचे पठण करण्यात आले. या कार्यक्रमात १२५ जण सहभागी झाले होते. प्रमुख अतिथी प्रा.सौ. अंजली बर्वे यांच्या उपस्थितीत गीता जयंतीचा कार्यक्रम संपन्न झाला.

जय श्रीराम: ०२/०१/२०२४

२२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येमध्ये होणाऱ्या रामजन्मभूमी सोहळ्याचे औचित्य साधत २० जानेवारी २०२४ रोजी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या रत्नागिरी उपकेंद्रामध्ये संध्याकाळी ०४:३० वाजता श्रीरामोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वालनाने झाली. उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे, नाट्यशास्त्र वर्गाचे प्रशिक्षक डॉ. शशांक पाटील आणि उपकेंद्रातील शिक्षकांच्या हस्ते दीप प्रज्वालन आणि रामाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपकेंद्राच्या नाट्यशास्त्र प्रशिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमांचे प्रस्तुतीकरण केले. कु. तेजस्विनी जोशी हिने रामजन्मकथेचे किर्तनाद्वारे सादरीकरण केले. तेजस्विनी जोशी, सौ. भोळे मॅडम, मधुर पावसकर यांनी "राम जन्मला" गीताचे गायन केले. कु. मधुरा पावसकर हीने "सावळा ग रामचंद्र" या गीताचे गायन केले. सौ. भोळे यांनी "स्वये श्री रामप्रभु ऐकती", "पराधीन" या गीतांचे गायन केले. कु. शर्वाणी ढवळे हिने कत्थक नृत्य सादर केले. श्री. अविनाश चव्हाण यांनी रामरायाच्या पदस्पर्शाने शिलारूपात असलेल्या अहल्येला मिळालेल्या मुक्तीच्या प्रसंगाचे कथन केले. श्री. चिन्मय जोशी यांनी "जगण्याचे देवा" या गीताचे सादरीकरण केले. नाट्यशास्त्र वर्गाचे प्रशिक्षक डॉ.शशांक पाटील यांनी कविता वाचन केले आणि आपले मनोगत व्यक्त करत असताना रामरक्षेच्या पठणाने वाचिक अभिनयाचा उत्तम अभ्यास होणे शक्य आहे असे ते म्हणाले. आपले शिक्षण व नोकरी सांभाळून कलेची आवड जोपासत नाट्यशास्त्राचे प्रशिक्षण घेत असलेल्या कला व विविध कलाक्षेत्रात उत्तम कामगिरी करत असलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान रत्नागिरी उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे यांच्या हस्ते करण्यात आला. कु. शर्वाणी ढवळे – कत्थक विशारद असून नाट्यप्रशिक्षणात सहाय्यकाची भूमिका बजावत आहे. श्री. चिन्मय जोशी – नवोदित गायक, छायाचित्रण, व्हॉइस ओव्हर यात त्यांचा हातखंडा आहे. नाट्यप्रशिक्षणात सहाय्यकाची भूमिका बजावत आहेत. सौ. भोळे मॅडम – यांनी ३५ वर्षे शिक्षण क्षेत्रात सेवा केली असून या शिर्के प्रशालेच्या मुख्याध्यापक पदी कार्य करीत होत्या. २०२३ मध्ये त्या सेवानिवृत्त झाल्या असून लायन्स क्लब तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे. डॉ सोनिया पाटील – यांना आरोग्य विभागात एड्स कंट्रोल आणि प्रतिबंधक ह्या विषयात महाराष्ट्र शासनाचा गौरव प्राप्त झाला आहे. कु. तेजस्वीनी जोशी – लोकांकिका स्पर्धेत प्राथमिक फेरीत पहिला क्रमांक. सलग १०० पेक्षा जास्त कीर्तने केली असून ABP माझा वर कीर्तनाचे शुटींग झाले आहे. कु. सोनाली कदम – न्यू इंग्लिश स्कूल, तुकाराम पुंडलिक शेट्ये कनिष्ठ महाविद्यालय, लांजा येथे शिकत असून एकपात्री अभिनय स्पर्धेत जिल्हा पातळीवर सुयश प्राप्त केले आहे. येथे शिकत असून एकपात्री अभिनय स्पर्धेत जिल्हा पातळीवर सुयश प्राप्त केले आहे.

उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे यांनी आपल्या अध्यक्षीय वक्तव्यात कोकण प्रदेश, संस्कृतीत आणि कोकणातील लोककला यांत असलेले श्रीरामाचे स्थान याबाबात माहिती दिली. तसेच श्रीरामाचे स्थान सर्वांच्या हृदयात असून राम हा लोकनायक असल्याचे ते म्हणाले. सादर करण्यात आलेले कार्यक्रम हे श्रीरामाशी संबंधित असले तरी त्यात गीत, नृत्य, व्याख्यान, भाषण,भजन, कीर्तन, प्रवचन अध्यात्म अशा सर्व गोष्टींचा समावेश झाला असून नव रसांची अनुभूती याठिकाणी आली.

श्रीमती कामिनी महाडीक, सौ. अनघा नागवेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. भोळे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन कु. आकाश चौगुले याने केले. या कार्यक्रमामध्ये उपकेंद्राच्या नाट्यशास्त्र प्रशिक्षण केंद्राचे विद्यार्थी, उपकेंद्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी सहभागी झाले होते.

प्रजासत्ताक दिन. २६/०१/२०२४

रत्नागिरी उपकेंद्राचे माननीय संचालक डॉ. दिनकर मराठे आणि उपकेंद्रातील कर्मचारी वर्ग यांच्या उपस्थितीत प्रजासत्ताक दिन पार पडला. यावेळी अतिथी म्हणून डॉ. शशांक पाटील उपस्थित होते. उपस्थितांना उद्देशून उपकेंद्राचे संचाक डॉ. दिनकर मराठे यांनी उद्‌बोधनपर केले. यावेळी उपकेंद्रातील शिक्षक व उपस्थित विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

Online Marriage Match-Making Certificate Course; २८/१/२०२३

दिनांक २८ जानेवारी २०२४ पासून दिनांक ३१ जानेवारी २०२४ पर्यंत 'विवाह मेलापक विचार' हा चार दिवसांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला. या अभ्यासक्रमासाठी डॉ. उदय नारायण कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. हा अभ्यासक्रम रात्री ०८:०० ते ०९१:५ या वेळेत घेण्यात आला. एकूण १९ विद्यार्थी सहभागी झाले होते.

सरलमानक संस्कृत कार्यशाळा– १३/०२/२०२४

कविकुलगुरु – कालिदास – संस्कृत – विश्वविद्यालय, रामटेक तथा भारतीय भाषा समिती, नवी दिल्ली यांच्या संयुक्तविद्यमाने गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी (स्वायत्त), विस्तारसेवामंडळ, क.का.सं.वि. रामटेक, डॉ. पांडुरंग वामन काणे संस्कृत अध्ययन केंद्र , रत्नागिरी यांच्या सहयोगाने आज दिनांक ०८ फेब्रुवारी २०२४ रोजी रत्नागिरी उपकेंद्रामध्ये एकदिवसीया सरलमानक संस्कृत कार्यशाळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर कु. चिन्मयी सरपोतदार हिने स्वागतगीत सादर केले. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून गोगटे जोगळेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर महोदय, मुख्यातिथीम्हणून डी.बी.जे. महाविद्यालय चिपळूणच्या संस्कृत प्राध्यापिका डॉ. माधवी जोशी महोदया, रत्नागिरी उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे, गोगटे जोगळेकर महाविद्यालयाच्या संस्कृत विभागच्या विभाग प्रमुख डॉ. कल्पना आठल्ये आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. मान्यवरांचे स्वागत आणि प्रास्तविक उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे यांनी केले.

सरल मानक संस्कृत ही संस्कृत भाषेचे अध्यापन करण्यासाठी विकसित करण्यात आलेली सुलभ पद्धती असून या द्वारे सर्व संस्कृत शिक्षकांचा संभाषण सराव होणे , नव्या पाठ्य पुस्तकांची रचना करणे, विद्यार्थ्यांशी संस्कृत भाषेत व्यवहार करणे यामुळे संस्कृत शिक्षणामध्ये परिवर्तन घडवून आणणे हेच आपले कार्य आणि हिच सध्याच्या काळाची आवश्यकता आहे. संस्कृत भाषेच्या शिक्षकांनी संस्कृत स्वभाषा म्हणून अवगत करावी, या विषयाचे अध्यापन करत असताना संस्कृत भाषेतच आपले वर्ग घ्यावेत, संस्कृत भाषेचा अभ्यास रंजक आणि रोचक करावा, या सरलमानक संस्कृत पद्धतीच्या आधारे उत्तरोत्तर प्रौढ ग्रंथांचे अध्ययन करता यावे या सर्व बाबींचा विचार करून रत्नागिरी जिल्ह्यातील संस्कृत शिक्षकांसाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पूर्ण दिवस संपन्न झालेल्या या कार्यशाळेमध्ये किमर्थं "सरलमानक संस्कृतम्" या विषयावर प्रथम सत्र श्री. अविनाश चव्हाण, "सरलमानकसंस्कृतस्य स्वरूपम्" या विषयावर द्वितीय सत्र – डॉ. कल्पना आठल्ये, "सरलमानकसंस्कृतेन प्रौढसंस्कृतस्य" या विषयावर – श्री. आशिष आठल्ये, "सरलमानकसंस्कृतस्य क्रियान्वयनम" या विषयावर – डॉ. माधवी जोशी आदी संसाधन व्यक्तींनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

जागतिक सूर्यनमस्कार दिन: १६/०२/२०२४

रत्नागिरी उपकेंद्रामध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा करण्यात आला. योग शिक्षक श्री. अक्षय माळी यांनी सर्वाना सूर्यनमस्काराचे प्रशिक्षण दिले.

एमआयडीसी रत्नागिरी यांच्या सह सामंजस्यकरार: २१/०२/२०२४

कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे रत्नागिरी उपकेंद्र आणि एमआयडीसी रत्नागिरी (MIDC Ratnagiri) यांच्यामध्ये सामंजस्य करार संपन्न झाला. माननीय उद्योग मंत्री श्री. उदयजी सामंत यांनी योगाभ्यास हा शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी महत्त्वाचा असून सर्वांनी योगाभ्यास करावा असे आवाहन करत संस्कृत विश्वविद्यालयाचे माननीय

कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्याकडे सर्व कर्मचाऱ्यांसाठी रत्नागिरी उपकेंद्रा व्दारे योग प्रशिक्षण उपक्रम राबविण्याबाबत आग्रह केला होता. या उपक्रमाची सुरुवात रत्नागिरी एमआयडीसीमधून व्हावी असा निर्देशही त्यांच्याकडून करण्यात आला होता. या निर्देशान्वये कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे रत्नागिरी उपकेंद्र आणि एमआयडीसी रत्नागिरी (MIDC Ratnagiri) यांच्यामध्ये आज दिनांक: २२ फेब्रुवारी २०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. या पुढे उपकेंद्राद्वारे रत्नागिरी एमआयडीसीमध्ये योग प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असून तसेच दोन्ही संस्थांच्या समन्वयाने समाजोपयोगी उपक्रम राबविले जाणार आहेत.

या प्रसंगी रत्नागिरी उपकेंद्राचे संचालक मा. डॉ. दिनकर मराठे, एमआयडीसी रत्नागिरी च्या प्रादेशिक अधिकारी सौ. वंदना मांडगे, सामंजस्य करार समन्वयक श्री. सागर पवार, क्षेत्राधिकारी, एमआयडीसी, श्री. सचिन राक्षे, कार्यकारी अभियंता, रत्नागिरी उपकेंद्राचे सहायक प्राध्यापक श्री. अविनाश चव्हाण तसेच उपकेंद्र कार्यालय प्रतिनिधी श्री. प्रथमेश घोसाळे उपस्थित होते.

नाट्यशास्त्र CRP – : २५/०२/२०२४

रत्नागिरी उपकेंद्रामध्ये सुरु करण्यात आलेल्या नाट्यशास्त्र प्रशिक्षणकेंद्राद्वारे डॉ. शशांक पाटील यांच्या मार्गदर्शनामध्ये नाट्यशास्त्र प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी आज "स्त्री जन्मा ही तुझी कहाणी" या विषयावर द्वितीय क्लासरूम प्रोडक्शन सादर केले.

मराठीभाषा गौरव दिन: २७/०२/२०२४

दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने आज रत्नागिरी उपकेंद्रामध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत मराठी भाषा गौरव दिनाचे आचरण करण्यात आले. यावेळी अध्यापक, विद्यार्थी यांनी कवितावाचनादि उपक्रमांचे सादरीकरण केले.

छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी: १६ मार्च २०२४

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेंद्रामध्ये आज दिनांक १६ मार्च २०२४ रोजी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यस्मरणानिमित्त नाट्यशास्त्र विभागाकडून कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनी संभाजी महाराजांचे चरित्र व त्यांचे योगदान वेगवेगळया अंगांनी प्रस्तूत केले, उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे सर, नाट्यशास्त्राचे मार्गदर्शक डॉ. शशांक पाटील तसेच उपकेंद्राचे सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

जगद्गुरु श्री शंकराचार्य यांच्या विचारांवर एकदिवसीय चर्चासत्र: २९/०३/२०२४

दिनांक २९ मार्च २०२४ रोजी भारतीय भाषा समिती नवी दिल्ली यांच्या अर्थ सहाय्याने, संस्कृत विश्वविद्यालयाचे भारतरत्न डॉ. पां. वां. काणे संस्कृत अध्ययन उपकेंद्र, गोगटे– जोगळेकर महाविद्यालय, संस्कृत विभाग यांच्या सहयोगाने जगद्गुरु श्री शंकराचार्य यांच्या विचारांवर एकदिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राला विश्वविद्यालायचे कुलसचिव प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, रत्नागिरी उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे, गोगटे– जोगळेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, संस्कृत विभागप्रमुख डॉ. कल्पना आठल्ये आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. चर्चासत्राचे उद्घाटनसत्रामध्ये सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी नाणिज येथील जगद्गुरु नरेंद्र महाराजांच्या पाठशाळेतील वेदाध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मंत्रोच्चार करत वातावरण मंगलमय केले. या कार्यक्रमच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून गोगटे– महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर उपस्थित होते. अतिथी व मान्यवरांचे स्वागत, प्रमुख अतिथींचे भाषणानंतर विश्वविद्यालयाचे कुलसचिव प्रो. कृष्णकुमार पाण्डेय यांनी अध्यक्षीय भाषण केले. जगद्गुरु आदि शंकराचार्य यांनी आपल्या जीवन कार्यातून भारताच्या भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रातील एकात्मता दृढ केली. याशिवाय आदि शंकराचार्यांनी आपल्या परिक्रमेतून भारतातील कानाकोपऱ्यात चैतन्य निर्माण केले. सर्वार्थाने जगद्गुरु शंकराचार्य म्हणजे भारताचा आत्मा, परंपरा, एकता, बल, अखंडता, तप, दर्शन, संस्कृती, संस्कार, सभ्यता, संयम, श्रद्धा, उदारता, स्वरूप, तत्त्व, वैभव, ज्ञान, कीर्ती, आत्मा, वाणी, गर्व, चिंतन हे जगद्गुरु आदि शंकराचार्य हे आहेत असे गौरवोद्गार कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलसचिव प्रा कृष्णकुमार पाण्डेय यांनी काढले. आदि शंकराचार्य यांनी स्थापन केलेली चार पीठे, त्यांना देण्यात आलेले वेद व त्यांची केलेली सूत्रबद्ध योजना ही आदि शंकराचार्यांची दूरदृष्टी स्पष्ट करते, असे सांगितले. कुलसचिव पाण्डेय यांनी आदि शंकराचार्यांनी स्थापन केलेल्या बद्रिकाश्रमाचा ज्योती मठ, दक्षिणेला शृंगेरी मठ, पूर्वेला जगन्नाथपुरीचा गोवर्धन मठ आणि पश्चिमेला द्वारकेचा शारदा

मठाचा उल्लेख केला. रत्नागिरीतील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, भारतरत्न डॉ. पांडुरंग वामन काणे , भगवान परशुराम आणि आचार्य बाळकृष्ण दीक्षित या चार महान विभूतींचा आदरपूर्वक उल्लेख केला.

प्रथम सत्रामध्ये श्री श्रीनिवास पेंडसे यांनी जगद्गुरू श्री शंकराचार्य अध्यात्मिक आणि भाषिक ऐक्याचे वाहक या विषयवार व्याख्यान दिले. दुपारच्या सत्रात प्रा. अंजली बर्वे यांनी शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान आणि स्तोत्र वाङ्मय या विषयावर मार्गदर्शन केले.

समारोप कार्यक्रमात प्रमुख अतिथी गोगटे– जोगळेकर महाविद्यालयाच्या संस्कृत विभागप्रमुख डॉ. कल्पना आठल्ये उपस्थित होत्या. संचालक डॉ. दिनकर मराठे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. या चर्चासत्रासाठी रत्नागिरी तसेच रत्नागिरी नजीकच्या परिसरातील शंकराचार्य प्रेमी व्यक्ति, रत्नागिरी उपकेंद्र व गोगटे जोगळेकर महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी असे एकूण १२० जण सहभागी झाले होते. कार्याक्रमाचे प्रास्ताविक दिनकर मराठे यांनी केले. डॉ. कल्पना आठल्ये यांनी आभारप्रदर्शन केले. सूत्रसंचालन कश्मिरा दळी यांनी केले.

भारतीय मराठी नववर्ष स्वागत यात्रा: ०९/०४/२०२४

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालया अंतर्गत भारतरत्न डॉ. पांडुरंग वामन काणे संस्कृत अध्ययन केंद्र रत्नागिरी आणि संस्कृत भारती यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरी येथे विविध संघटनांतर्फे नववर्ष स्वागत यात्रा आयोजित करण्यात आली होती. हिंदू नववर्ष गुढीपाडव्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्वागत यात्रेत संस्कृतप्रेमींनी उत्साहाने सहभाग घेतला.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती: १४/०४/२०२४

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे शहरातील भारतरत्न डॉ. पांडुरंग वामन काणे संस्कृत अध्ययन केंद्रात मोठ्या उत्साहात आणि ज्ञान वर्धक वातावरणात साजरी करण्यात आली.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने भारतरत्न डॉ पां. वा. काणे संस्कृत अध्ययन केंद्र आणि नाट्यशास्त्र प्रशिक्षण वर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे, नाट्यशास्त्र प्रशिक्षक डॉ. शशांक पाटील हे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. याशिवाय एप्रिल महिन्यात भारतीय नववर्ष आणि क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने महात्मा फुले यांच्या प्रतिमेस आणि गुढीला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या महापुरुषांच्या जयंतीचे आणि नववर्षाचे औचित्य साधत नाट्यशास्त्र प्रशिक्षण वर्गातील प्रशिक्षणार्थी श्रीमती कामिनी महाडिक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनी व त्यांच्या जीवनातील प्रेरक प्रसंग सर्वांसमोर मांडले. डॉ. शशांक पाटील यांनी सूर्यास्त या नाटकातील उताऱ्याचे नाट्यवाचन केले. श्री. अविनाश चव्हाण यांनी भारतीय संविधानाची माहिती दिली. श्री. स्वरूप काणे यांनी सुरेश भट यांनी लिहिलेल्या गीताचे गायन केले. सौ. अनघा नागवेकर यांनी नववर्षाचे स्वागत करत कविता वाचन केले. सौ. सोनिया पाटील यांनी महात्मा फुले यांच्या विषयी माहिती सांगितली. श्री अक्षय माळी यांनी महात्मा फुले यांनी लिहिलेल्या तृतीय रत्न या नाटकाची माहिती सादर केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष रत्नागिरी उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे यांनी अध्यक्षीय भाषण केले. त्यात ते म्हणाले – संविधानाची रचना करीत असताना स्वातंत्र्य, समानता आणि एकात्मता यांचा प्रामुख्याने विचार केला गेला आहे. या थोर महापुरुषांनी मांडलेली तत्त्वे आणि विचार हे आजच्या काळातही सुसंगत असून सर्वांनी त्याचे आचरण आणि त्यांच्या साहित्याचे अध्ययन अवश्य केले पाहिजे.

उपकेंद्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, नाट्यशास्त्र प्रशिक्षण वर्गाचे विद्यार्थी या सर्वांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. सविता आंबर्डेकर यांनी केले. आसक्ती भोळे यांनी आभारप्रदर्शन केले.

भारतरत्न डॉ. पांडुरंग वामन काणे पुण्यतिथी १८ एप्रिल २०२४

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेंद्रामध्ये आज दिनांक १८ मार्च २०२४ रोजी भारतरत्न डॉ. पांडुरंग वामन काणे पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

पंचांग परिचय पाठ्यक्रम Onine Course – २६–२८ एप्रिल २०२४

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या रत्नागिरी उपकेंद्राद्वारे मा. कुलगुरू यांच्या प्रेरणेने ज्योतिष–वास्तुशास्त्र–अध्ययनमाला – १ या अंतर्गत दिनांक २६ ते २८ एप्रिल २०२४ या तीन दिवसांच्या कालावधीमध्ये पंचांग परिचय पाठ्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अखिल भारतीय स्तरावर या अभ्यासक्रमाचा प्रचार करण्यात आला. अध्यापनाचे माध्यम हिंदी ठेवण्यात आले होते. डॉ. दिनकर मराठे यांनी सहभागी विद्यार्थ्यांना तीन दिवस पंचांग परिचय या विषयावर मार्गदर्शन केले. वेदांग ज्योतिष विभागाचे प्रमुख प्रो. कृष्णकुमार पाण्डेय यांनी या पाठ्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी सद्यस्क माध्यमाने उपस्थित राहून प्रश्नोत्तर सत्र घेतले. तसेच समापनसत्रामध्ये आपल्या अध्यक्षीय भाषणातून त्यांनी पंचांग या विषयाची प्रासंगिकता आणि महत्त्व स्पष्ट प्रतिपादित केले. तीन दिवस घेण्यात आलेल्या या अभ्यासक्रमामध्ये पंचांगाचा अल्प परिचय (तिथि–वार–नक्षत्र–योग–कारण) करून देण्यात आला. वेदांग ज्योतिष्य विभागातील सहय्यक प्राध्यापक श्री. अनुज शर्मा, श्री. प्रणव मुळे यांनी सत्रांचे संचालन व समन्वयन केले.

सद्यस्क माध्यमातून संपन्न झालेल्या या अभ्यासक्रमासाठी भारताच्या विविध भागातून एकूण १०९ जणांनी सहभाग नोंदविला होता. महाविद्यालयाचे प्राध्यापक, शोध छात्र, ज्योतिष विभागाचे विद्यार्थी अशा सर्वांच्या उपस्थितीत हा पाठ्यक्रम संपन्न झाला. सहभागी व्यक्तींना प्रमाणपत्रे देण्यात आली.

विशेष उपलब्धी

प्रकाशन–

रत्नागिरी उपकेंद्राद्वारे न्याय दर्शन विषयक हस्तलिखित संपादन व प्रकाशन परियोजनेअंतर्गत १५ मे २०२३ रोजी जागदीशी नव्यन्याय – क्रोडपत्राणि, न्यायेन्दुशेखररू नव्यन्यायनिबन्धः, सत्प्रतिपक्षविजयः नव्यन्यायनिबन्धः, गादाधरी नव्यन्याय – क्रोडपत्राणि या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

पुरस्कार /योगदान–

दिनांकः १३ मार्च २०२४ रोजी महर्षिपाणिनीसंस्कृत एवं वैदिकविश्वविद्यालय उज्जैन येथे भारतीय ज्ञान परंपरा विभागाद्वारे अखिल भारतीय तंत्र शिक्षा परिषद शिक्षण मंत्रालय भारत सरकारच्या भारतीय ज्ञान संवाहक कार्यक्रमांतर्गत ग्रामवास्तु प्रेक्षण परियोजनेमध्ये ग्रामवस्तु या विषयवार डॉ. दिनकर मराठे यांनी व्याख्यान दिले.

दिनांक २१ मार्च २०२४ रोजी सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालय कराड येथे Idea of Bharat: Past, Present and Future या विषयावर आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये रत्नागिरी उपकेंद्राचे संचालक डॉ. दिनकर मराठे यांना व्याख्याता आणि सत्राध्यक्ष म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.

श्री व्यंकटेश्वर वैदिक विद्यापीठात १–४ मे २०२४ रोजी वैश्विक वैदिक विज्ञान परिषद संपन्न झाली. या परिषदेमध्ये डॉ. दिनकर मराठे यांना विशेष व्याख्याता म्हणून निमंत्रित करण्यात आले होते- Relevance of Ancient Indian Architectural Principles in Modern Times या विषयावर व्याख्यान दिले.

****

मुक्ताध्ययनपीठम्

वार्षिक अहवाल २०२३–२४

- शैक्षणिक सत्र २०२३–२४ मधील मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या एकुण गोषवारा (जुलै–२०२३ व जानेवारी–२०२४)

अ.क्र.	अभ्यासक्रमांचे नाव	अभ्यासक्रमाचे स्तर/प्रकार	अभ्यासक्रमाचे मान्यता स्तर	एकुण विद्यार्थी (संख्या)
०१	एम.ए.(संस्कृत)	पदव्युत्तर पदवी	यु.जी.सी.–डी.ई.बी.	१६९
०२	एम.ए.(योगशास्त्र)	पदव्युत्तर पदवी	यु.जी.सी.–डी.ई.बी.	८१
०३	बी.ए.(संस्कृत)	पदवी	यु.जी.सी.–डी.ई.बी.	११
०४	बी.ए.(योगशास्त्र)	पदवी	यु.जी.सी.–डी.ई.बी.	२६
०५	डिप्लोमा इन संस्कृत आगम	पदविका	विद्यापीठस्तरीय	८
०६	डिप्लोमा इन योगा अप्लीकेशन	पदविका	विद्यापीठस्तरीय	९
०७	डिप्लोमा इन आयुर्वेदिक मसाज ॲण्ड पंचकर्मा टेक्निशियन	पदविका	विद्यापीठस्तरीय	४
०८	डिप्लोमा इन आयुर्वेदिक पंचकर्मा	पदविका	विद्यापीठस्तरीय	६
०९	डिप्लोमा इन इंडियन फिलोसॉफी	पदविका	विद्यापीठस्तरीय	२
१०	डिप्लोमा इन इंटिरियर डिझायनिंग	पदविका	विद्यापीठस्तरीय	१
११	डिप्लोमा इन ज्योतिष	पदविका	विद्यापीठस्तरीय	६
१२	डिप्लोमा इन कर्मकांड	पदविका	विद्यापीठस्तरीय	४
१३	डिप्लोमा इन लायब्ररी ॲण्ड इन्फार्मेशन सायन्स	पदविका	विद्यापीठस्तरीय	६
१४	डिप्लोमा इन पौरोहित्य	पदविका	विद्यापीठस्तरीय	३
१५	डिप्लोमा इन संस्कृत जर्नालिझम अण्ड मास कम्युनिकेशन	पदविका	विद्यापीठस्तरीय	६
१६	डिप्लोमा इन उपनिषद्	पदविका	विद्यापीठस्तरीय	३
१७	डिप्लोमा इन वास्तुशास्त्र	पदविका	विद्यापीठस्तरीय	११
१८	डिप्लोमा इन वैदिक गणित	पदविका	विद्यापीठस्तरीय	२१
१९	डिप्लोमा इन योगा नॅचरोपॅथी ॲण्ड डायटेटिक्स	पदविका	विद्यापीठस्तरीय	३
२०	सर्टिफिकेट इन नेशन बिल्डींग थ्रु अर्थशास्त्र	प्रमाणपत्र	विद्यापीठस्तरीय	१
२१	सर्टिफिकेट इन भगवदगीता	प्रमाणपत्र	विद्यापीठस्तरीय	१४
२२	सर्टिफिकेट इन कम्युटर अप्लीकेशन	प्रमाणपत्र	विद्यापीठस्तरीय	२
२३	सर्टिफिकेट इन संस्कृत लिटरेचर	प्रमाणपत्र	विद्यापीठस्तरीय	१
२४	सर्टिफिकेट इन संस्कृत रायटिंग	प्रमाणपत्र	विद्यापीठस्तरीय	७
२५	सर्टिफिकेट इन ज्योतिष	प्रमाणपत्र	विद्यापीठस्तरीय	१५
२६	सर्टिफिकेट इन आयुर्वेदा	प्रमाणपत्र	विद्यापीठस्तरीय	४
२७	सर्टिफिकेट इन स्पोकन संस्कृत	प्रमाणपत्र	विद्यापीठस्तरीय	११
२८	सर्टिफिकेट इन वास्तुशास्त्र	प्रमाणपत्र	विद्यापीठस्तरीय	१९
२९	सर्टिफिकेट इन वैदिक गणित	प्रमाणपत्र	विद्यापीठस्तरीय	३
३०	फाउंडेशन इन योगदीक्षा	प्रमाणपत्र	विद्यापीठस्तरीय	१
३१	फाउंडेशन इन स्पोकन संस्कृत	प्रमाणपत्र	विद्यापीठस्तरीय	१६
	एकूण			**४७४**

- सी.डी.ओ.ई. व अंतर्गत चालणारे अध्ययन केंद्रे (एल.एस.सी.) (जुलै–२०२३)

अ. क्र.	मुख्यालय/अध्ययन केंद्राचे नाव	सेंटर कोड	मुख्यालय/अध्ययन केंद्रामार्फत चालणारे अभ्यासक्रम	शैक्षणिक सत्र	प्रवेशित विद्यार्थी
०१	श्री.गोळवलकर गुरूजी गुरूकुलम कॉम्पस, रामटेक (सी.डी.ओ.ई.–मुख्यालय)	११००१	एम.ए.(संस्कृत)	२०२३–२४	८५
			एम.ए.(योगशास्त्र)	२०२३–२४	३१
			बी.ए.(संस्कृत)	२०२३–२४	०४
			बी.ए.(योगशास्त्र)	२०२३–२४	१८
			डिप्लोमा इन संस्कृत आगम	२०२३–२४	०५
			डिप्लोमा इन योगा अप्लीकेशन	२०२३–२४	०१
			डिप्लोमा इन संस्कृत जर्नालिझम अण्ड मास कम्युनिकेशन	२०२३–२४	०४
			सर्टिफिकेट इन ज्योतिष	२०२३–२४	०६
			सर्टिफिकेट इन संस्कृत रायटिंग	२०२३–२४	०३
			फाउंडेशन इन स्पोकन संस्कृत	२०२३–२४	११
			सर्टिफिकेट इन भगवदगीता	२०२३–२४	०२
			सर्टिफिकेट इन वास्तुशास्त्र	२०२३–२४	०५
	एकूण				**१७५**
०२	भा. पा. वा. काणे संस्कृत अध्ययन केंद्र, रत्नागिरी उपकेंद्र, रत्नागिरी.	११०२७	एम.ए.(संस्कृत)	२०२३–२४	२४
			एम.ए.(योगशास्त्र)	२०२३–२४	०४
			बी.ए.(संस्कृत)	२०२३–२४	०१
			डिप्लोमा इन संस्कृत आगम	२०२३–२४	०१
			डिप्लोमा इन योगा अप्लीकेशन	२०२३–२४	०१
			सर्टिफिकेट इन भगवदगीता	२०२३–२४	०१
			सर्टिफिकेट इन वास्तुशास्त्र	२०२३–२४	०१
	एकूण				**३३**
०३	डॉ. पंजाबराव देशमुख योग महाविद्यालय, चांदुर बाजार, अमरावती.	११००२	एम.ए.(संस्कृत)	२०२३–२४	०१
०४	न्यु एज योगा इन्स्टिट्यूट, विले पारले, मुंबई (ई.)	११००५	एम.ए.(योगशास्त्र)	२०२३–२४	०३
०५	सर्वोदय श्री. चक्रधर स्वामी महाविद्यालय, जालना.	११०२८	एम.ए.(संस्कृत)	२०२३–२४	०१
०६	शिवस्वामिनी फाउंडेशन, शिर्डी, अहमदनगर	११५०१	सर्टिफिकेट इन वास्तुशास्त्र	२०२३–२४	०१
०७	द अस्टांग फाउंडेशन, थाणे	११०२३	एम.ए.(योगशास्त्र)	२०२३–२४	०१

- सी.डी.ओ.ई. व अंतर्गत चालणारे अध्ययन केंद्रे (एल.एस.सी.) (जानेवारी–२०२४)

अ. क्र.	मुख्यालय/अध्ययन केंद्राचे नाव	सेंटर कोड	मुख्यालय/अध्ययन केंद्रामार्फत चालणारे अभ्यासक्रम	शैक्षणिक सत्र	प्रवेशित विद्यार्थी
०१	श्री.गोळवलकर गुरूजी गुरूकुलम कॉम्पस, रामटेक (सी.डी.ओ.ई. –मुख्यालय)	११००१	एम.ए.(संस्कृत)	२०२३–२४	४५
			एम.ए.(योगशास्त्र)	२०२३–२४	३२
			बी.ए.(संस्कृत)	२०२३–२४	०३
			बी.ए.(योगशास्त्र)	२०२३–२४	०६
			डिप्लोमा इन संस्कृत आगम	२०२३–२४	०१

			डिप्लोमा इन योगा अप्लीकेशन	२०२३–२४	०६
			डिप्लोमा इन आयुर्वेदिक मसाज अॅण्ड पंचकर्मा टेक्निशियन	२०२३–२४	०४
			डिप्लोमा इन आयुर्वेदिक पंचकर्मा	२०२३–२४	०६
			डिप्लोमा इन इंडियन फिलोसॉफी	२०२३–२४	०२
			डिप्लोमा इन इंटिरियर डिझायनिंग	२०२३–२४	०१
			डिप्लोमा इन ज्योतिष	२०२३–२४	०६
			डिप्लोमा इन कर्मकांड	२०२३–२४	०४
			डिप्लोमा इन लायब्ररी अॅण्ड इन्फार्मेशन सायन्स	२०२३–२४	०६
			डिप्लोमा इन पौरोहित्य	२०२३–२४	०३
			डिप्लोमा इन संस्कृत जर्नालिझम अण्ड मास कम्युनिकेशन	२०२३–२४	०२
			डिप्लोमा इन उपनिषद्	२०२३–२४	०३
			डिप्लोमा इन वास्तुशास्त्र	२०२३–२४	११
			डिप्लोमा इन वैदिक गणित	२०२३–२४	२१
			डिप्लोमा इन योगा नॅचरोपॅथी अॅण्ड डायटेटिक्स	२०२३–२४	०३
			सर्टिफिकेट इन संस्कृत रायटिंग	२०२३–२४	०४
			सर्टिफिकेट इन नेशन बिल्डींग थ्रु अर्थशास्त्र	२०२३–२४	०१
			सर्टिफिकेट इन ज्योतिष	२०२३–२४	०४
			सर्टिफिकेट इन आयुर्वेदा	२०२३–२४	०४
			सर्टिफिकेट इन भगवदगीता	२०२३–२४	०४
			सर्टिफिकेट इन कम्युटर अप्लीकेशन	२०२३–२४	०२
			सर्टिफिकेट इन संस्कृत लिटरेर्चर	२०२३–२४	०१
			सर्टिफिकेट इन स्पोकन संस्कृत	२०२३–२४	०७
			सर्टिफिकेट इन वास्तुशास्त्र	२०२३–२४	०७
			सर्टिफिकेट इन वैदिक गणित	२०२३–२४	०३
			फाउंडेशन इन योगदीक्षा	२०२३–२४	०१
			फाउंडेशन इन स्पोकन संस्कृत	२०२३–२४	०५
	एकूण				**२०८**

अ. क्र.	**मुख्यालय/अध्ययन केंद्राचे नाव**	**सेंटर कोड**	**मुख्यालय/अध्ययन केंद्रामार्फत चालणारे अभ्यासक्रम**	**शैक्षणिक सत्र**	**प्रवेशित विद्यार्थी**
०२	भा. पा. वा. काणे संस्कृत अध्ययन केंद्र, रत्नागिरी उपकेंद्र, रत्नागिरी	११००५	एम.ए.(संस्कृत)	२०२३–२४	१३
			एम.ए.(योगशास्त्र)	२०२३–२४	१०
			बी.ए.(संस्कृत)	२०२३–२४	०३
			बी.ए.(योगशास्त्र)	२०२३–२४	०२
			डिप्लोमा इन संस्कृत आगम	२०२३–२४	०१
			डिप्लोमा इन योगा अप्लीकेशन	२०२३–२४	०१
			सर्टिफिकेट इन भगवदगीता	२०२३–२४	०७
			सर्टिफिकेट इन वास्तुशास्त्र	२०२३–२४	०५
			सर्टिफिकेट इन ज्योतिष	२०२३–२४	०५
			सर्टिफिकेट इन स्पोकन संस्कृत	२०२३–२४	०४
	एकूण				**५१**

- २०२३–२४ मध्ये विभागात कार्यरत असलेले कर्मचारी

अ.क्र.	कार्यरत कर्मचाऱ्याचे नाव	पद	कार्यरत ठिकाण
०१	डॉ. अनिल कुमार	संचालक	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक
०२	कु. श्रीवरदा श्री. माळगे	सहायक प्राध्यापिका	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक
०३	कु. रेणुश्री हे. बनसोड	सहायक प्राध्यापिका	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक
०४	श्री. कृणाल दि. महाजन	सहायक प्राध्यापक	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक
०५	श्री. अंकित मिश्रा	सहायक प्राध्यापक	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक
०६	डॉ. विश्व कुमार	सहायक प्राध्यापक	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक
०७	डॉ. मोहन लाल शर्मा	सहायक प्राध्यापक	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक
०८	डॉ. सुमित म. कठाळे	उपकुलसचिव (प्र.)	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक
०९	श्री. मेल्विन नोरोन्हा	तांत्रिक व्यवस्थापक	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक
१०	श्री. महेंद्र अ. वाघमारे	कक्ष अधिकारी	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक
११	कु. दिव्या प. लाहोरे	तांत्रिक–लिपीक	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक
१२	श्री. कमलेश ज. ठकरेले	लिपीक	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक
१३	सौ. सरिता न. कामडी	शिपाई	सी.डी.ओ.ई., क.का.सं.वि., रामटेक

- **२०२३–२४ मध्ये विभागाचे झालेले उत्पन्न व खर्च**

अ.क्र.	खर्चाचे वर्गनिहाय विवरण	उत्पन्न	खर्च
०१	मानव संसाधन खर्च (पगार)	५५,१८,२३२.००	२९,७९,३४५.००
०२	स्टडी मटेरियल प्रिंटिंग		१,४५,०२६.००
०३	स्टडी मटेरियल प्रिप्ररेशन		.....
०४	स्टडी मटेरियल प्रिप्ररेशन ट्रेनिंग प्रोगरॅम		.....
०५	वर्कशॉप/सेमिनार/ओरिएंटेशन		.....
०६	प्रवास खर्च		.....
०७	परीक्षा खर्च		.....
०८	मानधन–प्राध्यापक/समुपदेशक/इतर		१,४१,९०३.००
०९	मार्गदर्शक सभा व इतर सभा		७६,५२२.००
१०	पोस्टल/कुरिअर		.....
११	ऑफिस एक्सपेन्सेस		७,०२९.००
१२	र्वच्युअल क्लास रूम		.....
१३	इतर एक्सपेन्सेस		७,५८,८२२.००
१४	फरनिर्चर फार सी.डी.ओ. सेटअप		५५,०००.००
१५	कम्युटर/लॉपटाप/प्रिंटर आणि स्कॅनर्र		.....
१६	प्रवेशा करीता जाहिरात		.....
१७	इंटरनेट झुम मिटिंग ॲप रिचार्ज फार कॉन्टॅक्ट क्लॉसेस		.....
१८	स्टडी मटेरियल रायटर्स मानधन		.....
१९	एल.एम.सी./व्हिडीओ मानधन		.....
२०	संचालक मानधन		.....
२१	एम.के.सी.एल. ईरा		.....
२२	सेंटर शेअर		.....
२३	ग्रंथालय		.....
२४	रत्नागिरी उप–केंद्र		१०,२८५.००
२५	इम्प्रेस		.....

२६	नागपूर सेंटर एक्सपेन्सेस		.....
२७	बुक ट्रान्सलेशन		१,५०,५७८.००
२८	मोबाईल परचेस		१५,०००.००
एकूण			**४३,३९,५१०.००**

▪ स्पर्धा

➢ **शंखनाद स्पर्धा:**—जागतिक योग दिवस आणि गुरूपौर्णिमा दिनाचे औचित्य साधून विद्यापीठात पहिल्यांदाच शंखनाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मुक्ताध्ययनपीठम् आणि योग विज्ञान तथा समग्र स्वास्थ्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेत नागपूर शहरातील विविध भागातून ३८ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. विभागाच्या वतीने आयोजित शंखनाद स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आणि जास्तीत जास्त साधकांनी या स्पर्धेत भाग घेण्याकरीता दहा दिवशीय शंखनाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.
भारतीय संस्कृतीमध्ये शंखाचे अधिक महत्त्व आहे. समुद्रमंथनातून प्रगट झालेले हे रत्न मानवाचे शारीरिक व मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्य सुदृढ ठेवण्यास मदत करते. असे मत विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरू हरेराम त्रिपाठी यांनी व्यक्त केले. भव्य शंखनाद स्पर्धा उत्साहात पार पडली. या आगळया—वेगळया स्पर्धेत ३९ स्पर्धकांनी भाग घेतला होता.
जागतिक योग दिवस आणि गुरूपौर्णिमेच्या निमित्त्याने आयोजित ही स्पर्धा दिनांक ०३ जुलै रोजी विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसर येथील मुख्यालय येथे संपन्न झाली. याप्रसंगी गुरूपौर्णिमेनिमित्त मा. कुलगुरू सहत्नीक सत्कार आणि विश्वद्यालयाच्या संकाय प्रमुख्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर उपस्थित प्रा.हरेराम त्रिपाठी व डॉ.रामचंद्र जोशी संकाय प्रमुख प्रा.कृष्णकुमार पांडेय, प्रा.ललिता चंद्रात्रे, प्रा.कविता होले यांच्या सह मुक्ताध्ययनपीठमचे संचालक डॉ.दीपक कापडे, संचालक, मुक्ताध्ययनपीठम् व योग विभागाच्या प्रमुख मा. प्रा. कलापिनी अगस्ती आदि मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेत परीक्षक म्हणून देवलापार येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे श्री. उल्हास इटनकर यांनी जबाबदारी स्विकारली स्पर्धेत स्त्री आणि पुरूष असे दोन गट होते. स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे आहेत.

बाल्यगट (मुलगा): प्रथम क्रमांक—मानस सेलोकार/द्वितीय क्रमांक—अभंग किंमतकर
बाल्यगट (मुलगी):प्रथम क्रमांक—स्वरा चकीनारपुवार/द्वितीय क्रमांक—निवांशु सोनवणे
खुलागट (पुरूष):प्रथम क्रमांक—कौशल जोशी/द्वितीय क्रमांक—पंचशील थूल
खुलागट (स्त्री):प्रथम क्रमांक—अनुपमा श्रीवास्तव/द्वितीय क्रमांक—मयुरी कविश्वर

सदर कार्यक्रमाकरीता विश्वविद्यालयाचे मा.कुलगुरू आचार्य हरेराम त्रिपाठी, अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना, कुलसचिव डॉ.रामचंद्र जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. सुमित म. कठाळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा.कलापिनी अगस्ती यांनी कार्यक्रमात बक्षीस विजेत्यांची नावे आणि ऋणनिर्देश केले तर सहायक प्राध्यापक श्री. कृणाल महाजन यांनी सूत्रसंचालन पार पाडले. यावेळी विभागातील कु.सुजाता द्रव्यकार, श्री.अतुल गाळेराव, कु. श्रीवरदा माळगे, कु.रेणुश्री बनसोड, डॉ.अश्विनी देशपांडे श्री. रामसागर यादव आदी प्राध्यापक मंडळी तर श्री.महेंद्र वाघमारे, श्री. कमलेश ठकरेले, सौ.सरिता कामडी व सौ.अनिता चरडे आदींचे सहकार्य लाभले.

▪ कार्यक्रम

➢ **''चेअर योगा''**:—कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातील योग विज्ञान तथा समग्र स्वास्थय विभाग आणि मुक्ताध्ययनपीठम्च्या वतीने शासकीय कर्मचाऱ्यांच्या उत्तम आरोग्याकरीता विविध उपक्रम सुरू करण्यात राबविण्यात येणार आहेत. त्याच्या पहिल्या टप्प्यात 'चेअर योगा' सत्राचे उद्घाटन आज रोजी संपन्न झाले.

शासनाच्या महसूल सप्ताह आणि भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत शासकीय कर्मचाऱ्यांच्या आरोग्याकरीता पाच दिवशीय चेअर योगाचे आयोजन करण्यात आले आहे. याच्या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर मा.आमदार श्री.आशिष जयस्वाल, रामटेकच्या उपविभागीय अधिकारी सौ.वंदना सवरंगपते, मुक्ताध्ययनपीठम्चे संचालक डॉ.दीपक कापडे सहायक कुलसचिव डॉ. सुमित म. कठाळे आदि मान्यवर उपस्थित होते.

महसूल सप्ताहाचा समारोप करतांना शासनाच्या विविध उपक्रमांचा आढावा आमदार श्री.मा.अशिष जयस्वाल यांनी घेतला तर विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची माहिती डॉ.सुमित म. कळाळे यांनी देऊन कर्मचाऱ्यांसाठी असलेलायोगदीक्षा या अभ्यासक्रमाचे महत्त्व सांगितले. यावेळी कर्मचाऱ्यांच्या गुणवत मुलांचा सत्कार करून त्यांना भविष्याच्या शुभेच्छा डॉ.दीपक कापडे यांच्या वतीने देण्यात आल्या. कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी विश्वविद्यालयाने घेतलेल्या या पुढाकारामुळे उपविभागीय अधिकारी सौ.वंदना सवरंगपते यांनी आभार व्यक्त करत चेअर योगा च्या पाच दिवशीय शिबिराचे औपचारिक उद्घाटन झाले असे जाहिर केले.

- **संस्कृत बालसंस्कार वर्ग:—**विश्वविद्यालयाच्या सेंटर फार आऊटरिच आणि मुक्ताध्ययनपीठम् यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २१ ते २५ ऑगस्ट २०२३ या कालावधी दरम्यान निशुल्क संस्कृत बालसंस्कार वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम वर्गास बालकांचा उत्फुर्स प्रतिसाद प्राप्त झाला. तसेच संस्कृत शिकण्यामध्ये सगळया बालकांचा उत्साह सकारात्मक होता.

- **भव्य रक्तदान शिबीर :—**कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे दरवर्षी रक्तदान शिबीराचे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष २०२३—२४ मध्ये सुद्धा दि. ०५ फ्रेबुवारी २०२४ रोजी विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरात भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात विभागातील कु. श्रीवरदा श्री. माळगे, सहा. प्राध्यापिका व श्री. कृणाल दि. महाजन, सहा. प्राध्यापक यांनी रक्तदान करून सहभाग नोंदविला होता.

- **जगत्गुरू श्री शंकराचार्य एकदिवसीय—राष्ट्रीय गोष्ठी**:— कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय संचालित मुक्त व दूरस्थ शिक्षण केंद्र, रामटेक व भारतीय भाषा समिती, नवी दिल्ली तथा ताई गोळवलकर महाविद्यालय, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने 'जगत्गुरू श्री शंकराचार्य एकदिवसीय—राष्ट्रीय गोष्ठी' चे आयोजन दि. ३० मार्च २०२४ रोजी करण्यात आले होते. सदर कार्यक्रम विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरू डॉ. हरेराम त्रिपाठी यांच्या प्रेरणेने संपन्न झाला. सदर कार्यक्रमात मुख्यअतिथी म्हणून वसंतराव नाईक महाराष्ट्र कृषी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. डॉ इन्द्र मणि सर, ताई गोळवलकर महाविद्यालय, रामटेकचे प्राचार्य डॉ. राजेश सिंगरू तथा सी.डी.ओ.ई. चे संचालक डॉ. अनिल कुमार उपस्थित होते. तसेच सदर गोष्टीमध्ये जवळ—जवळ ३८२ विद्यार्थी ऑनलाईन तर २०० ऑफलाईन माध्यमातून उपस्थित होते.

  कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजेश सिंगरू यांनी ''नवीन शैक्षणिक धोरण २०२० ला 'भारतीय शिक्षण धोरण' म्हटले पाहिजे' असे प्रतिपादित केले. तर सी.डी.ओ.ई. चे संचालक डॉ. अनिल कुमार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सदर कार्यक्रम ४ सत्रात पार पडला. कार्यशाळेचे सूत्रसंचालन सी.डी.ओ.ई. चे सहा. प्राध्यापक अंकित मिश्र यांनी केले. सहा. प्राध्यापिका रेणुश्री बनसोडयांनी सरस्वती वंदना सादर केली. सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी सहा. प्राध्यापक श्री. कृणाल दि. महाजन, डॉ. मोहन लाल शर्मा, डॉ. विश्वकुमार तर श्री. महेंद्र म. वाघमारे, कक्ष अधिकारी, श्री. कमलेश ठकरेले, लिपीक व सौ. सरिता कामडी, शिपाई आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

- **उपलब्धी**

- सी.डी.ओ.ई. मधील विद्यार्थींनी देवयानी डोंगे हिने महात्मा गांधी प्राकृतिक जीवण विद्यापीठ, सेवाग्राम वर्धा येथे आयोजित योगा स्पर्धेमध्ये भाग घेवून प्रथम क्रमांक पटकविला आहे. तिच्या या यशाबद्दल सी.डी.ओ.ई. चे संचालक, सर्व सहायक प्राध्यापक, अधिकारी/कर्मचारी यांनी अभिनंदन देत पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या. सी.डी.ओ.ई. मधील विद्यार्थींनी नम्रता नितीन कल्याणकर यांना आयुष आंतरराष्ट्रीय मेडिकल असोशियन ॲण्ड एगमा यांच्याकडून जाहीर होणारा आयुष ग्लोबल अवॉर्ड २०२३ प्राप्त झाला. या यशाबद्दल सी.डी.ओ.ई. चे संचालक, सर्व सहायक प्राध्यापक, अधिकारी/कर्मचारी यांनी अभिनंदन देत पुढील वाटचालीकरीता त्यांना शुभेच्छा दिल्या.

* * *

शिक्षण महाविद्यालय (बी.एड.)

स्थापना वर्ष - २००३

शिक्षकवर्ग - शिक्षण

अभ्यासक्रम - बी.एड.

प्राचार्य - डॉ. राजश्री मेश्राम

सहयोगी प्राध्यापक - प्रा. माधवी पाटील, प्रा. शुभांगी मून, डॉ. सिद्धार्थ मंडल ,डॉ. शिवली चक्रवर्ती आणि प्रा. मंगेश दिघाडे.

विद्यार्थी संख्या (प्रथम आणि द्वितीय वर्ष) - १९८

उद्देश –

१. संस्कृत शिक्षक व इतर विषयांचे शिक्षक तयार करणे.
२. संस्कृत शिक्षण प्रणालीला आधुनिक युगानुसार अनुकूल करणे.
३. शिक्षण प्रणालीच्या सध्याच्या गरजेनुसार अभ्यासक्रम तयार करणे.

क.का.स.वी.,अध्यापक महाविद्यालय (बी.एड.)

अध्यापक महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये आयोजित केलेले कार्यक्रम :

1.मायक्रो टीचिंग कार्यशाळा :

बी.एड. प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी ११ ते १६ डिसेंबर २०२३ या कालावधीत सहा दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत ८५ विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या आयोजिका डॉ.राजश्री मेश्राम व प्रमुख पाहुणे प्रो.ललिता चंद्रात्रे होत्या. या कार्यक्रमात प्रो. किर्ती सदार, परिसर संचालक प्रो. हरेकृष्ण अगस्ती, प्रा.शुभांगी मून, प्रा.माधवी पाटील, डॉ. सिद्धार्थ मंडल, डॉ. शिवली चक्रवर्ती, प्रा.मंगेश दिघाडे उपस्थित होते.

या कार्यशाळेत विविध शिक्षण कौशल्यांचे प्रशिक्षण त्या विषयात प्राविण्य असलेल्या विशेषतज्ञाकडून देण्यात आले, जसे की प्रस्तावना कौशल्य, स्पष्टीकरण कौशल्य, चेतक बदल कौशल्य, प्रश्न व उत्तर कौशल्य आणि फलक लेखन कौशल्य.

अंतिम दिवशी, सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी दिलेल्या सूचनांनुसार मायक्रो-टीचिंग कौशल्याचा सराव केला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे निरीक्षण केले आणि मार्गदर्शन केले. सर्व विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभागी होऊन मायक्रो टीचिंग कौशल्ये आत्मसात केली. सहा दिवसांची कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली.

2.कला आणि हस्तकला प्रदर्शन :

बी.एड. प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी २३ डिसेंबर २०२३ रोजी अध्यापक महाविद्यालयाद्वारे एकदिवसीय प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्राचार्य डॉ. राजश्री मेश्राम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

प्रदर्शनाचे आयोजन "एन्हान्सिंग प्रोफेशनल कॅपसिटीज" (ईपीसी) या व्यावहारिक कार्याच्या अंतर्गत करण्यात आले. डॉ. सीमा चिखले, सहयोगी प्राध्यापक, वुमन्स कॉलेज ऑफ एज्युकेशन, एसएनडीटी, नागपूर यांना अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले. त्याच दिवशी viva-voce घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी कागद, कापड, जूट, काच इ. नैसर्गिक आणि पुनर्नवीन करण्यायोग्य साहित्य वापरून सुंदर कला आणि हस्तकला निर्मिती केल्या.

कागदाच्या बाहुल्या, हलवणाऱ्या रांगोळ्या, दिवे, कंदील, फोटो फ्रेम्स, कृत्रिम फुले, फुलदाण्या, शुभेच्छा पत्र इ. विद्यार्थ्यांद्वारा बनवण्यात आल्या.

प्रा.माधवी पाटील, प्रा.शुभांगी मून, डॉ. सिद्धार्थ मोंडल, डॉ. शिवली चक्रवर्ती आणि प्रा.मंगेश दिघाडे या प्रदर्शनीत उपस्थित होते. ८७ विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनीत सहभाग घेतला.

3. नूतन वर्ष साजरीकरण :

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या अध्यापक महाविद्यालयातर्फे आदरणीय शिक्षकांसाठी विद्यार्थ्यांनी १ जानेवारी २०२४ रोजी नवीन वर्ष साजरा केला. विद्यार्थ्यांच्या विनंतीवरून प्राचार्य डॉ. राजश्री मेश्राम, प्रो. ललिता चंद्रात्रे, प्रो. किर्ती सादर, डॉ. ऋषिकेश दलाई आणि डॉ. अमोल मांडेकर यांनी एकत्रितपणे केक कापून विद्यार्थ्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आणि मार्गदर्शन केले.

शिक्षकांसाठी विद्यार्थ्यांनी विविध मनोरंजक खेळ आणि नाश्ता आयोजित केला. प्रा.माधवी पाटील, प्रा. शुभांगी मून, डॉ. सिद्धार्थ मोंडल, डॉ. शिवली चक्रवर्ती आणि प्रा.मंगेश दिघाडे यांनी सक्रियपणे भाग घेतला. शिक्षकांनी नवीन वर्षाच्या शुभेच्छा आणि प्रेरणादायी संदेश दिला.

4.**सावित्रीबाई फुले जयंती :**

३ जानेवारी २०२४ रोजी, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या अध्यापक महाविद्यालयातर्फे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन बी.एड. च्या विद्यार्थ्यांनी केले होते.

प्रा.माधवी पाटील, प्रा.शुभांगी मून, डॉ. सिद्धार्थ मोंडल, डॉ. शिवली चक्रवर्ती आणि प्रा.मंगेश दिघाडे या कार्यक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमाची सर्व तयारी बी.एड.च्या विद्यार्थ्यांनी केली होती.

5. डोळे तपासणी शिबीर :

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठातर्फे महिला विभाग आणि ICC अंतर्गत बी.एड. विभागाने १२ मार्च २०२४ रोजी एकदिवसीय आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले. हे शिबीर आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने सर्व महिला व पुरुष, शिक्षक वर्ग ,कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासाठी आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात माननीय प्रो. हरेराम त्रिपाठी (कुलपती) - अध्यक्षस्थानी होते. प्रो. कृष्णकुमार पांडे (कुलसचिव) हे विशेष अतिथी रूपाने उपस्थित होते. डॉ. राजश्री मेश्राम या कार्यक्रमाच्या संयोजिका होत्या. डॉ. निनाद पाठक आणि डॉ. गौरी पाठक या शिबिराचे अतिथी होते. डॉ. रेणुका बोकारे (जनसंपर्क अधिकारी), प्रो. कविता होले(IQAC Director), प्रो. हरेकृष्ण. अगस्ती (परिसर संचालक) या शिबिरात उपस्थित होते.

प्रा.माधवी पाटील, प्रा.शुभांगी मून, डॉ. सिद्धार्थ मोंडल, डॉ. शिवली चक्रवर्ती आणि प्रा.मंगेश दिघाडे या कार्यक्रमात उपस्थित होते. ३५० जणांनी शिबीराचा लाभ घेतला.

6. शैक्षणिक सहल:

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या अध्यापक महाविद्यालयाच्या बी.एड. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ३० मार्च २०२४ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील बाबा आमटे यांच्या आनंदवनात शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली.

आनंदवन हे कुष्ठरोगाने पीडित व्यक्तींसाठी प्रसिद्ध आहे. जरी ते आजारी,मुके, बहिरे, अंध असले तरीही ते आत्मनिर्भर आहेत.

45 विद्यार्थ्यांसह प्राचार्य डॉ. राजश्री मेश्राम, प्रा.माधवी पाटील, प्रा.शुभांगी मून, डॉ. सिद्धार्थ मोंडल, डॉ. शिवली चक्रवर्ती, प्रा.मंगेश दिघाडे आणि लिपिक प्रवीण सरोदे या शैक्षणिक सहलीत उपस्थित होते.

7. योग कार्यशाळा :

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या महाविद्यालयातर्फे २१ जून २०२४ रोजी एकदिवसीय योग कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रा.माधवी पाटील व प्रा. शुभांगी मून या कार्यशाळेच्या संयोजिका होत्या

योगासनांसाठी डॉ. सिद्धार्थ मोंडल यांनी विद्यार्थ्यांना व सुब्बलक्ष्मी पांडा यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

8**. सांस्कृतिक कार्यक्रम :**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या अध्यापक महाविद्यालयाने (बी.एड.) द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी farewell कार्यक्रमापूर्वी व चौथ्या सत्राच्या अंतिम परीक्षेपूर्वी २२ जून २०२४ रोजी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला.

या कार्यक्रमाच्या संयोजिका शुभांगी मून होत्या. प्राचार्य डॉ. राजश्री मेश्राम यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. प्रा.माधवी पाटील, डॉ. सिद्धार्थ मोंडल, डॉ. शिवली चक्रवर्ती आणि प्रा.मंगेश दिघाडे या कार्यक्रमात उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी नाटक, गायन, एकांकिका, नृत्य, नकल इत्यादी कार्यक्रम सादर केले. एकूण १०० विद्यार्थी या कार्यक्रमात उपस्थित होते व त्यांनी सक्रियपणे भाग घेतला.

9. NAAC मार्गदर्शनासाठी कार्यशाळा :

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या अध्यापक महाविद्यालयातर्फे (बी.एड.) १६ जुलै २०२४ रोजी प्राध्यापकांसाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्राचार्य डॉ. राजश्री मेश्राम या कार्यशाळेच्या संयोजिका होत्या. प्रा.माधवी पाटील, प्रा.शुभांगी मून, डॉ. सिद्धार्थ मोंडल, डॉ. शिवली चक्रवर्ती आणि प्रा.मंगेश दिघाडे या कार्यक्रमात उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. राजश्री मेश्राम यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाल्यावर त्यांनी डॉ.सीमा चिखले ज्या अतिथी व्याख्याता होत्या त्यांचे स्वागत केले. त्यांनी खूपच साध्या भाषेत व रोचकपणे मार्गदर्शन केले.

10. संस्कृत स्पर्धा :

२ व ४ सप्टेंबर २०२४ रोजी विस्तारसेवामंडलम संस्कृत महोत्सवांतर्गत कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या बी.एड. विभागाने संस्कृत क्विझ, संस्कृत प्रेहलिका, श्लोक पाठन, संस्कृत गीत व आशू भाषण स्पर्धा आयोजित केल्या.

बी.एड. विद्यार्थ्यांसह संस्कृत, प्राकृत, वेद विभागातील विद्यार्थीही यात सहभागी झाले.

प्राचार्य डॉक्टर राजश्री मेश्राम,पाहुणे प्रो.ललिता चंद्रात्रे (अधिष्ठाता शिक्षण विभाग) आणि डॉ. ऋषिकेश दलाई (HOD स्पोर्ट्स डिपार्टमेंट) या स्पर्धांमध्ये उपस्थित होते. दोन्ही पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना संस्कृतचे महत्त्व त्यांच्या मार्गदर्शनांमध्ये समजावून सांगितले.

डॉक्टर शिवली चक्रवर्ती व सिद्धांत मंडल या स्पर्धांचे संयोजक होते. प्रा.शुभांगी मून, प्रा. माधवी पाटील व प्रा.मंगेश दिघाडे यांनी या स्पर्धांना यशस्वी करण्यासाठी मदत केली.

44 विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. प्रत्येक स्पर्धेत तीन बक्षिसे जाहीर करण्यात आली. वीस विद्यार्थी दर्शक म्हणून उपस्थित होते. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

* * *

संगणक विज्ञान विभाग

- संगणक विज्ञान विभागाद्वारे दिनांक २५/८/२०२३ रोजी विद्यार्थ्यांकरिता **''चित्रकला स्पर्धा''** घेण्यात आली. ही स्पर्धा विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभाग प्रमुख प्रो. कीर्ती सदार या उपस्थित होत्या.

  प्रो. ललिता चंद्रात्रे अधिष्ठाता शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. प्रा. मनाली पंडे या स्पर्धेच्या कार्यक्रम समन्वयक होत्या. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. चित्रकला स्पर्धेत इतर विभागातील विद्यार्थ्या सहभागी झाले होते. या स्पर्धेसाठी ४० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. प्रत्येक विद्यार्थ्याला चित्र काढण्यासाठी जास्तीत जास्त २ तासांचा अवधी होता. स्पर्धा दोन गटात विभागली गेली.

  १) चित्रकला २) स्केच

  या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख प्रो. कीर्ती सदार यांनी केले. प्रा. मनाली पंडे यांनी कार्यक्रमांचे संचालन केले. प्रा. स्नेहा आष्टणकर यांनी आभार मानले. संपूर्ण कार्यक्रम प्रो. कीर्ती सदार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

- संगणक विज्ञान विभागाद्वारे दिनांक ४/१/२०२४ रोजी विभाग प्रमुख प्रो. कीर्ती सदार यांच्या मार्गदर्शनात **''प्रश्नमंजुषा''** हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रो. कीर्ती सदार विभाग प्रमुख होते. स्पर्धेसाठी बी.सी.ए प्रथम वर्ष, बी.सी.ए द्वितीय वर्ष, बी.सी.ए तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता. स्पर्धेमध्ये १०० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख प्रो. कीर्ती सदार यांनी केले. प्रा. दिव्या बेलेकर या स्पर्धेच्या कार्यक्रम समन्वयक होत्या. बी.सी.ए ची विद्यार्थीनी कु. तृप्ती खडसे आणि सानिया गजबे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्रा. दिव्या बेलेकर यांनी आभार मानले.

  प्रश्नमजुंषा स्पर्धेचे पॅनल खालीलप्रमाणे आहे.

  १) प्रा. स्नेहा आष्टणकर २) प्रा. मनाली पंडे ३) प्रा. सीमा मोहने

  स्पर्धेचे विजेते – योगेन्द्र करी आणि अर्चिता निखारे

  स्पर्धेचे उपविजेते – अनुष्का सिंग आणि हर्षल ढोबळे

  संपूर्ण कार्यक्रम प्रो. कीर्ती सदार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

- संगणक विज्ञान विभागाद्वारे दिनांक २३/१/२०२४ रोजी विभाग प्रमुख प्रो. कीर्ती सदार यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांसाठी **''पोस्टर मेकिंग स्पर्धा''** आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. विलास महात्मे अधिष्ठाता कॅम्प्युटर टेक्नॉलॉजी किटस् रामटेक उपस्थित होते. प्रो. कृष्णकुमार पाण्डेय रजिस्ट्रार क.का.सं.वि, रामटेक आणि प्रो. हरेकृष्ण अगस्ती परिसर संचालक क.का.सं.वि, रामटेक हे कार्यक्रमाचे विशेष अतिथी होते. प्रो. कीर्ती सदार या कार्यक्रमाच्या निमंत्रक म्हणून संगणक विज्ञान विभागाच्या प्रमुख होत्या. प्रा. सीमा मोहने या स्पर्धेच्या कार्यक्रम समन्वयक होत्या. स्पर्धेसाठी बी.सी.ए प्रथम वर्ष, बी.सी.ए द्वितीय वर्ष, बी.सी.ए तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता. स्पर्धेसाठी १३० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. तसेच १०७ विद्यार्थ्यांनी विविध तांत्रिक विषयांवर पोस्टर बनवले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख प्रो. कीर्ती सदार यांनी केले. प्रा. विलास महात्मे हे स्पर्धेचे परीक्षक होते. प्रा. सीमा मोहने यांनी आभार मानले.

  पहिला विजेता – हिमांशू हारोडे, नेहाल भांडारकर, विशाल काठोके, दीपक सोनवणे

  द्वितीय विजेता – अर्चिता निखारे, दिव्या खेडकर, सुहानी मलेवार, थामिनी मेहरकुळे

  तृतीय विजेता – आशितोष कुठे, राकेश ईखार, अभिषेक चौधरी, जगन्नाथ चौलंगी

  संपूर्ण कार्यक्रम प्रो. कीर्ती सदार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

❖ संगणक विज्ञान विभागाद्वारे दिनांक २३/१/२०२४ रोजी बी.सी.ए विद्यार्थ्यांसाठी **'' कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशिन लर्निंग''** या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते. म्हणून प्रा. विलास महात्मे अधिष्ठाता संगणक तंत्रज्ञान किटस् रामटेकचे विभागप्रमुख प्रमुख पाहुणे व वक्ते होते. अध्यक्षस्थानी क.का.सं.वि चे कुलगुरू हरेराम त्रिपाठी उपस्थित होते. प्रो. कृष्णकुमार पाण्डेय रजिस्ट्रार क.का.सं.वि, रामटेक हे कार्यक्रमाचे विशेष अतिथी होते. तर संगणक विज्ञान विभागाचे प्रमुख प्रो. कीर्ती सदार कार्यक्रमाचे निमंत्रक होते. प्रा. मनाली पंडे कार्यक्रम समन्वयक होत्या. यामध्ये बी. सी.ए प्रथम वर्ष, बी.सी.ए द्वितीय वर्ष, बी.सी.ए तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता. प्रा. स्नेहा आष्टणकर यांनी आभार मानले. संपूर्ण कार्यक्रम प्रो. कीर्ती सदार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. सेमिनार यशस्वीरित्या पार पडला आणि त्याचा लाभ विद्यार्थ्यांना झाला. विद्यार्थी समाधानी झाले आणि सत्राचा आनंद लुटला.

परिसंवाद तीन सत्रात आयोजित करण्यात आला होता.

सत्र पहिला – उद्‌घाटन

सत्र दुसरा – कृत्रिम बुद्‌धिमत्ता

सत्र तिसरा – मशीन लर्निंग

➢ संगणक विज्ञान विभागाद्वारे दिनांक २५/१/२०२४ रोजी विभाग प्रमुख प्रो. कीर्ती सदार यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांसाठी **''युनिटी स्क्रिप्टिंग: ब्रिंगिंग युअर आयडियाज टू लाइफ''** या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रा. रसिका रेवतकर सहाय्यक प्रा. माहिती तंत्रज्ञान विभाग, किटस् रामटेक हे कार्यक्रमाचे संसाधन व्यक्ती होते. प्रो. कृष्णकुमार पाण्डेय रजिस्ट्रार क.का.सं.वि, रामटेक आणि प्रो. हरेकृष्ण अगस्ती परिसर संचालक क.का.सं.वि, रामटेक हे कार्यक्रमाचे विशेष अतिथी होते. प्रो. कीर्ती सदार विभागप्रमुख संगणक विज्ञान विभाग या कार्यक्रमाच्या निमंत्रक होत्या. प्रा. मनाली पंडे संगणक विज्ञान विभागाच्या समन्वयक यांनी सत्राचा परिचय करून दिला. प्रा. स्नेहा आष्टणकर यांनी आभार मानले. कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता. कार्यशाळेला संगणकशास्त्र विभागातील १२५ हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

मुख्य वक्त्या प्रा. रसिका रेवतकर यांनी युनिटी स्क्रिप्टिंग सॉप्टवेअर वापरून स्क्रिप्टिंग आणि गेम कसा तयार करायचा यावरील ३ तासांचे सत्र घेतले. मोफत उपलब्ध सॉप्टवेअरचा वापर करून उत्पन्न मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वत:चे व्यासपीठ कसे तयार करावे. याबद्‌दल संपूर्ण माहिती दिली. संपूर्ण कार्यक्रम प्रो. कीर्ती सदार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. ही कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडली व त्याचा लाभ विद्यार्थ्यांना झाला.

➢ संगणक विज्ञान विभागाद्वारे दिनांक २९/१/२०२४ रोजी बी.सी.ए विद्यार्थ्यांसाठी **'' आयओटी मधील भविष्यातील ट्रेंड आणि इनोव्हेशन''** या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी क.का.सं.वि चे कुलगुरू हरेराम त्रिपाठी उपस्थित होते. तसेच प्रा. पंकज आष्टणकर विद्यार्थी उपक्रमांचे अधिष्ठाता आणि कीट्स रामटेकमधील विभागप्रमुख इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन इंजिनीअर हे रिसोर्स पर्सन हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. प्रो. कृष्णकुमार पाण्डेय रजिस्ट्रार क.का.सं.वि, रामटेक आणि प्रो. हरेकृष्ण अगस्ती परिसर संचालक क.का.सं.वि, रामटेक हे कार्यक्रमाचे विशेष अतिथी होते. प्रो. कीर्ती सदार विभागप्रमुख संगणक विज्ञान विभाग या कार्यक्रमाच्या निमंत्रक होत्या. सेमिनार तीन सत्रात आयोजित करण्यात आला होता.

पहिले सत्र – उद्‌घाटन सत्र होते. दुसरे आणि तिसरे सत्र आयओटीवर होते.

प्रो. कीर्ती सदार विभागप्रमुख संगणक विज्ञान विभाग यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा. स्नेहा आष्टणकर यांनी संपूर्ण कार्यक्रमांचे संचालन केले. सहसंचालक प्रा. मनाली पंडे यांनी सत्राचा परिचय करून दिला. प्रा. स्नेहा आष्टणकर यांनी आभार मानले. परिसंवादासाठी विद्यार्थ्यांसाठी सक्रिय सहभाग होता. सेमिनारसाठी संगकण विज्ञान विभागातील १४० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. मुख्य वक्ते प्रा. पंकज एस. आष्टणकर यांनी इंटरनेट ऑफ थिंग्जवर दोन सत्रे घेतली. संपूर्ण कार्यक्रम प्रो. कीर्ती सदार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

हा सेमिनार यशस्वीपणे पार पडला आणि त्याचा फायदा विद्यार्थ्यांना झाला.

* * *

वाणिज्य आणि व्यवस्थापन विभाग

- **वाणिज्य आणि व्यवस्थापन** विभागाद्वारे दि. **१७/०८/२०२४** रोजी **सकाळी ११:०० वाजता परमपुज्य गोळवलकर गुरूजी शैक्षणिक परिसर, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय**, रामटेक येथे **"Career as a Company Secretary"** या विषयावर **परिसंवादाचे** आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात विद्यापीठाचे कुलगुरू मा. हरेराम त्रिपाठी यांनी अध्यक्षस्थान भूषवले. मा. कुलसचिव डॉ. कृष्णकुमार पांडे, मा. परिसर संचालक प्रो. हरेकृष्णा अगस्ती, मा. अधिष्ठाता शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा विभाग प्रो. ललिता चंद्रात्रे, मा. संचालक नियोजन तथा विकास मंडळ प्रो. प्रसाद गोखले, विभागप्रमुख वाणिज्य आणि व्यवस्थापन विभाग डॉ. अमोल मांडेकर मंचावर उपस्थित होते.
  कंपनी सचिव, भावेश थडाणी, अध्यक्ष भारतीय कंपनी सचिव संस्थान कार्यक्रमाला वक्ते म्हणून लाभले त्यांनी कंपनी सचिव क्षेत्रातील उपलब्ध विविध संधी बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
  स.प्रा. सीमा गायकवाड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तसेच स.प्रा. युवराज मेश्राम यांनी आभार प्रदर्शन केले. विद्यापीठाच्या विविध विभागातील शिक्षक व विद्यार्थी कार्यक्रमात उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.
- **वाणिज्य आणि व्यवस्थापन** विभागाद्वारे **दिनांक ०६/०९/२०२४** रोजी **परमपूज्य गोळवलकर गुरूजी शैक्षणिक परिसर, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय** येथे **संस्कृत महोत्सव २०२४** अंतर्गत **चित्रकला स्पर्धा** व **श्रम एवं जयति विषयावर व्याख्यानमालेचे** आयोजन करण्यात आले.
  कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. ललिता चंद्रात्रे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणुन संगणक विज्ञान विभागाच्या विभाग प्रमुख, प्रो. कीर्ती सदार, शारीरिक शिक्षण व खेळ विभागाचे संचालक डॉ. ऋषिकेश दलाई होते आणि वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे विभागप्रमुख डॉ. अमोल मांडेकर मंचावर उपस्थित होते. स्पर्धेत एकूण ६५ विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे **वक्ते डॉ. रोकश रोषण** यांनी आपल्या व्याख्यानातुन विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेचे महत्व समजवुन सांगितले.
  स.प्रा. श्रद्धा किंमतकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच स.प्रा. युवराज मेश्राम यांनी आभार प्रदर्शन केले. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.
- **वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाद्वारे दि. २४/०२/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता परमपूज्य गोळवलकर गुरूजी शैक्षणिक परिसर, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ येथे "MAH-CET for BBA/BCA 2024-25"** मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले.
  कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. ललिता चंद्रात्रे होत्या. वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे विभाग प्रमुख डॉ. अमोल मांडेकर मंचावर उपस्थित होते. श्री. अंशूल जयस्वाल अधिव्याख्याता, जनप्रभा महाविद्यालय, रामटेक प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते.
  स.प्रा. श्रद्धा किंमतकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच स.प्रा. युवराज मेश्राम यांनी आभार प्रदर्शन केले. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.
- **वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागअंतर्गत बी.बी.ए. आणि बी.कॉम. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यासाठी औद्योगिक सहलीचे** आयोजन दि. **१३/०१/२०२४ रोजी "Raymond Limited" ता. सौसर. जि. छिंदवाडा (मध्यप्रदेश)** येथे करण्यात आले होते. सदर औद्योगिक भेटीमध्ये बी.बी.ए. आणि बी.कॉम अंतिम वर्षाचे एकूण २६ विद्यार्थी आणि विभाग प्रमुख डॉ. अमोल मांडेकर, स.प्रा. शरचंद्र श्रीनिल, स.प्रा. आकश आंबिलडुके आणि स.प्रा. सीमा गायकवाड उपस्थित होते. सदर भेट ही विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमाचा भाग असून, विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रातील माहिती मिळणे हा या औद्योगिक भेटीच्यामागच उद्देश होता. **"Raymond Limited" येथील कर्मचारी श्री. आशिष शर्मा यांनी विविध उत्पादन विभागातील प्रक्रियेची माहिती** विद्यार्थ्यांना दिली.

* * *

लोकप्रशासन विभाग

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये लोकप्रशासन विभागामध्ये पुढील कार्यक्रम संपन्न झाले.

➢ UPSC आणि MPSC परीक्षा मार्गदर्शन परिसंवाद कार्यक्रम

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक द्वारा संचालित लोकप्रशासन विभाग व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र द्वारे दि. ०८ सप्टेंबर २०२३ रोजी UPSC आणि MPSC परीक्षा मार्गदर्शन परिसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरूवात ठिक ११:०० वाजता दिप प्रज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी होते. तर विशेष उपस्थिती म्हणून डॉ. रामचंद्र जोशी उपस्थित होते. तसचे विद्यापीठाचे रामटेक परीसर संचालक डॉ. हरेकृष्ण अगस्ती, ग्रंथालय विभागाचे डॉ. दिपक कापडे, डॉ. पराग जोशी, परीक्षा नियंत्रक डॉ. जयवंत चौधरी, लोकप्रशासन विभागाचे विभागप्रमुख डॉ. अमोल मांडेकर उपस्थित होते तर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेले श्री. ऋषीकुमार बिसेन (IRS 2010 Batch), नागपुर व दुसरे मार्गदर्शक म्हणून डॉ. सुशांत चिमणकर सहा. प्रा. राज्यशास्त्र विभाग PWS कॉलेज नागपूर व श्री. कुलदिप सोनकुसरे शोधार्थी लोकप्रशासन विभाग रा. तु.म. नागपूर विद्यापीठ उपस्थित होते.

प्रास्ताविक लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. अमोल मांडेकर यांनी मांडले. यात त्यांनी प्रशासकिय सेवक बनविण्याकरिता विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षांची माहिती सांगितली. नंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. अध्यक्षीय भाषणा नंतर प्रा. शिल्पी बोस यांनी आभार प्रदर्शन केले.

मान्यवरांच्या भाषणा नंतर पुढील सत्राची सुरूवात श्री. ऋषीकुमार बिसेन (IRS 2010 Batch), यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना UPSC परीक्षेच्या तयारी विषयी मार्गदर्शन केले आणि त्यानंतर द्वितीय वक्ते डॉ. सुशांत चिमणकर सहा. प्रा. राज्यशास्त्र विभाग PWS कॉलेज नागपूर यांचे व्याख्यान झाले. यांनी विद्यार्थ्यांना MPSC परीक्षेच्या तयारी विषयी मार्गदर्शन केले. आणि त्यानंतर तृतिय वक्ते श्री. कुलदिप सोनकुसरे यांचे व्याख्यान झाले. यांनी MPSC परीक्षेचा अभ्यासक्रम आणि परीक्षा योजना या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. सिमा गायकवाड यांनी केले तर पहिल्या सत्राचे आभार प्रदर्शन प्रा. आकाश आंबिलडुके यांनी केले, दुसऱ्या सत्राचे आभार प्रदर्शन प्रा. शरदचंद्र श्रीनिल यांनी केले. व तिसऱ्या सत्राचे आभार प्रदर्शन प्रा. सुशांक फुलझेले यांनी केले. कार्यक्रमाला प्रा. युवराज मेश्राम, प्रा. नितेश चकोले, प्रा. जयश्री डोंगरे आणि विभागीय लिपीक भाग्यश्री लाटकर यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला प.पु.गो.गु. शैक्षणिक परिसर क.का.सं.वि., रामटेक येथील विविध विभागाचे प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

➢ इंटर्नशीप उद्‌बोधन कार्यक्रम

लोकप्रशान विभागाने दिनांक २९/०१/२०२४ रोजी विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशीप उद्‌बोधन कार्यक्रम आयोजित केले. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक अंतर्गत संचालीत लोकप्रशासन विभागातील एम.ए. लोकप्रशासन च्या NEP 2020 अभ्यासक्रमानुसार द्वितीय सत्रातील विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान प्राप्त होण्याकरिता Internship हा विषय अभ्यासक्रमा मध्ये समाविष्ट आहे. इंटर्नशीप बाबत उद्‌बोधन तसेच इंटर्नशीपचे महत्व या विषयावर दोन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम सत्रात प्राध्यापक युवराज मेश्राम यांनी इंटर्नशीप ची ओळख करून दिली. आणि द्वितीय सत्रात प्राध्यापक सुशांक फुलझेले यांनी इंटर्नशीप चे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. विद्यार्थ्यांना रामटेक तालुक्यातील तहसिल कार्यालय, पाटबंधारे विभाग, या शासकिय कार्यालयात Internship करिता दि. ०१ फेब्रुवारी २०२४ ते २१ फेब्रुवारी २०२४ पर्यंत पाठवण्यात आले होते. त्यात एम.ए. लोकप्रशासन च्या १३ विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या Internship पुर्ण केली आहे.

* * *

विस्तार सेवा मंडळ

कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय विस्तार सेवा मंडळा अंतर्गत सामाजिक स्तरावर राबविण्यात येणा–या उपक्रमांचा प्रचार व प्रसार करण्यास मदत करत असते सत्र 2023–24 पासून विद्यार्थ्यांना होणा–या सुविधांविषयी सप्तसूत्रीय अहवाल खालीलप्रमाणे–

1) संस्कृत भाषेचा प्रचार– प्रसार व संस्कृतेतर विद्यार्थ्यांना संस्कृतची जागृती करणे.

2) संस्कृत, संस्कृती, संस्कार, लोककला व लोकसंस्कृती यांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करणे.

3) स्वीकृत अभ्यासक्रमाव्यतिरिक्त नवीन अल्पकालीन अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

4) विस्तार सेवा मंडळ अंतर्गत गुरु–शिष्य परंपरा अंतर्गत चालू अभ्यासक्रमांना अधिकाधिक वर्ग संचालन करणे.

5) वेद, योग, ज्योतिष, वास्तू, संगीत, कीर्तन, नृत्य, पौरोहित्य यासारखे सर्व पारंपारिक शास्त्र शिकवणारे महाविद्यालयाशी जोडणे याकरिता वेगवेगळे सेमिनार, कार्यशाळा, प्रशिक्षण, संस्कृत वर्ग इत्यादी चे आयोजन करणे.

6) संस्कृत महोत्सवाचे राज्यस्तरावर योजनांमध्ये सर्व संस्थांचा सहभागी करणे.

विस्तार सेवा मंडळा अंतर्गत खालील संस्थेकडून चालणारे गुरु–शिष्य परंपरा अभ्यासक्रम

अ.क.	संस्थेचे नाव	अभ्यासक्रम
1	रविकीर्ती संस्कृत अध्ययन केन्द्र सांगली	1) संस्कृत अध्यन प्रमाणपत्र अभ्यासक्रम–प्रथम स्तर 2) संस्कृत अध्यन प्रमाणपत्र अभ्यासक्रम–द्वितीय स्तर 3) बाल संस्कृत अध्यन प्रमाणपत्र अभ्यासक्रम–प्रथम पुष्प (वय वर्ष 7 ते 8) 4) बाल संस्कृत अध्यन प्रमाणपत्र अभ्यासक्रम–द्वितीय पुष्प (वय वर्ष 9 ते 10) 5) बाल संस्कृत अध्यन प्रमाणपत्र अभ्यासक्रम–तृतीय पुष्प (वय वर्ष 10 ते 14) 6) बाल संस्कृत अध्यन प्रमाणपत्र अभ्यासक्रम–प्रथम पुष्प (वय वर्ष 7 ते 8)
2	त्रिस्कंद ज्योतिष फलादर्श अभ्यासमंडळ, नागपुर	1.ज्योर्तिविज्ञान परिचय 2.ज्योर्तिविज्ञान प्रविण
3	ख्याती बहुदेशीय संस्था, वणी, यवतमाळ	1) बेसिक पेंटिग कोर्स 2) एडवांस पेंटिग कोर्स 3) किडस पेंटिग कोर्स 4) फेब्रीक पेंटिग कोर्स

		5) मण्डला आर्ट कोर्स 6) बेसिक सेमीक्लासिकल (भरतनाट्म)
4	रिच हॅरिटेज योगा सेंटर, वाघोली, पुणे	1.Medical Yoga Therapy Course (Basic) 2.Pregnancy Yoga Teacher Course
5	मातृका फाऊंडेशन, रामटेक	1.Certificate Course in Handmade bags 2.Certificate Course in Folk art 3.Certificate Course in Beauty Culture 4.Certificate Course in Makeup art 5.Certificate Course in Mehndi 6.Certificate Course in Daily Sensation cooking 7.Certificate Course in Beauty treatment for skin by Herbal Cosmetic 8. Certificate Course in Bamboo art
6	एन्डोरपीन, पुणे	1.Relationship Counselling Practitoner 2.CBT advanced Practitoner 3. Emotional Intellgence Advance Practitoner 4. Career Counselling
7.	छत्रपती शिवाजी महाराज इन्स्ट्ट्युट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, वर्धा	1.Certificate Course in Hotel Management
8.	श्री पुर्णवाद विश्वविद्या प्रतिष्ठाण, गुरुवाडा, पारनेर	1.पंचागविद्या–परंपरेतील विज्ञान
9.	साईप एज्युकेशन, पुणे	1.माइंडकुलनेस थेरपी 2.आर्युवेदिक सत्वावजय

तसेच कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, विस्तार सेवा मंडळ अंतर्गत बालरंगभूमी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय संस्कृत बालनाट्य स्पर्धेचे आयोजन प्रथमतः 2022 मध्ये करण्यात आले. ही स्पर्धा प्राथमिक आणि अंतिम फेरी या दोन स्तरांत होत असतो. प्रथम स्पर्धेची प्राथमिक फेरी व अंतिम फेरी घेण्यात येते. स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग असतो. यात अनेक शाळा सहभागी होतात. स्पर्धेतील विजयी चमूला प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक, उत्कृष्ट अभिनयासाठी पारितोषिक तसेच दिग्दर्शन, संगीत, प्रकाशयोजना, नेपथ्य, रंगभूषा आणि अभिनयाचे प्रमाणपत्र व स्मूर्तिचिन्ह प्रदान करण्यात येते.

बालनाट्य स्पर्धेची अंतिम फेरी ही 26 व 27 स्पटेंबर 2024 रोजी स्व. सुरेश भट सभागृह, नागपुर येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये प्राथमिक फेरीत 26 संघानी आपला सहभाग नोंदवला होता. त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

1 School Of Scholars, Amravati
2 Narayana Vidyalayam , Amravati
3 Prabhat Kids School , Akola
4 Bal Shivaji High School ,Akola
5 School of Scholars, Akola
6 Bhartiya Vidya Bhavan's NTPC Vidya Mandir, Mouda
7 Reliance Foundation School, Mouda
8 School of Scholars, Wardha
9 School Of Scholars, Yavatmal
10 The Achievers School , Nagpur
11 Bhavan's Bhagwandas Purohit Vidya Mandir , Chinchbhuvan,Nagpur
12 Era International School , Besa Nagpur
13 The Swaminarayan School Wardhamannagar , Nagpur
14 Mount Litera Zee School -Kamptee Road, Nagpur
15 Vinayakrao Deshmukh High School - Nagpur
16 Bhavan's Bhagwandas Purohit Vidya Mandir , Shrikrishna Nagar Nagpur,
17 School of Scholars , Atrey Layout, Nagpur
18 TIPTOP Convent , Nagpur
19 Saraswati Vidyalaya , Nagpur
20 Bhavan's Bhagwandas Purohit Vidya Mandir Civil Lines , Nagpur
21 Bharti Krishna Vidya Vihar Nagpur
22 Bhavan's B.P. Vidya Mandir, School Koradi , Nagpur
23 Delhi Public School Lava Nagpur
24 School of Scholars, Wanadongri , Nagpur
25 Bhavan's Bhagwandas Purohit Vidya Mandir, Ashti , Nagpur

पुरस्कार का विवरण	**राशि**
प्रथम	21000.00
द्वितीय	15000.00
तृतीय	10000.00
उत्कृष्ट अभिनय – प्रथम - बालक	2000.00
उत्कृष्ट अभिनय – द्वितीय - बालक	1500.00
उत्कृष्ट अभिनय – तृतीय - बालक	1000.00
उत्कृष्ट अभिनय – प्रथम - बालिका	2000.00
उत्कृष्ट अभिनय – द्वितीय - बालिका	1500.00
उत्कृष्ट अभिनय – तृतीय - बालिका	1000.00

दिग्दर्शन --------

प्रथम - 3000.00 द्वितीय - 2000.00 तृतीय - 1500.00

संगीत

प्रथम - 2000.00 द्वितीय - 1500.00 तृतीय - 1000.00

प्रकाशयोजना

प्रथम - 2000.00 द्वितीय - 1500.00 तृतीय - 1000.00

नेपथ्य

प्रथम - 2000.00 द्वितीय - 1500.00 तृतीय - 1000.00

वेशभूषा

प्रथम - 2000.00 द्वितीय - 1500.00 तृतीय - 1000.00

रंगभूषा

प्रथम - 2000.00 द्वितीय - 1500.00 तृतीय - 1000.00

नाट्यलेखन पुरस्कार (स्वालिखीत)

प्रथम - 2000.00 द्वितीय - 1500.00 तृतीय - 1000.00

प्रोत्साहन राशी - 57568.00

पुरस्कार रक्कम रुपये - 146068.00

S.No	Institute / School Name	Date	Reporting Time	नाटकम्
1	द स्वामिनारायण स्कूल, वर्धमान नगरम्, नागपुरम्	26/09/2024	8.00	विश्वास:
2	सरस्वती-विद्यालय:, शंकरनगरम्, नागपुरम्	26/09/2024	9.00	श्रीहर्षः
3	स्कूल ऑफ स्कॉलर्स ,अत्रे लेआऊट नागपूरम्.	26/09/2024	10.00	वयं राष्ट्रे जागृयाम।
4	रिलायंस फाऊण्डेशन स्कूल , मौदा	26/09/2024	11.00	विद्योत्तमा नाटकम्
5	भवन्स बी पी विद्या मंदिरम् , कोराडी, नागपुरम् ।	26/09/2024	12.00	भस्मात् उत्थितःमयूरः
6	भारती कृष्ण विद्या विहार , नागपुरम् ।	26/09/2024	13.00	वीरः बाबूरावः
7	भवन्स बी पी विद्या मंदिरम् , चिंचभुवन , नागपुरम् ।	26/09/2024	14.00	किं सुशिक्षिता: वयम्?
8	भवन्स बी पी विद्या मंदिरम् , आष्टी, नागपुरम् ।	26/09/2024	15.00	गौरवः
9	टिप टॉप कॉन्व्हेंट , नागपुरम् ।	26/09/2024	16.00	नदीतीरम्।
10	संस्कृत-प्रचारिणी-सभा , नागपुरम् ।	26/09/2024	17.00	मनोहरा वसुन्धरा।
11	भवन्स बी पी विद्या मंदिरम् , श्रीकृष्ण -नगरम् , नागपुरम् ।	27/09/2024	8.00	मनसुखायनम् ।
12	दि अचिवर्स स्कूल, नागपुरम्	27/09/2024	9.00	ज्ञानस्य मार्गम्
13	दिल्ली पब्लिक स्कूल , लावा , नागपुरम्	27/09/2024	10.00	देहि लक्षं ततो मे
14	भवन्स एन टी पी सी विद्या मन्दिरम् , मौदा	27/09/2024	11.00	गवाक्ष:
15	नारायणा विद्यालयम् अमरावती	27/09/2024	12.00	अनन्ता व्यथा
16	स्कूल ऑफ स्कॉलर्स, अमरावती	27/09/2024	13.00	पूर्णब्रह्म:
17	प्रभात किड्स स्कूल ,अकोला	27/09/2024	14.00	'यज्ञकुंड'
18	बाल शिवाजी माध्यमिक शाळा , अकोला	27/09/2024	15.00	महाराज: कीमर्थम् सुप्तवान्?

सत्र 2023–24 मध्ये विस्तार सेवा मंडळा अंतर्गत संस्कृत महोत्सवा मध्ये विविध कार्यकम घेण्यात आले त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

1)व्याकरणविभागद्वारा आयोजित – संस्कृतसम्भाषणशिबिर – दि.22 व 31 ऑगस्ट 2024 रोजी घेण्यात आले.

2) दर्शनविभाग तर्फे– संस्कृत विज्ञापन कलाप्रदर्शन–30.08.2024

3) योगविज्ञान व समग्रस्वास्थ विभागा तर्फे– त्रिदिवसीय योगसाधना कार्यशाळा–26 ते 28 ऑगस्ट 2024

4) वेद वैदिकविज्ञान विभाग शास्त्रविद्यागुरुकुलम्– सामवेदपारायण– 23 ऑगस्ट 2024

5) ज्योतिष विभाग– ज्योतिषशलाकास्पर्धा– 29.08.2024

6) शैक्षणीक परिसर रामटेक– वृक्षारोपणाचा कार्यक्रम– 29.08.2024

7) डॉ. पां. वा. काणे, संस्कृत– अध्ययनकेन्द्र रत्नागिरी– योग–प्रमाणपत्र कार्यशाळा–22 जुलै ते 22 ऑगस्ट 2024

8) 1.वेदांग ज्योतिष विभाग – गोकुळाष्टमी– 23 ऑगस्ट 2024

2.सूर्यसिध्दान्तग्रन्थपारायण

9) वाणिज्य आणि व्यवस्थापन विभाग–व्याख्यान आणि चित्रकला स्पर्धा–28 ऑगस्ट 2024

10) भारतीय दर्शन विभाग– ग्रंथ पठण– 23 ऑगस्ट 2024

11) संगणक विज्ञान विभाग– संस्कृत श्लोक पाठांतर स्पर्धा– 30 ऑगस्ट 2024

12) साहित्य विभाग– रामायणाधारिता प्रश्नमन्जुषास्पर्धा –02 सप्टेंबर 2024

13) अभिनव भारती वारंगा परिसर साहित्य विभाग– पुराणानां परिचयः स्वरूपच

*** * ***

राष्ट्रीय सेवा योजना

—: राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे वर्ष २०२३—२४ मध्ये घेण्यात आलेले कार्यक्रम व स्पर्धांचे विवरण :—

१. आंतरराष्ट्रीय योग दिवस :—

विभाग :— **राष्ट्रीय सेवा योजना**
ठिकाण :— **क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **२१ जून २०२३ रोजी, सकाळी ०७.०० वाजता**
विशेष उपस्थिती :— **१. मा. कुलगुरु, २. मा. कुलसचिव, ३. प्रो. मधुसूदन पेन्ना, ४. प्रो. हरेकृष्ण अगस्ती ५. डॉ. प्रसाद जोशी, प्र.कुलगुरू डेक्कन अभिमत विद्यापीठ, पुणे, सौ. वंदना सवरंगपते, उपविभागीय अधिकारी रामटेक क्षेत्र.**
सहभागी :— **५० राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व विश्वविद्यालयातील सर्व कर्मचारी**

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना, योगशास्त्र तथा समग्र स्वास्थ्य विभाग व शारीरिक शिक्षण तथा क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जून २०२३ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी यांनी भूषविले. सारस्वत अतिथी या नात्याने डॉ. प्रसाद जोशी, प्र.कुलगुरू डेक्कन अभिमत विद्यापीठ, पुणे तसेच रामटेक क्षेत्राच्या उपविभागीय अधिकारी सौ. वंदना सवरंगपते, प्रमुख अतिथी या नात्याने उपस्थित होते. भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे अधिष्ठाता प्रो. मधुसूदन पेन्ना, कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी, रामटेक परिसर संचालक प्रो. हरेकृष्ण अगस्ती कार्यक्रमाच्या संयोजिका प्रो. कलापिनी अगस्ती, रासेयो समन्वयक डॉ.जयवन्त चौधरी, क्रिडाविभाग संचालक डॉ. हृषिकेश दलाई तसेच सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, अधिकारी, विद्यार्थी याप्रसंगी विशेषत्वाने उपस्थित होते.

विशेष कार्यक्रमापूर्वी विद्यापीठातील सर्व सदस्यांनी आयुष मंत्रालय आणि विद्यापीठ द्वारे तयार करण्यात आलेल्या योग शिष्टाचाराचे पालन करून योगाभ्यास करण्यात आला. योग विभागाच्या विद्यार्थ्यांनी तसेच रासेयो स्वयंसेवकांनी योगप्रार्थना सादर केली. तद्नंर योगासनाला सुरुवात करण्यात आली. प्रो.कलापिनी अगस्ती यांनी योग विभागाद्वारे केवळ योग दिनाच्या निमित्तानेच नाहीतर संपूर्ण वर्षभरात योगसाधक, महिला यांच्यासाठी विशेष योगप्रशिक्षणांचे आयोजन केल्या जात असल्याचे आपल्या प्रास्ताविकेत सांगितले. याप्रसंगी शिबीरार्थींनी योगासन शिबीराचा लाभ होत असल्याने योगसत्र निरंतर सुरु राहवे, असेही त्या म्हणाल्या. योग साधना शिबिरा ५ वर्षांच्या बालकांपासून ते ७५४ वर्षांच्या आबालवृद्धांनी या शिबिरात उत्साहाने सहभाग घेतला होता. प्रो. मधुसूदन पेन्ना यांनी योगविज्ञान विभागाची स्थापना व कार्याचा आलेख सादर केला. २००६ मध्ये स्थापीत योग विभाग हा महाराष्ट्रातच नव्हेतर भारतातील विद्यापीठांमध्ये सर्वात प्रथम स्थापन झालेला योग विभाग आहे. येथील माजी विद्यार्थी योगसाधक म्हणून सर्वत्र कार्य करीत असून आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच योगसाधनेचा अवलंब केला असल्याचे ते म्हणाले. प्रमुख अतिथी उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते यांनी या कार्यक्रमात उपस्थित राहून योगसाधना करण्याची प्रेरणा मिळाल्याचे सांगून विद्यापीठाचा योग विभाग रामटेकमध्ये स्वास्थ्य, जागृती विषयक उत्तम कार्य करीत असून यासाठी कुलगुरुंचे व योग विभागाचे त्यांनी अभिनंदन केले.

२."मेरी माटी मेरा देश"(पंचप्रण शपथ, वृक्षारोपण, भूमातेस नमन, विरांना वंदन व ध्वजारोहण कार्यक्रम) :—

विभाग :— **राष्ट्रीय सेवा योजना**
ठिकाण :— **क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **०९ ते १५ ऑगस्ट २०२३**
सहभागी :— **विद्यार्थी व विश्वविद्यालयातील सर्व कर्मचारी**

—: पंचप्रण शपथ :—

भारत सरकारद्वारे निर्देशित **"मेरी माटी मेरा देश"** या अभियानाचे दि. ०९ ऑगस्ट २०२३ पासून सुरुवात करण्यात येत आहे. या अभियानामध्ये (NSS) राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक येथे परमपूजनीय गुरुजी गोळवलकर गुरुजी, शैक्षणिक परिसरात विश्वविद्यालयाच्या सर्व विभागांच्या विद्यार्थ्यांनी पंचप्राण शपथ घेतली. या पंचप्राण शपथेद्वारे विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भारताच्या उज्ज्वल भवितव्याकरीता कटिबद्ध होण्याचा निर्धार केला. या शपथेचे वाचन रासेयो स्वयंसेवक कु. अश्विनी बावणे हीने केले. त्या सोबत विश्वविद्यालयाच्या अन्य विद्यार्थ्यांनी अनुवाचन केले. यावेळी मुलांच्या वसतीगृहाचे अधीक्षक व क्रीडा विभागातील सहायक प्राध्यापक श्री. संतोष कोल्हे, बी.बी.ए. चे सहायक प्राध्यापक श्रीकांत श्रीनिल, रासेयो कार्यक्रम अधिकारी सहा.प्रा.सचिन डावरे व अन्य प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन विश्वविद्यालयाचे विद्यार्थी तथा रासेयो स्वयंसेवक लक्ष्मीरमण गुर्जलवार, अश्विनी बावणे, अनुज मंचावार, अभिराम घोडके, कृतिका जैन, विरती गाला, वैखरी काळे व अभिराम गदाधर यांनी केले.

—: वृक्षारोपण :—

"मेरी माटी मेरा देश" अभियान अंतर्गत (NSS) राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे दत्तक घेतलेल्या परसोडा/शितलवाडी परिसरात २५ रासेयो स्वयंसेवकांद्वारे ७५ रोपाचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी मुलांच्या वसतीगृहाचे अधीक्षक श्री. संतोष कोल्हे व रासेयो कार्यक्रम अधिकारी सहा.प्रा. सचिन डावरे उपस्थित होते. वृक्षारोपणाचे आयोजन व नियोजन सहा.प्रा. सचिन डावरे व समन्वयक, रासेयो डॉ. जयवन्त चौधरी यांनी केले.

—: भूमातेस नमन, विरांना वंदन व ध्वजारोहण कार्यक्रम :—

"मेरी माटी मेरा देश" अभियान अंतर्गत (NSS) राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या, रामटेक व नागपूर वारंगा परिसरात, ध्वजारोहणाचे आयोजन करण्यात आले. ध्वजारोहण विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रो.हरेराम त्रिपाठी यांच्या हस्ते करण्यात आले. मा.कुलगुरुंनी भारतीय स्वातंत्र्य सैनिक विरांना वंदन व भूमातेस वंदन करुन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करत मार्गदर्शन केले. यावेळी विद्यापीठाचे मा. कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी व विद्यापीठाचे सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

३. राष्ट्रीय क्रिडा दिवस :—

विभाग :— **राष्ट्रीय सेवा योजना**
ठिकाण :— **क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **दि. २९ ऑगस्ट २०२३**
विशेष उपस्थिती :— **मा. कुलगुरू, प्रो. ललिता चंद्रात्रे, प्रो. प्रसाद गोखले, डॉ. दिपक कापडे, डॉ. अमोल मांडेकर, डॉ. श्रीनिवास जे, श्री. राजीवरंजन मिश्रा**
सहभागी :— **विद्यार्थी**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या रामटेक शैक्षणिक परिसरात **शारिरीक शिक्षण तथा क्रिडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ ऑगस्ट २०२३ रोजी मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय क्रिडा दिन अंतर्गत ०५ विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.** उदघाटन कार्यक्रमाला उपस्थित मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. सदर कार्यक्रमास शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा संकायप्रमुख, प्रो. ललिता चंद्रात्रे, संचालक नियोजन व विकास मंडळ, प्रो. प्रसाद गोखले, ग्रंथपाल डॉ. दिपक कापडे, वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख, डॉ. अमोल मांडेकर, संचालक शास्त्रविद्यागुरुकुलम् डॉ. श्रीनिवास जे, महर्षी पाणिनी संगणक व तांत्रिक केंद्रप्रमुख, श्री. राजीवरंजन मिश्रा तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी

मोठ्या संख्येने उपस्थित होते. मा. कुलगुरू महोदयांनी मेजर ध्यानचंद यांनी क्रीडा जीवनात केलेल्या सर्वश्रेष्ठ खेळाडू कार्यावर प्रकाश टाकला तर प्रो. प्रसाद गोखले व प्रो. ललिता चंद्रात्रे यांनी त्यांच्या जीवनचरित्रातील महत्त्वपूर्ण वैशिष्टये विशद केली. कार्यक्रमाचे संचालन श्री. सचिन डावरे यांनी केले तसेच **कार्यक्रमाचे आयोजक डॉ. हृषीकेश दलाई व डॉ. जयवन्त चौधरी यांनी आभार प्रदर्शन यांनी केले.** कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता श्री. संतोष कोल्हे व श्री. सचिन डावरे यांनी सहकार्य केले.

४. "स्वच्छता ही सेवा अभियान" :—

विभाग :— **राष्ट्रीय सेवा योजना**
ठिकाण :— **क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **२८ सप्टेंबर २०२३ ते ०२ ऑक्टोंबर २०२३**
सहभागी :— **विद्यार्थी**

राष्ट्रीय स्वच्छता हे अभियान नाही तर संस्कार व्हावा! मा. कुलगुरू, प्रो. हरेराम त्रिपाठी

कविकुलगुरूकालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे ०१ ऑक्टोबर २०२३ रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या स्वच्छता अभियानात विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी, आस्थापना विभाग प्रमुख डॉ. रोशन अलोणे तसेच अभियांत्रिकी विभाग प्रमुख श्री. संतोष वाडीकर विश्वविद्यालयातील इतर प्राध्यापक वर्ग, अधिकारी वर्ग कर्मचारी वर्ग, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. जयवंत चौधरी व विद्यार्थ्यांनी या स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. मा. कुलगुरू प्रो हरेराम त्रिपाठी हे या स्वच्छता अभियानात सहभागी झाले. कुलगुरू पदी रूजू झाल्यापासून, अंतर्गत, बाह्य परिसर स्वच्छतेवर त्यांचा कटाक्ष आहे परंतु परिसर हरित करण्यावरही त्यांचा भर आहे. प्रो. त्रिपाठी आपल्या संबोधनात म्हणाले, पृथ्वी... धरा ही आपली आई आहे. ती आपल्याला धारण करते, आपले भरण पोषण करते. आईचा आदर, सन्मान करणे हा आपला संस्कार आहे. पृथ्वी प्रती हा संस्कार तिची देखभाल या स्वच्छतेच्या संस्कारातून आणि निसर्गप्रेही आचरणातूनच होऊ शकते. पृथ्वी ला म्हणजेच एकूणच पर्यावरणाला त्रास दिला तर मानवजातीला अनेक नैसर्गिक आपत्तीच्या माध्यमातून पर्यावरणाचा प्रकोप सहन करावा लागतो. पूर, अवेळी पर्जन्य, जमिनीची अति धूप, अनावश्यक जंगलतोड, पाण्याचा नाश, काँक्रीटीकरण अशा अनेक गोष्टी पर्यावरण—हासास कारणीभूत होत आहेत, यावर एकच उपाय आहे, तो म्हणजे पर्यावरण स्नेही जीवनशैलीचा स्वीकार करणे आणि पर्यावरण स्वच्छ शुद्ध सुरक्षित राहील याची काळजी घेणे, स्वच्छता हा संस्कार सर्वांमध्ये रुजला की तो आपलाच नाही तर राष्ट्रीय स्वभावच होईल आणि मग सहजच आपण स्वच्छतेप्रती जागरूक राहून स्वच्छता हीच सेवा असे आत्मसात करू.

या स्वच्छता अभियान दरम्यान विश्वविद्यालय परिसरातील स्वच्छता करण्यात आली तसेच विश्वविद्यालयाच्या बाहेरचा परिसर स्वच्छ करण्यात आला. या स्वच्छता अभियान दरम्यान जवळपास २० पोते प्लास्टिक गोळा करण्यात आले. विश्वविद्यालयातील सर्व अधिकारी वर्ग प्राध्यापक वर्ग कर्मचारी वर्ग व विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत, स्वस्थ भारत व प्लास्टिक मुक्त भारत अशा घोषणा करत स्वच्छता रॅलीचे आयोजन केले.

या अभियानात अभिनवभारती, वारंगा येथेही स्वच्छता अभियान संपन्न झाले. वारंगा परिसर संचालक प्रो मधुसूदन पेन्ना यांच्या नेतृत्त्वाखाली सर्व शिक्षक आणि कर्मयोगींनी या अभियानात सहभाग घेतला. या स्वच्छता अभियानाचे नियोजन संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, डॉ. जयवन्त चौधरी यांनी केले.

५. "भारतीय संविधान दिवस" :—

विभाग :— **राष्ट्रीय सेवा योजना**
ठिकाण :— **क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **२६ नोव्हेंबर २०२३**
सहभागी :— **विद्यार्थी**

दि. २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिवस म्हणुन संपूर्ण देशभरात साजरा केला जातो. त्याचाच एक भाग म्हणुन राष्ट्रीय सेवा योजना, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, द्वारे या दिवसाचे आयोजन दि. २६ नोव्हेंबर, २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता आभासी माध्यमाने करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी यांनी भुषविले. विश्वविद्यालयाचे मा. कुलसचिव प्रो. कृष्णकुमार पाण्डेय यांचे या निमित्त विशेष मार्गदर्शन लाभले. अध्यक्षीय भाषणात मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी यांनी भारतीय संविधान हे भारतीय संस्कृतीला अनुसरून असलेली आणि समाजाच्या सर्व घटकांना सामावुन घेणारी आदर्श संहिता असल्याचे सांगितले. या निमित्त भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन शास्त्री तृतीय वर्षाची विद्यार्थीनी कु. विरती गाला हीने केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक डॉ. जयवंत चौधरी यांनी केले. तर कार्यक्रमाचे समन्वयन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी श्री. सचिन डावरे यांनी केले. या कार्यक्रमाकरीता विश्वविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी मिळून एकूण ३८ जण उपस्थित राहिले.

६. स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंती :—

विभाग :— **राष्ट्रीय सेवा योजना**
ठिकाण :— **क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **१२ जानेवारी, २०२४**
सहभागी :— **विद्यार्थी**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे दि. १२ जानेवारी २०२४ रोजी . स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय युवा दिन अंतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कुलसचिव प्रो. कृष्णकुमार पाण्डेय यांचे हस्ते स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमास विशेष व्याख्याता म्हणून श्री. भरत जोशी विदर्भ विभागप्रमुख, विवेकानंद केंद्र नागपूर, उपस्थित होते. यांनी स्वामी विवेकानंद यांचे युवकांना उद्‌बोधन याविषयी भाषण केले की, विवेकानंदांनी सन् १८९३ मध्ये अमेरिकेतील शिकागो येथे झालेल्या जागतिक धर्म महासभेत त्यांनी भारताच्या वतीने सनातन धर्माचे प्रतिनिधित्व केले. अध्यात्माने भरलेले भारताचे वेदांत तत्त्वज्ञान केवळ स्वामी विवेकानंदांच्या भाषणांमुळे अमेरिका आणि युरोपातील प्रत्येक देशात पोहोचले असे सांगितले, त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली जी आजही कार्यरत आहे. ते रामकृष्ण परमहंस यांचे योग्य शिष्य होते. त्यांच्या "उठा, जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका" या वाक्याने सर्वांचे मन जिंकले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. कृष्णकुमार पाण्डेय यांनी स्वामी विवेकानंद हे वेदांताचे प्रसिद्ध आणि प्रभावशाली आध्यात्मिक शिक्षक होते. त्यांचे खरे नाव नरेंद्रनाथ दत्त असून विवेकानंदांनी केलेल्या कार्याची माहिती दिली. सर्व संस्कृतजनांसाठी विवेकानंदांचे संस्कृत व सनातन प्रेम ही आदराची आणि सन्मानाची बाब असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजक डॉ. जयवन्त चौधरी, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यांनी केले. कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून प्रो. हरेकृष्ण अगस्ती उपस्थित होते. तसेच प्रो.ललिता चंद्रात्रे, प्रो.कविता होले, प्रो.पराग जोशी, प्रो.प्रसाद गोखले, डॉ.राजश्री मेश्राम, तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्राक्शास्त्री द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी कु. वैखरी काळे तसेच आभार प्रदर्शन प्रा.नितेश चकोले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा.मनाली पांडे, प्रा.सिमा गायकवाड, श्री.ऋतिक गायधने यांनी मोलाचे सहकार्य केले.

७. भव्य रक्तदान शिबीर :—

विभाग :— **राष्ट्रीय सेवा योजना**
ठिकाण :— **क.का.सं.वि.,रामटेक**
दिनांक :— **०६ फेब्रुवारी, २०२४**
सहभागी :— **विद्यार्थी**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत जी. एस. के. ब्लड सेंटर अँड कॉम्पोनंट्स नागपूरद्वारे दि. ०६ फेब्रुवारी २०२४ रोजी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून विश्वविद्यालयाचे मा.कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी उपस्थित होते, तसेच मा. कुलसचिव प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, रामटेक परिसर संचालक प्रो.हरेकृष्ण अगस्ती, प्रो.पराग जोशी, जी. एस. के. ब्लड सेंटर अँड कॉम्पोनंट्स नागपूर चे संचालक, डॉ. आशिष खंडेलवाल व डॉ. श्वेता खंडेलवाल प्रामुख्याने उपस्थित होते. शिबीरामध्ये विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. रक्तदानाकरिता ५० जणांची नावे प्राप्त झाली होती. परंतु विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा प्रतिसाद बघून ८० जणांनी रक्तदान केले. संस्कृत विषयक तसेच बी.ए. संस्कृत, बीबीए, बीसीए, बीकॉम, बीएड व इत्यादी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता. रक्तदान शिबिराचा प्रारंभ सकाळी ११.०० वाजता झाला तसेच सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत रक्तदान शिबिर चालले. रक्तदान शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमात अध्यक्ष मा.कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी यांनी विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता जी. एस. के. ब्लड सेंटर अँड कॉम्पोनंट्स नागपूर चे संचालक, डॉ. आशिष खंडेलवाल यांनी विद्यार्थ्यांना रक्तदार करण्यास आपल्या उद्बोधन भाषणातून प्रेरित केले. ज्या ज्या विद्यार्थ्यांनी रक्तदान केले त्यांना विश्वद्यालयातर्फे प्रमाणपत्र तसेच जी. एस. के. ब्लड सेंटर अँड कॉम्पोनंट्स नागपूर यांच्यातर्फे प्रमाणपत्र, उपहार व नाश्ता देण्यात आला होता.

उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन सहा.प्रा.सिमा गायकवाड (कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना), तसेच आभार प्रदर्शन शिबीराचे आयोजक डॉ. जयवन्त चौधरी (संचालक, राष्ट्रीय सेवा योजना) यांनी केले. शिबीराच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. सचिन डावरे, प्रा.मनाली पांडे, प्रा. नितेश चकोल, श्री.ऋतिक गायधने यांनी मोलाचे सहकार्य केले.

८. आव्हान २०२३ राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर :—

विभाग :— राष्ट्रीय सेवा योजना
ठिकाण :— क.का.सं.वि.,रामटेक
दिनांक :— २५ डिसेंबर २०२३ ते दि. ०३ जानेवारी २०२४
सहभागी :— विद्यार्थी

चान्सलर ब्रिगेड आव्हान २०२३ राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर चे आयोजन गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दि. दि. २५ डिसेंबर २०२३ ते ०३ जानेवारी २०२३ या कालावधीत करण्यात आले होते. शिबीरामध्ये सहभाग घेण्याकरिता कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाद्वारे १.विक्रम सिंह टांक, सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालय, अमरावती २.गुंजन धाकडे, सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालय, अमरावती ३.सोनु तोडसे, छात्रवीर राजे संभाजी महाराज महाविद्यालय, मोरवा ४. कोमल बर्डे छात्रवीर राजे संभाजी महाराज महाविद्यालय, मोरवा या ०२ मुले व ०२ मुलींनी सहभाग नोंदविला. रक्तस्त्राव नियंत्रण, जखम नियंत्रण, आपत्तीची तयारी, ऑक्सीजन थेरपी, आपत्ती आधारित प्रथमोपचार, रुग्णाला उचलणे आणि हलवणे, साप किंवा प्राणी चावणे, गडगडाट आणि विजेचा आवाज, सुनामी, भार उचलणे आणि स्थिर करणे, आग सुरक्षा, भूकंप, भूस्खलन, पूर पाणी बचाव तंत्र, पोहण्याचे कौशल्य, प्रेरणादायी याख्यान, शारीरिक, योगा, क्रीडा याप्रकारे आव्हान २०२३ राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबीरात विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, डॉ. जयवन्त चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले.

९. "Adventure" साहसी क्रिडा शिबीर :—

विभाग :— राष्ट्रीय सेवा योजना
ठिकाण :— क.का.सं.वि.,रामटेक
दिनांक :— २७ ते ३१ मार्च २०२४
सहभागी :— विद्यार्थी

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मधील राज्यस्तरीय "Adventure" साहसी क्रिडा शिबीर चे आयोजन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती च्या वतीने गिरीजन शिक्षण महाविद्यालय, योगा केंद्र, अप्पर प्लेटो, शासकीय उद्यान जवळ, चिखलदरा, जि. अमरावती येथे दि. २७ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत करण्यात आले आहे.

तरी सदर शिबीरात शासन निर्णयाप्रमाणे विद्यापीठ निहाय नमूद केलेल्या संख्येनुसार कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेकद्वारे दोन रासेयो विद्यार्थी/सव्यंसेवक (०१ मुलगा व ०१ मुलगी) याप्रमाणे पाठविण्यात आले होते. विद्यार्थी/स्वयंसेवकांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	स्वयंसेवकांचे (विद्यार्थ्यांचे) नाव	मुलगा/मुलगी	वर्ग	मोबाईल नं.
१.	सचिन वाघमारे	**मुलगा**	एम.ए.आचार्य प्रथम वर्ष	९५७९३३१३८०
२.	मृणाली हरडे	**मुलगी**	एम.ए.आचार्य द्वितीय वर्ष	९४२२६०५६०८

१०. "राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन NRD/राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन" पथसंचलन SRD निवड चाचणी शिबीर:–

विभाग :– राष्ट्रीय सेवा योजना
ठिकाण :– पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
दिनांक :– २७ ते २९ सप्टेंबर, २०२३
सहभागी :– विद्यार्थी

राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे दि. १८ सप्टेंबर २०२३, रोजीच्या पत्रान्वये सन २०२३–२४ या वर्षात "राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन NRD/राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन" संचलन SRD निवड चाचणी महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर करण्याविषयी कळविण्यात आले होते. SRD/NRD निवड चाचणी शिबीर दि २७, २८ व २९ सप्टेंबर २०२३ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे आयोजित करण्यात आले होते.

त्यानुषंगाने कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाशील संलग्नीत व राष्ट्रीय सेवा योजनेच्या रविकांत रागीट महाविद्यालयातील ०१ पुरूष कु. श्रीकांत पासवाण रासेयो स्वयंसेवक व ०१ महिला कु. प्रेरणा धमगाये रासेयो स्वयंसेवक, याप्रकारे ०२ विद्यार्थ्यांना सहभागासाठी पाठविण्यात आले होते.

११. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान व शस्त्र प्रशिक्षण :–

विभाग :– राष्ट्रीय सेवा योजना
ठिकाण :– क.का.सं.वि.,रामटेक
दिनांक :– १४ एप्रिल, २०२४
सहभागी :– विद्यार्थी

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेकच्या राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विशेष व्याखानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे मुख्य वक्ता म्हणून प्रियदर्शनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, नागपूर चे व्याख्याता प्रो. शुभम चाफले व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना संचालक, डॉ. जयवन्त चौधरी यांनी केले. प्रो. शुभम चाफले यांनी डॉ. आंबेडकर यांनी केलेल्या योगदानावर प्रकाश टाकला. त्यांनी म्हटले की, स्वतंत्रता समानता, बंधुत्व और न्याय के चार मूल्यों की रक्षा करना हम सभी की जिम्मेदारी है. डॉ. आंबेडकरांनी आधुनिक युगात भारतीय राज्यघटना प्रत्यक्षात साकार करून आणि अंमलात आणून जगातील सर्वात जुनी लोकशाही देश भारताची लोकशाही मजबूत करण्याचे बहुमोल कार्य केले आहे. यासाठी आम्ही त्यांचे सदैव ऋणी राहू. मा.

कुलगुरु यांनी सांगितले की, डॉ. आंबेडकरांनी अत्यंत कठीण परिस्थितीत शिक्षण घेतले. नवीन पिढीने अभ्यासाची गंभीर भावना पसरवली पाहिजे आणि स्वत: ला आदर्श विद्यार्थी आणि भारतीय नागरीक म्हणून विकसित केले पाहिजे.

कार्यक्रमात मोठ्या संख्येने शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रीय सेवा योजना, स्वयंसेवक, कु. विरती गाला या विद्यार्थीनीने केले व आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना, कार्यक्रम अधिकारी स.प्रा. सचिन डावरे यांनी केले.

१२. जागतिक पर्यावरण दिन :–

विभाग :– राष्ट्रीय सेवा योजना
ठिकाण :– क.का.सं.वि.,रामटेक
दिनांक :– ०५ जून, २०२४
सहभागी :– विद्यार्थी व विश्वविद्यालयातील सर्व कर्मचारी

जागतिक पर्यावरण दिन हा एक जागतिक कार्यक्रम असून दरवर्षी ५ जून रोजी पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. या दिवशी, जागतिक पर्यावरणाला हानी पोहोचवणाऱ्या क्रियाकलापांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमधील अनेक लोक एकत्र येतात आणि पर्यावरण रक्षणासाठी एकत्र काम करतात. यावर्षी जागतिक पर्यावरण दिनानिमित्य राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत “आमची जमीन” या घोषवाक्याखाली जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण आणि दुष्काळ प्रतिरोधकता यावर लक्ष केंद्रित केले असून कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेकच्या राष्ट्रीये सेवा योजनाद्वारे विश्वविद्यालयाच्या परिसरात एकूण ४५ वृक्ष लागवड करण्यात आले. यावेळी विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी तसेच विश्वविद्यालयातील सर्व कर्मचारी व रा.से.यो. स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन डॉ. जयवन्त चौधरी, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यांनी केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त केलेल्या कार्यवाहीचे व अहवाल विहित विवरणपत्रात खालील प्रमाण आहे.

* * *

छात्र कल्याण विभाग

छात्र कल्याण विभागाद्वारे वर्ष २०२३–२४ मध्ये घेण्यात आलेले कार्यक्रम व स्पर्धांचे विवरण

१. १० दिवसीय छात्र प्रेरण कार्यक्रम (10 Day Students Induction Programme) :–

विभाग :– छात्र कल्याण विभाग
ठिकाण :– क.का.सं.वि.,रामटेक
दिनांक :– २१ जुलै ते ३१ जुलै २०२३
सहभागी :– विद्यार्थी

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसरात शास्त्रविद्यागुरुकुम् व छात्र कल्याण विभागाद्वारे २०२३–२४ शैक्षणिक सत्रात सर्व नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता दि. २१ जुलै ते ३१ जुलै २०२३ या कालावधीत (10 Day Students Induction Programme) १० दिवसीय छात्र प्रेरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन विश्वविद्यालयाचे मा.कुलगुरु, प्रो.हरेराम त्रिपाठी यांच्या हस्ते झाले. १० दिवसीय कार्यक्रमाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	दिनांक	वार	वेळ	विषय	वक्त्यांचे नाव
१.	२१ जुलै २०२३	शुक्रवार	११.०० ते १२.३०	१० दिवसीय छात्र प्रेरण कार्यक्रमाचे उद्घाटन कार्यक्रम	मा.कुलगुरु, प्रो.हरेराम त्रिपाठी व संचालक, नियोजन व विकास मंडळ, प्रो.प्रसाद गोखले
			१२.०० ते ०१.३०	संस्कृत संभाषण प्रशिक्षण वर्ग	डॉ. सुकान्त प्रामाणिक
			०२.३० ते ०३.३०	डिजीटल साक्षरतेवर व्याख्यान	श्री. राजीव रंजन मिश्रा
			०४.३० ते ५.३०	शस्त्र प्रशिक्षण (Self Defence)	श्री. अविनाश आसरे व चमू
२.	२२ जुलै २०२३	शनिवार	११.०० ते १२.३०	संस्कृत संभाषण प्रशिक्षण वर्ग	डॉ. सुकान्त प्रामाणिक
			१२.३० ते ०१.३०	इंग्रजी संप्रेशण कार्यशाळा	डॉ. श्वेता शर्मा
			०२.३० ते ०३.३०		डॉ. जयवन्त चौधरी
			०३.३० ते ०४.३०		श्री. पुष्कर आगाशे
			०४.३० ते ०५.३०	शस्त्र प्रशिक्षण (Self Defence)	श्री. अविनाश आसरे व चमू
३.	२३ जुलै २०२३	रविवार	१०.०० ते १.३०	प्रेरणादायक चित्रपट	चित्रलहरी चमू
			०३.३० ते ०४.३०	शैक्षणिक खेळ	श्री. रामसागर यादव व श्री. अविनाश
४.	२४ जुलै २०२३	सोमवार	११.०० ते १२.३०	संस्कृत संभाषण प्रशिक्षण वर्ग	डॉ. सुकान्त प्रामाणिक
			१२.३० ते ०१.३०	इंग्रजी संप्रेशण कार्यशाळा	डॉ. श्वेता शर्मा
			०२.३० ते ०३.००	विविध शिष्यवृत्तींची माहिती	श्री. धर्मेंद्र भिडे
			०३.०० ते ०३.३०		
			०३.३० ०४.३०	साहित्य विभागांतर्गत माहिती	प्रो. पराग जोशी
			०४.३० ०५.३०	शस्त्र प्रशिक्षण (Self Defence)	श्री. अविनाश आसरे व चमू
५.	२५ जुलै २०२३	मंगळवार	११.०० ते १२.३०	संस्कृत संभाषण प्रशिक्षण वर्ग	डॉ. सुकान्त प्रामाणिक
			१२.३० ते ०१.३०	इंग्रजी संप्रेशण कार्यशाळा	डॉ. श्वेता शर्मा
			०२.३० ते ०३.३०	वादविवाद स्पर्धा	डॉ. श्रिनीवास जे

			०३.३० ते ०४.३०	नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अभ्यासक्रम	प्रो. पराग जोशी
			०४.३० ०५.३०	शस्त्र प्रशिक्षण (Self Defence)	श्री. अविनाश आसरे व चमू
६.	२६ जुलै २०२३	बुधवार	११.०० ते १२.३०	संस्कृत संभाषण प्रशिक्षण वर्ग	डॉ. सुकान्त प्रामाणिक
			१२.३० ते ०१.३०	इंग्रजी संप्रेशण कार्यशाळा	डॉ. श्वेता शर्मा
			०२.३० ते ०३.३०	वेदांग ज्योतिष विभागांतर्गत माहिती	प्रो. प्रसाद गोखले
			०३.३० ते ०४.३०	भारतीय दर्शन व योग विभागांतर्गत माहिती	प्रो. कलापिनी अगस्ती
			०४.३० ०५.३०	शस्त्र प्रशिक्षण (Self Defence)	श्री. अविनाश आसरे व चमू
७.	२७ जुलै २०२३	गुरुवार	११.०० ते १२.३०	संस्कृत संभाषण प्रशिक्षण वर्ग	डॉ. सुकान्त प्रामाणिक
			१२.३० ते ०१.३०	इंग्रजी संप्रेशण कार्यशाळा	डॉ. श्वेता शर्मा
			०२.३० ते ०३.३०	शैक्षणिक परिसर रामटेक अंतर्गत माहिती	प्रो. हरेकृष्ण अगस्ती
			०३.३० ते ०४.३०	शास्त्रविद्यागुरुकुलम् अंतर्गत	डॉ. राघवेन्द्र भट्ट
			०४.३ ते ०५.३०	शस्त्र प्रशिक्षण (Self Defence)	श्री. अविनाश आसरे व चमू
८.	२८ जुलै २०२३	शुक्रवार	११.०० ते १२.३०	संस्कृत संभाषण प्रशिक्षण वर्ग	डॉ. सुकान्त प्रामाणिक
			१२.३० ते ०१.३०	इंग्रजी संप्रेशण कार्यशाळा	डॉ. श्वेता शर्मा
			०२.३० ते ०३.३०	संस्कृत मध्ये करिअर	डॉ. श्रीनिवास जे
			०३.३० ते ०४.३०		डॉ. आशिष जे
			०४.३० ०५.३०	शस्त्र प्रशिक्षण (Self Defence)	श्री. अविनाश आसरे व चमू
९.	२९ जुलै २०२३	शनिवार	११.०० ते १२.३०	नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अभ्यासक्रमावर प्रेरणादायी भाषण	मा. प्रधानमंत्री, श्री. नरेंद्र मोदी (ऑनलाईन)
१०.	३०जुलै २०२३	रविवार	११.०० ते ०४.००	रामटेक मधील इतिहासाची माहिती	डॉ. अमित भार्गव व श्री. सचिन द्विवेदी
११.	३१ जुलै २०२३	सोमवार	०३.०० ते ०५.००	१० दिवसीय छात्र प्रेरण कार्यक्रम समारोप कार्यक्रम	मा.कुलगुरु, प्रो.हरेराम त्रिपाठी व संचालक, प.पू.गो.गु. शैक्षणिक परिसर, रामटेक, प्रो. हरेकृष्ण अगस्ती

याप्रकारे (10 Day Students Induction Programme) १० दिवसीय छात्र प्रेरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. अमित भार्गव व श्री. सचिन द्विवेदी यांना १० दिवसीय छात्र प्रेरण कार्यक्रमाची जबाबदारी निर्पूणपणे पार पाडल्या बदद्ल डॉ. श्रीनिवास जम्मलमडका यांनी विशेष भेट म्हणून पुस्तके दिली. तसेच या १० दिवसीय छात्र प्रेरण कार्यक्रमात मुख्य वक्त्यांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट असे मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र व विशेष मानधन देण्यात आले. त्याचप्रकारे या १० दिवसीय छात्र प्रेरण कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट योगदान केल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यमाच्या शेवटी मुलींनी १० दिवसीय छात्र प्रेरण कार्यक्रमात प्रशिक्षण घेतलेल्या (Self Defence) शस्त्र प्रशिक्षणाचे प्रात्यक्षिक करुन दाखवले. त्यात त्यांनी दंड युद्धाचे प्रात्यक्षिक केले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री. सचिन द्विवेदी यांनी केले तसेच कार्यमाचे आभार प्रदर्शन डॉ. अमित भार्गव यानी केले व व शांती मंत्रानी कार्यक्रम संपन्न झाला.

२. गणेश उत्सव :–

विभाग :– छात्र कल्याण विभाग
ठिकाण :– क.का.सं.वि.,रामटेक
दिनांक :– १९ ते २८ सप्टेंबर २०२३
सहभागी :– विद्यार्थी

दि. १९ ते २८ सप्टेंबर २०२३ दरम्यान विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभागांतर्गत विद्यार्थी उत्सव मंडळाद्वारे गणेश उत्सव साजरा करण्यात आला. दि. १९ स्पटेंबर २०२३ रोजी विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसरात मा. कुलगुरु, प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या हस्ते यज्ञ करुन गणपती बाप्पांचे आगमन करण्यात आले. तसेच गणेश उत्सव निमित्त १० दिवस रोजी सर्व विभागांद्वारे प्रकारचे यज्ञ व आरती करण्यात आली. त्याचप्रमाणे १० दिवस विविध स्पर्धा, कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	कार्यक्रमाचे नाव
१.	गणपती स्थापना शास्त्रानुसार गणेशयाग
२.	श्लोकांताक्षरी
३.	शिक्षकांची संगीत खुर्ची स्पर्धा व मटकाफोड स्पर्धा
४.	रांगोळी स्पर्धा
५.	विद्यार्थ्यांची संगीत खुर्ची स्पर्धा
६.	चित्रकला स्पर्धा व दमशराज स्पर्धा
७.	(गणपती स्त्रोत), (गणपती अथर्वशीर्ष) कंठपाठ स्पर्धा
८.	स्वस्तीवाचन व प्रश्नमंजुषा स्पर्धा
९.	दुपारी महाप्रसाद व संध्याकाळी भजन संध्या
१०.	सकाळी सांस्कृतिक कार्यक्रम व संध्याकाळी गणपती विसर्जन

३. पदव्युत्तर स्तरावरील सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार :–

विभाग :– छात्र कल्याण विभाग
ठिकाण :– वर्णेकर सभागृह, प.पु.गो.गु. शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि., रामटेक
दिनांक :– दि. १८ सप्टेंबर २०२३
सहभागी :– १२ विद्यार्थी

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभागाद्वारे प्रत्येक पदव्युत्तर स्तरावरील विशेषाध्ययन विषयामध्ये गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना विश्वविद्यालयाच्या वर्धापन दिनी विशेषाध्ययन विषय वेद, व्याकरण, साहित्य, दर्शन, योग, वेदांग ज्योतिष तसेच शिक्षणशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना पुरस्कार दिले जातात. शैक्षणिक वर्ष २०२१–२२ तसेच २०२२–२३ या दोन वर्षाचे पुरस्कार संबंधित विभागातील विभाग प्रमुखांद्वारे पुरस्कार निवड समिती अंतर्गत सर्वाधिक गुणप्राप्त विद्यार्थ्यांच्या नावांचे अवलोकन करुन खालील पदव्युत्तर स्तरावरील सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

अ.क्र	विद्यार्थ्यांचे नाव	विभाग व अभ्यासक्रम	पुरस्कार
१.	अद्वैत विष्णु आर्वीकर	वेद तथा वैदिक विज्ञान विभाग (आचार्य वेद) २०२२–२३	(महर्षि वेदव्यास छात्र पुरस्कार)
२.	वैदेही मनोज गायकी	व्याकरण विभाग (आचार्य व्याकरण) २०२१–२२	(महर्षि पाणिनी छात्र पुरस्कार)
३.	तृप्ती विजय काशीकर	व्याकरण विभाग (आचार्य व्याकरण) २०२२–२३	(महर्षि पाणिनी छात्र पुरस्कार)
४.	श्रुति अजय शर्मा	साहित्य विभाग (आचार्य साहित्य) २०२१–२२	(नाट्यचार्य भरतमुनी छात्र पुरस्कार)
५.	राधा मुकुंद देशकर	साहित्य विभाग (आचार्य साहित्य) २०२२–२३	(नाट्यचार्य भरतमुनी छात्र पुरस्कार)
६.	आकांक्षा सुनिल पांडे	भारतीय दर्शन विभाग (आचार्य दर्शन) २०२१–२०२२	(वाचस्पतिमिश्र छात्र पुरस्कार)
७.	श्रुतिका संतोष बडगे	भारतीय दर्शन विभाग (आचार्य दर्शन) २०२२–२०२३	(वाचस्पतिमिश्र छात्र पुरस्कार)
८.	अंजली चंद्रमोहन राय	योग विभाग (एम.ए.योगशास्त्र) २०२१–२२	(महर्षि पतंजलि छात्र पुरस्कार)
९.	स्वराली बाळासाहेब जोशी	योग विभाग (एम.ए.योगशास्त्र) २०२२–२३	(महर्षि पतंजलि छात्र पुरस्कार)
१०.	कौशल गिरीश जोशी	ज्योतिष विभाग (आचार्य वेदांग ज्योतिष) २०२१–२२	(होरामर्मज्ञ वराहमिहिर छात्र पुरस्कार)
११.	प्रिया सुनील बुरंगे	शिक्षणशास्त्र विभाग (एम.एड) २०२१–२२	(डॉ.बाबसाहेब आंबेडकर छात्र पुरस्कार)
१२.	श्रुतिका ज्ञानेश्वर बावनकर	शिक्षणशास्त्र विभाग (एम.एड) २०२२–२३	(डॉ.बाबसाहेब आंबेडकर छात्र पुरस्कार)

दि. १८/०९/२०२३ रोजी विश्वविद्यालयाच्या २६ व्या स्थापनादिनानिमित्त पदव्युत्तर स्तरावरील सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करून प्रमाणपत्र २,०००/–रू. नगद पारितोषिक देण्यात आले.

४. शिक्षक दिवस :–

विभाग :– छात्र कल्याण विभाग
ठिकाण :– वर्णेकर सभागृह, प.पु.गो.गु. शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि., रामटेक
दिनांक :– ०५ सप्टेंबर २०२३
सहभागी :–

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक येथे मंगळवार दि. ०५ सप्टेंबर २०२३ रोजी शिक्षक दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून विश्वविद्यालयाचे कुलगुरू मा. प्रा. हरेराम त्रिपाठी उपस्थित होते. तसेच साहित्य विभागाच्या अधिष्ठात्या व IQAC संचालिका प्रा. कविता होले शिक्षणशास्त्र व संकीर्णविद्या संकायाच्या अधिष्ठात्या प्रा. ललिता चंद्रात्रेय वेदव्याकरण विभागाचे अधिष्ठाता व प. पू. गोळवलकर गुरुजी गुरुकुल परिसराचे परिसर संचालक प्रा. हरेकृष्ण अगस्ती व परीक्षा नियंत्रक व छात्र कल्याण विभाग संचालक डॉ. जयवंत चौधरी उपस्थित होते. दीपप्रज्वलन व सरस्वती वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मा. कुलगुरू प्रा. हरेराम त्रिपाठी यांचे स्वागत प्रा. अगस्ती यांनी केले. प्रा. अगस्ती यांचे स्वागत प्रा. पराग जोशी यांनी केले. प्रा. ललिता चंद्रात्रे यांचे स्वागत सहा. प्राध्यापिका श्रीवरदा माळगे यांनी केले. प्रा. कविता होले यांचे स्वागत प्रा. कलापिनी अगस्ती यांनी केले. डॉ. जयवंत चौधरी यांचे स्वागत डॉ. श्रीनिवास जम्मलमडका यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. हरेकृष्ण अगस्ती यांनी केले. त्यात त्यांनी कार्यक्रमाची भूमिका मांडली. त्यानंतर विश्वविद्यालयातील विद्यार्थिनी ईशा मशाणकर हिने शिक्षक दिवसाचे महत्त्व व सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचे जीवनचरित्र इंग्रजीत सांगितले. त्यानंतर विरती गाला, रेवती येनारकर, अभिराम गदाधर या विद्यार्थ्यांनी क्रमशः हिंदी, इंग्रजी, मराठी भाषेतील शिक्षकांचे महत्त्व सांगणाऱ्या कविता सादर केल्या. त्यानंतर मा. कुलगुरु यांच्या हस्ते विश्वविद्यालयातील सर्व शिक्षकांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर प्रा. कविता होले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षकांचे महत्त्व सांगून शिक्षकांना विद्यार्थ्यांना घडविण्याचा उपदेश केला. मा. कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना आपल्या मुलांप्रमाणे घडविण्याचा सल्ला दिला व शिक्षक समाजाचा पाया भक्कम रोवून समाजाचं भविष्य घडवितो, असे सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांकडूनच निर्माण करण्यात आलेले शिक्षकांच्या आठवणी संग्रहित करणारे चलचित्र (डॉक्युमेंटरी) दाखविण्यात आले.

या कार्यक्रमात सर्वच विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. अथर्व भारद्वाज या विद्यार्थ्यने संस्कृतमध्ये कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन केले. एकूण या कार्यक्रमात संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषाचतुष्काचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाली चांदेलकर हिने केले. शांति मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

५. "नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण करणे तसेच पाण्याची बचत करणे" एक दिवसीय प्रशिक्षण वर्ग :–

विभाग :– छात्र कल्याण विभाग
ठिकाण :– सभा कक्ष क्र. १२, प.पु.गो.गु. शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि., रामटेक
दिनांक :– ११ ऑक्टोंबर २०२३
सहभागी :–

दिनांक ऑक्टोंबर २०२३ रोजी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभाग व युनिसेफ तसेच महाराष्ट्र शासनाकडून "राज्यातील महाविद्यालयीन युवकांच्या सहभागाने, नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण करणे तसेच पाण्याची बचत करणे" याविषयी एक दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरू आचार्य हरेराम त्रिपाठी जी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रशिक्षण वर्गाला विशेष उपस्थिती म्हणून रामटेक परिसर संचालक प्रो. हरेकृष्ण अगस्ती उपस्थित होते. या वर्गाला प्रशिक्षण देण्याकरिता महाराष्ट्र शासनाकडून ग्रीन क्लब फॅकल्टी कॉर्डीनेटर मा. प्रियंका शेंडगे, युनिसेफ राज्य सल्लागार महाराष्ट्र राज्य., पुणे येथून मा. सायली डोंगरवार व मा. मधुकर लेंगरे तसेच नागपूरचे जिल्हा समन्वयक मा. विनोद खेडकर उपस्थित होते. एक दिवसीय प्रशिक्षण वर्गामध्ये विश्वविद्यालयाशी संलग्नित नागपूर जिल्ह्यातील २५ महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी असे एकूण ४० मान्यवर उपस्थित होते.

६. युवा महोत्सव २०२३–२४ (इंद्रधनुष्य निवडफेरी :–

विभाग :– छात्र कल्याण विभाग
ठिकाण :– प.पु.गो.गु. शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि., रामटेक
दिनांक :– २० ऑक्टोबर २०२३
सहभागी :– विद्यार्थी

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभागाद्वारे **'सांस्कृतिक युवा महोत्सव २०२३–२४'** चे आयोजन विश्वविद्यालयातील, रामटेकच्या शैक्षणिक परिसरात दि. २० ऑक्टोबर २०२३ रोजी घेण्यात आले. या युवा महोत्सवाचे उद्घाटन मा. कुलगुरु यांच्या हस्ते दिपप्रज्वलाने करण्यात आले. मा. कुलगुरु यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करतांना त्यांनी स्पर्धांचे महत्व व विश्वविद्यालयामध्ये युवा महोत्सवाचे महत्व स्पष्ट करुन सांगितले. तसेच विश्वविद्यालयाचे मा. कुलसचिव, प्रो. कृष्णकुमार पाण्डेय हे सारस्वत अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून विश्वविद्यालयाच्या पूर्व संकाय अध्यक्ष, संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय, प्रो. नन्दा पुरी महोदया उपस्थित होत्या, सांस्कृतिक युवा महोत्सव विश्वविद्यालयामध्ये मोठ्या हर्षाने साजरा केला जातो, यामध्ये सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून आपल्या कला सादर करायला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामटेक शैक्षणिक परिसर, संचालक, प्रो. हरेकृष्ण अगस्ती यांनी केले. युवा महोत्सवात विश्वविद्यालयाशी संलग्नीत एकूण १६ महाविद्यालयांमधील जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या युवा महोत्वात एकूण ०५ कलाप्रकारांमध्ये २६ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या २६ स्पर्धांपैकी २३ स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली.

महोत्सवाच्या कला प्रकारांमधील विविध स्पर्धांचे परिक्षण करण्याकरिता परिक्षण देखील आमंत्रीत करण्यात आले होते. संगीत स्पर्धांचे परिक्षण श्री. तन्मय चिचखेडे, प्रसिद्ध गायक रामटेक व प्रा. स्वाती नवघने यांनी केले, नृत्य व रंगमंचीय स्पर्धांचे परिक्षण प्रो. कविता होले, साहित्य विभागप्रमुख व प्रा. वैदेही चवरे रंगभूमी निर्देशक, नागपूर यांनी केले. साहित्यिक स्पर्धांचे परिक्षण प्रो. नन्दा पुरी व प्रो. पराग जोशी यांनी केले. ललित कला स्पर्धांचे परिक्षण प्रा. राजश्री काटे, स.प्रा. ललित कला विभाग, रा.सं. तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर व प्रा. राजश्री मेश्राम यांनी केले.

युवा महोत्वात समारोप व पुरस्कार वितरण सोहळयामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांनी स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आले व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. सर्वाधिक पुरस्कार पटकावल्यामुळे कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या चमूला सर्वोत्कृष्ट प्रथम पारितोषिक व सर्वोत्कृष्ट द्वितीय पारितोषिक सेन्ट्रल स्कूल ऑफ फाइन अॅन्ड आर्ट्स, नागपूर यांना देण्यात आले. तसेच सहभागी संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत समन्वयक म्हणून आलेल्या प्राध्यापकांचे देखील सत्कार तसेच करण्यात आले. या संपूर्ण सांस्कृतिक युवा महोत्सवाचे आयोजन संचालक, छात्र कल्याण, डॉ. जयवन्त चौधरी यांच्याद्वारे करण्यात आले.

७. 37th West Zone Inter University Youth Festival :—

विभाग :— छात्र कल्याण विभाग
ठिकाण :— प.पु.गो.गु. शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि., रामटेक
दिनांक :— २२/०१/२०२४ ते दि. २६/०१/२०२४
सहभागी :— विद्यार्थी

37th West Zone Inter University Youth Festival चे आयोजन दि. २२/०१/२०२४ ते दि. २६/०१/२०२४ दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे करण्यात आले होते. सदर महोत्सव अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आले. महोत्सवामध्ये विश्वविद्यालयाद्वारे एकूण १४ विद्यार्थी ०२ संघ व्यवस्थापक व ०१ संचालक, छात्र कल्याण सहभागी झाले.

८. "अविष्कार २०२३—२४" :—

विभाग :— छात्र कल्याण विभाग
ठिकाण :— प.पु.गो.गु. शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि., रामटेक
दिनांक :— १२ ते १५ जानेवारी २०२४
सहभागी :— विद्यार्थी

यावर्षी १६ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ "अविष्कार २०२३—२४" चे आयोजन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे दिनांक १२ ते १५ जानेवारी २०२४ दरम्यान करण्यात आले होते. त्या अनुषंगाने "अविष्कार २०२३—२४" मध्ये सहभाग घेण्याकरिता क. का. संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे सूचना निर्गमीत करण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०६ नावे प्राप्त झाली होती. त्यापैकी ०१ संघ प्रमुख श्री. सचिन डावरे व ०५ विद्यार्थ्यांना पाठविण्यात आले होते.

अ. क्र.	सहभागींचे नाव	वर्ग	सहभाग
१.	श्री. सचिन डावरे	सहायक प्राध्यापक, भारतीय दर्शन विभाग	संघ प्रमुख व प्रतिभागी
२.	विष्णुवर्धन बोम्मदेवरा	शास्त्री तृतीय वर्ष (ज्योतिष)	सहभाग
३.	अभिराम घोडके	शास्त्री प्रथम वर्ष (ज्योतिष)	सहभाग
४.	प्रशांत स्वामी	शास्त्री द्वितीय वर्ष (ज्योतिष)	सहभाग
५.	चारूदत्त अप्रजीत	आचार्य प्रथम वर्ष (ज्योतिष)	सहभाग
६.	चंद्रकांत बारीक	संशोधक छात्र, योगशास्त्र	सहभाग

९. राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धा २०२४ :–

विभाग :– छात्र कल्याण विभाग
ठिकाण :– प.पु.गो.गु. शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि., रामटेक
दिनांक :– १२ ते १५ जानेवारी २०२४
सहभागी :– विद्यार्थी

शिक्षा मंडल वर्धाद्वारे २२ व २३ जानेवारी २०२४ दरम्यान सम्पूर्ण भारतात प्रसिद्ध ४८ वी कमल नयन बजाज स्मरणार्थ, राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धा २०२४ चा आयोजन करण्यात आले होते. सदर राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धा २०२४ मध्ये विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागातील (शास्त्री तृतीय वर्ष) प्रितम पाटील या विद्यार्थ्याला पाठविण्यात आले होते.

१०. संक्रमणोत्सव :–

विभाग :– छात्र कल्याण विभाग
ठिकाण :– परमपुज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि., रामटेक
दिनांक :– दि. २३ ते २५ जानेवारी २०२३
सहभागी :– सर्व अभ्यासक्रमातील सर्व विद्यार्थी

छात्र कल्याण विभागाद्वारे दरवर्षीप्रमाणे यावर्षी संक्रमणोत्सव २०२३–२४ चे आयोजन दि. १२ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान करण्यात आले. या चार दिवसीय कार्यक्रमामध्ये दि. १२/०२/२०२४ रोजी शैक्षणिक स्पर्धा व दि. १३/०२/२०२४ रोजी क्रिडा स्पर्धाचे आयोजन करण्यात येईल तसेच दि. १४/०२/२०२४ रोजी पूरस्कार वितरण व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांचे विवरण खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	दिनांक	क्रिडा स्पर्धांचे नाव	अ.क्र.	दिनांक	सांस्कृतिक स्पर्धांचे नाव
१.	१३/०२/२०२४	खो–खो स्पर्धा	१.	१२/०२/२०२४	वक्तृत्व स्पर्धा
२.	१३/०२/२०२४	कबड्डी स्पर्धा	२.	१२/०२/२०२४	गीतगायन व समूह गीतगायन स्पर्धा
३.	१३/०२/२०२४	गोळा फेक स्पर्धा	३.	१२/०२/२०२४	फॅन्सी ड्रेस स्पर्धा
४.	१३/०२/२०२४	थाळी फेक स्पर्धा	४.	१२/०२/२०२४	एकपात्री अभिनय स्पर्धा
५.	१३/०२/२०२४	रनिंग स्पर्धा	५.	१२/०२/२०२४	प्रश्नमंजूषा स्पर्धा
६.		स्मारोप कार्यक्रम व पूरस्कार वितरण सोहळा	६.	१२/०२/२०२४	Reel Making Compitition
				१२/०२/२०२४	रांगोळी स्पर्धा
७.		सांस्कृतिक कार्यक्रम	७.		Reel Making Competition

११. सहल :–

विभाग :– छात्र कल्याण विभाग
ठिकाण :– "कुवारा भिवसन"
दिनांक :– दि. २४ फेब्रुवारी, २०२४
सहभागी :– १०० विद्यार्थी

२४ फेब्रुवारी, २०२४, रोजी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभागाद्वारे शैक्षणिक सहलीचे आयोजन केले. ही सहल दोन स्थळी गेली – रामटेकपासून साधारण ३० किमीवर स्थित कुंवारा भिवसेन आणि घोगरा महादेव. सकाळी ८ वाजता सर्व विद्यार्थी प.पू. गोळवलकर गुरूजी परिसराहून बसद्वारा निघालेत. या शैक्षणिक सहलीमधे जवळपास १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, आणि वारंगा परिसरातून देखील मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी आणि शिक्षकवृंद उपस्थित होते. कुंवारा भिवसेनच्या मार्गावर बस प्रसिद्ध पेंच व्याघ्र प्रकल्पावरून गेली, जिथे मुलांनी

झळाळणाऱ्याा, सोनेरी वाळलेल्या जंगली वनस्पतींच्या दृश्याचा आनंद लुटला. कुंवारा भिवसेनला पोहोचल्यावर सहल खऱ्या अर्थाने सुरू झाली. चढाई खूपच आनंददायी आणि मजेदार होती, पण ती तितकीच धोकादायक पण होती, कारण पायवाट खूपच चिंचोळी होती, एका बाजूला अति मोठे दगड, आणि दुसऱ्या बाजूला कित्येक फूट खोल दरी. वर पोहोचल्यावर तिथे स्थित असलेल्या एका मंदिरात सर्व विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी दर्शन घेतलं. काही वेळ तिथून नैसर्गिक दृश्यांचा, छायाचित्रणाचा मनसोक्त आनंद लुटल्यावर सर्वजण खाली उतरलेत. दोन तासांनंतर सर्वजण जेवायला बसलेत, आणि ३ वाजेपर्यंत जेवणं आटोपून सर्वांनी नौकाविहाराचा आनंद लुटला. प्रत्येक नावेमधे ८ मुलांचा समावेश करण्यात आला. तो अनुभव प्रत्येकासाठीच अतिवय संस्मरणीय होता. नौकाविहारानंतर सर्व किनाऱ्याावर पोहोचल्यावर, हजेरी झाल्यावर बसेस घोगरा महादेवसाठी सुटल्यात.

घोगरा महादेवला पोहोचल्यावर विद्यार्थी रस्त्यातल्या विभिन्न दुकानांपाशी थांबून खूप खरेदी करून मग सर्व मुख्य मंदिरात गेलेत. मंदिराचा अंतर्भाग पाण्याच्या खूप वर्षांच्या माराने सपाट आणि गुळगुळीत, करड्या रंगाच्या, अतिशय देखण्या शिलाखंडांनी निर्मित होता. तिथे छायाचित्रणासाठी देखील कित्येक स्थाने होती. पण त्या मंदिरापर्यंत पोहोचण्याचा रस्ता मात्र गुडघ्याएवढ्या खोल, पण अगदी शुद्ध, पारदर्शक पाण्यातून होता. महादेवाच्या मंदिरातून दर्शन घेऊन बाहेर आल्यावर मात्र सर्वजणांनी अगदी मनसोक्त जलक्रीडा केली. सर्व अगदी नखशिखांत भिजले. कित्येक विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियेनुसार संपूर्ण सहलीमधे हा सर्वांत मजेदार अनुभव होता. जवपास संध्याकाळच्या ६.३० च्या सुमाराला सर्व विद्यार्थ्यांच्या फेरहजेरीनंतर बसेसचा परतीचा प्रवास सुरू झाला. एकंदरीत सहल अतिशय आनंददायी आणि सुंदर होती.

१२. १९ वा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव "इंद्रधनुष्य २०२३–२४" :–

विभाग :– छात्र कल्याण विभाग
ठिकाण :– डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरगांबाद (छत्रपती संभाजीनगर)
दिनांक :– दि. ११ मार्च २०२४ ते १५ मार्च २०२४
सहभागी :–

राज्यातील ग्रामीण भागात असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक कला गुणांना वाव देण्यासाठी इंद्रधनुष्य युवा महोत्सव हे मोठे व्यासपीठ आहे. या वर्षी १९ वा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ सांस्कृतिक इंद्रधनुष्य युवा महोत्सव २०२३–२४ चे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरगांबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे दि. ११ मार्च २०२४ ते १५ मार्च २०२४ दरम्यान करण्यात आले होते. त्याकरिता दि. २०.१०.२०२३ रोजी क.का.संकृत विश्वविद्यालयात युवा महोत्सव २०२३–२४ (इंद्रधनुष्य निवडफेरी) चे आयोजन करण्यात आले होते. युवा महोत्सव २०२३–२४ इंद्रधनुष्य निवडफेरी मध्ये विश्वविद्यालयाच्या संलग्नित एकूण १५ ते २६ महाविद्यालयातील जवळपास ३५० विद्यार्थ्यांनी एकूण २५ कलाप्रकारांमध्ये सहभाग घेतला होता. त्यापैकी ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक तथा द्वितीय क्रमांक प्राप्त केले त्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य २०२३–२४ या स्पर्धेकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरगांबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे नेण्यात आले. विद्यार्थ्यांचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

१३. छत्रपती शिवाजी महाराज जयंती :–

विभाग :– छात्र कल्याण विभाग
ठिकाण :– वर्णेकर सभागृह, प.पु.गो.गु. शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि., रामटेक
दिनांक :– दि. १९ फेब्रुवारी २०२४
सहभागी :– शिक्षक व विद्यार्थी

विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण व व्याकरण विभागाद्वारे दिनांक १९/०२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता विश्वविद्यालयाच्या वर्णेकर सभागृह येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त नागपूर येथून प्रसिद्ध व्याख्याते व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर ज्यांचा प्रकल्प अभ्यास आहे असे डॉ. अमोल पुसदकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाच्या परमपूज्य गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसराचे मा. संचालक, प्रो. हरेकृष्ण अगस्ती उपस्थित होते. डॉ. अमोल पुसदकर

यांनी विद्यार्थ्यांना आपल्या व्याख्यानाच्या माध्यमाने शिवाजी महाराजांचे चरित्र त्यांचे कर्तृत्व व समाजावर असलेले त्यांचे उपकार यांची जाणीव करत आपले विचार विद्यार्थ्यांच्या समक्ष प्रस्तुत केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. हरेकृष्ण अगस्ती यांनी शिवाजी महाराजांचे चरित्र विद्यार्थ्यांसाठी कसे महत्त्वाचे आहे याविषयी आपले विचार प्रकट केले. या कार्यक्रमाचे संचालन डॉ. श्वेता शर्मा यांनी केले. कार्यक्रमाकरिता विश्वविद्यालयातील विद्यार्थी व रामटेक शहराचे काही गणमान्य व्यक्ती उपस्थित होते. शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

१४. "वीर सावरकर" चित्रपट :—

विभाग :— छात्र कल्याण विभाग
ठिकाण :— शांतिनाथ चित्रपटगृह, रामटेक
दिनांक :— दि. ०४ एप्रिल, २०२४
सहभागी :— ७४ विद्यार्थी

भारताच्या चित्रपटगृहांमध्ये "वीर सावरकर" हा ऐतिहासीक चित्रपट प्रदर्शित झालेला होता. या चित्रपटाच्या माध्यमाने भारत देशाचा ब्रिटीश कालीन इतिहास यासोबतच विविध क्रांतिकाऱ्यांची माहिती व देशाच्या स्वातंत्र्याबद्दल वीर सावरकरांचे विशेष योगदान प्रदर्शित करण्यात आले. तरी विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम ही भावना जागृत करण्याच्या हेतूने "वीर सावरकर" हा ऐतिहासीक चित्रपट रामटेक येथील चित्रपटगृहात दि. ०४/०४/२०२४ रोजी विश्वविद्यालयातील पारंपारिक अभ्यासक्रमात प्रवेशित व विश्वविद्यालयाच्या छात्रावासांमध्ये वास करत असलेल्या विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

१५. राष्ट्रीय मतदाता दिवस :—

विभाग :— छात्र कल्याण विभाग
ठिकाण :— प.पु.गो.गु. शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि., रामटेक
दिनांक :— दि. २५ जानेवारी, २०२४
सहभागी :— ६३ विद्यार्थी

भारतीय निर्वाचन आयोगाची स्थापना दि. २५ जानेवारी १९५० रोजी झाली. भारतीय नागरिकांमध्ये मतदानाविषयी जागरुकता निर्माण व्हावी व त्यांना त्यांच्या कर्तव्याविषयी जाणीव रहावी, याकरीता दि. २५ जानेवारी २०११ पासुन राष्ट्रीय मतदाता दिवस साजरा करण्यात येतो. त्याअनुषंगाने कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक येथे छात्र कल्याण विभाग व राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे दि. २५ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रीय मतदाता दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मतदाता शपथ ग्रहण केली. या कार्यक्रमाकरीता एकूण ६३ विद्यार्थी (३९ मुले व २४ मुली) उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास प्रा. शरदचंद्र श्रीनिल व प्रा. संतोष कोल्हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी श्री. सचिन डावरे यांनी केले.

—: शपथ :—

"हम, भारत के नागरिक लोकतंत्र में अपनी पूर्ण आस्था रखते हुए यह शपथ लेते है कि हम अपने देश की लोकतांत्रिक परम्पराओं की मर्यादा को बनाये रखेंगे तथा स्वतंत्र, निष्पक्ष एवं शांतिपूर्ण निर्वाचन की गरिमा को अक्षुण्ण रखते हुए, निर्भीक होकर, धर्म, वर्ग, जाति, समुदाय, भाषा अथवा अन्य किसी भी प्रलोभन से प्रभावित हुए बिना सभी निर्वाचनों में अपने मताधिकार का प्रयोग करेंगें"

१६. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेकानिमित्त — १० दिवसीय युवकांचे अनुभूति शिबीर — २०२४ :—

विभाग :— छात्र कल्याण विभाग
ठिकाण :— वर्णेकर सभागृह, प.पु.गो.गु. शैक्षणिक परिसर, क.का.सं.वि., रामटेक
दिनांक :— दि. दि. २४ मे, २०२४ ते ०४ जून २०२४
सहभागी :— ७० विद्यार्थी

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय व भारतीय शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय ज्ञान परंपरा, NEP 2020 व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेकानिमित्त दहा दिवसीय युवकांच्या अनुभूति शिबीराचे आयोजन दि. २४ मे, २०२४ ते ०४ जून २०२४ पर्यंत विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरात करण्यात आले होते. या शिबीरामध्ये जी भारतीय ज्ञान परंपरा वैदिक व उपनिषद काळामध्ये होती. तसेच बौद्ध व जैन काळामध्ये ज्या भारतीय ज्ञान परंपरेने संपूर्ण जगाचे नेतृत्व केलेले आहे. त्या भारतीय ज्ञान परंपरेचे युवकांच्या व NEP 2020 च्या माध्यमाने पून: प्रतिष्ठापन करण्याविषयी या दहादिवसीय अनुभूति शिबीरामध्ये विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले.

या शिबीराचे उद्घाटन दि. २४ मे, २०२४ रोजी करण्यात आले. शिबीराच्या उद्घाटन सत्राकरिता मुख्य वक्ता म्हणून श्रीनाथ पीठाधीश्वर, श्रीदेवनाथ मठ, श्रीक्षेत्र सुर्जी, अंजनीग्राम, जि. अमरावती येथील आचार्य जितेंद्रनाथजी महाराज उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरु, प्रो. हरेराम त्रिपाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे मुख्य वक्ता आचार्य जितेंद्रनाथजी महाराज यांनी सर्व युवकांनी अनुभूति शिबीरामध्ये १० दिवस प्रामाणिकतेने सहभागाकरिता आपल्या उद्बोधन व्याख्यानातून प्रोत्साहित केले. उद्घाटन सत्रामध्ये श्री. राजेश सिंगरु, मंत्री, भारतीय शिक्षण मंडळ, विदर्भ प्रांत, श्री. अतुलजी मेघे, विदर्भ प्रांत कार्यवाह, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, डॉ. अखिलेशजी पेशवे, अध्यक्ष, भारतीय शिक्षण मंडळ, विदर्भ प्रांत यांची गरिमामयी उपस्थिती होती. या शिबीरामध्ये संपूर्ण भारतातील एकूण ७० युवक प्राध्यापक व शोधछात्रांनी सहभाग घेतला.

* * *

सेंटर फॉर आऊटरिच प्रोग्राम

महिला, मुली व रामटेक परिसरातील इतर नागरिकांसाठी राबविण्यात आलेल्या कार्यक्रम व स्पर्धेचा तपशील

भौतिक, शैक्षणिक विकासासह शारिरीक व मानसिक विकास साधण्याचे ध्येय

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक यांचे भौतिक, शैक्षणिक विकासासह शारिरीक व मानसिक विकास साधण्याचे ध्येय आहे. या सहा शाळांचे पालकत्व आमच्या उद्दिष्टांचा भाग आहे असे प्रतिपादन कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी यांनी केले. कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या सेंटर फॉर आऊटरिच प्रोग्राम विभागातर्फे रामटेक येथील जिल्हा परिषद शाळा हमलापुरी, काचूरवाही, नवरगाव, भोजापूर, शितलवाडी, प्रकाश हायस्कुल ॲन्ड ज्युनियर कॉलेज कांद्रीमाईन, रामटेक शाळांच्या शारिरीक व मानसिक विकासाच्या लोकार्पण सोहळयाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात ते बोलत होते. याप्रसंगी विद्यापीठाचे सन्माननिय कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी, डॉ. हृषिकेश दलाई, डॉ. अमोल मांडेकर, डॉ. दिपक कापडे, कार्यक्रमाच्या संचालिका प्रो. ललिता चंद्रात्रे, जिल्हा परिषद शाळा, हमलापुरी मुख्यध्यापीका श्रीमती माधुरी जयस्वाल जिल्हा परिषद शाळा, काचूरवाही मुख्यध्यापक श्री सुरेश धुर्वे, जिल्हा परिषद शाळा नवरगाव मुख्यध्यापीका रजनी लाडेकर, जिल्हा परिषद शाळा भोजापूर मुख्यध्यापक श्री नरेन्द्र डबीर, जिल्हा परिषद शाळा शितलवाडी मुख्यध्यापक श्री संजय शिंगाडे, प्रकाश हायस्कुल ॲन्ड ज्युनियर कॉलेज, कांद्रीमाईन, रामटेक शाळेचे मुख्यध्यापक श्री मिलींद वानखेडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. दरम्यान संस्कृतचे महत्व विद्यार्थ्यांना कळावे या उद्देशाने येणाऱ्या काळात काही शाळांचे पालकत्व घेऊन तेथे दहा दिवसांची कार्यशाळा घेणार असल्याचे सन्माननिय कुलगुरु यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. माधवी कांबळे, प्रा. राजेन्द्र कांबळे, राकेश श्रीरामे, जावेद तुरक आदित्य शुक्ला, मनिषा सहारे यांचे सहकार्य लाभले.

मोफत शिलाई मशीन वाटप

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक संचालित Center for Outreach Programme तर्फे विविध कौशल्य प्रशिक्षणे देण्यात येतात. जे पुढे महिलांना फायदेशीर ठरते. या प्रशिक्षणाकरिता रामटेक परिसरातील आजुबाजूच्या गावातील महिला सहभागी होत असतात. या महिलांपैकी आर्थिकदृष्टया गरजू व कमकुवत दोन महिलांना

1) रोषणा बापूराव सिरसाम

2) सपना मिलींद खोब्रागडे

दिनांक 17.09.2023 रोजी महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल श्री. रमेश बैस ऑनलाईन कार्यक्रमात उपस्थित होते यांच्या शुभहस्ते मोफत शिलाई मशीन प्रदान करण्यात आल्या. या प्रसंगी क. का. संस्कृत विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी, मा. कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी तसेच Center for Outreach Programme च्या संचालिका, डॉ. अश्विनी देशपांडे, सर्व मा. अधिष्ठाता, मा. विभाग प्रमुख, मा. अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

प्रशिक्षण (Payable)
ब्युटी पार्लर

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक द्वारा संचालित Center for Outreach Programme तर्फे मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या प्रेरणेतून विविध कौशल्य विकास प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण **93** महिला व मुलींना शिवणकाम, ब्युटी पार्लर, मेहंदी काढणे, जिम प्रशिक्षण यशस्वीपणे देण्यात आले. तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्याच्या प्रमाणपत्र डॉ. अनिल कुमार संचालक सेंटर फॉर आऊटरिच प्रोग्रॅम, यांच्या मार्गदर्शनात वितरीत करण्यात आले.

शिवणकाम व ब्युटी पार्लर प्रशिक्षिका सौ. दिपाली वाघमारे, मेहंदी प्रशिक्षिका कु. मैथिली काकडे आणि जिम प्रशिक्षक प्रा. कोल्हे, यांनी यशस्वीरित्या प्रशिक्षण दिले.

- **ब्युटी पार्लर प्रशिक्षण** 11 डिसेंबर 2023 ते 11 जानेवारी 2024 – 20 विद्यार्थी
  500/– शुल्क
- **शिवणकाम प्रशिक्षण** 11 डिसेंबर 2023 ते 11 फेब्रुवारी 2024 – 15 विद्यार्थी
  1000/– शुल्क
- **मेंहदी प्रशिक्षण** 10 जानेवारी 2024 ते 25 जानेवारी 2024 – 14 विद्यार्थी
  500/– शुल्क
- **ब्युटी पार्लर प्रशिक्षण** 01 फेब्रुवारी 2024 ते 29 फेब्रुवारी 2024 – 20 विद्यार्थी
  500/– शुल्क
- **शिवणकाम प्रशिक्षण** 12 फेब्रुवारी 2024 ते 12 एप्रिल 2024 – 15 विद्यार्थी
  1000/– शुल्क
- **जिम प्रशिक्षण** 11 मार्च 2024 ते 11 एप्रिल 2024 – 09 विद्यार्थी
  500/– शुल्क

एकूण 93 विद्यार्थी

एक दिवसीय कार्यशाळा (ब्युटी टिप्स)

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक द्वारा संचालित Center for Outreach Programme तर्फे विविध कौशल्य प्रशिक्षणे देण्यात येतात. यापैकी ब्युटी पार्लर या प्रशिक्षणांर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे दिनांक 04.02.2024 रोजी रामटेक परिसरातील सर्व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेकरिता रु. 99/– प्रति विद्यार्थी इतके प्रवेश शुल्क आकारण्यात आले होते. या कार्यशाळेचा एकूण 53 मुली व महिलांनी लाभ घेतला. या कार्यशाळेत ब्युटी पार्लर चे प्रशिक्षण घेणाऱ्या व इतर ज्यांना ब्युटी टिप्स बद्दल जाणून घ्यावयाचे होते अशा सर्वांनी या कार्यशाळेत प्रवेश घेतला होता. ही कार्यशाळा रविवारला घेण्यात आली असल्यामुळे जास्तीत जास्त महिलांनी याचा लाभ घेतला. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. अनिल कुमार, संचालक Center for Outreach Programme विभाग यांनी केले याप्रसंगी संचालकांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, आमच्या विभागा मार्फत अनेक प्रशिक्षण अत्यंत अल्प दरात राबविले जातात. तरी रामटेक परिसरातील जास्तीत जास्त महिलांनी याचा लाभ घ्यावा व स्वतःला आत्मनिर्भर बनवावे.

प्रशिक्षण (Payable)

ब्युटी पार्लर प्रशिक्षण (देवलापार)

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक द्वारा संचालित Center for Outreach Programme तर्फे मा. कुलगुरु हरेराम त्रिपाठी यांच्या अध्यक्षतेखाली Center for Outreach Programme चे संचालक, डॉ अनिल कुमार यांनी कौशल्य विकास प्रशिक्षणातून महिलांना व मुलींना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवावे व त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा, या उद्देशाने अत्यल्प प्रवेश शुल्क घेऊन कौशल्य विकास प्रशिक्षण अंतर्गत. विद्यापीठापर्यंत येऊ न शकणाऱ्या आदिवासी परिसरातील विद्यार्थ्यांना देवलापार या रामटेक परिसरातील आदिवासी भागात जाऊन तेथील महिला व मुलींना ब्युटी पार्लर प्रशिक्षण देऊन त्यांना आत्मनिर्भर बनविले या प्रशिक्षणाकरिता मनसर येथील प्रशिक्षिका सौ. दिपाली वाघमारे यांना नियुक्त करण्यात आले होते. यांनी देवलापार येथे ब्युटी पार्लर प्रशिक्षणाची पहिली बॅच 10 मुलींची दिनांक 11.03.2024 ते 11.04.2024 पर्यंत व दुसरी बॅच 10 मुलींची दिनांक 12 04.2024 ते 12.05.2024 पर्यंत अशाप्रकारे एकूण 20 विद्यार्थ्यांना दोन बॅचेस मध्ये यशस्वीरित्या प्रशिक्षण दिले. या कार्यात मनिषा सहारे यांचे सहकार्य लाभले.

- **ब्युटी पार्लर पशिक्षण** 11 मार्च 2024 ते 11 एप्रिल 2024 10 विद्यार्थी 1000/– शुल्क
- **ब्युटी पार्लर प्रशिक्षण** 12 एप्रिल 2024 ते 12 मे 2024 10 विद्यार्थी 1000/– शुल्क

नृत्य प्रशिक्षण वर्गाचा समारोप समारंभ

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक द्वारा संचालित Center for Outreach Programme तर्फे विविध कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित केले जातात. यात नृत्य प्रशिक्षण वर्गाचे प्रशिक्षण दिनांक 25.04.2024 ते 25.06.2024 पर्यंत देण्यात आले होते या वर्गात एकूण 44 महिला व मुलींना प्रशिक्षण यशस्वीपणे देण्यात आले. तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ अनिल कुमार, संचालक Center for Outreach Programme यांनी केले. या नृत्य प्रशिक्षण वर्ग समारोप प्रसंगी अध्यक्षस्थानी प्रो. हरेराम `त्रिपाठी, उपस्थित होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगीतले Center for Outreach Programme तर्फे घेण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षणात रामटेक परिसरातील नागरिकांनी सहभागी होऊन आपले सहकार्य दयावे.

सारस्वत अतिथी श्रीमती डॉ. हर्षा आंबीलढुके या कार्यक्रमाला उपस्थित होत्या यांनी नृत्य हे आपल्या शरीराला कशाप्रकारे उपयोगी आहे हे पटवून दिले. विशेष अतिथी मा. प्रो मधुसूदन पेन्ना, अधिष्ठाता भारतीय धर्म तत्वज्ञान आणि संस्कृती विद्याशाखा, यांनी म्हटले की अशाप्रकारचे प्रशिक्षण देऊन Outreach Programme भावी पीढी घडवित आहे. विशिष्ट अतिथी मा. प्रो. कृष्णकृमार पांडेय सन्माननीय कुलसचिव, यांनी नृत्य सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे तसेच प्रशिक्षिका कु. प्रन्कीता राऊत यांची स्तुती केली. विशिष्ठ अतिथी मा. प्रो. हरेकृष्ण अगस्ती संचालक शैक्षणिक परिसर रामटेक, यांनी मुलांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला मा. प्रो. ललिता जोशी अधिष्ठाता, शिक्षणशास्त्र विभाग, मा. प्रो. कविता होले वित्त व लेखाधिकारी, मा. कलापिनी अगस्ती, विभाग प्रमुख दर्शनशास्त्र विभाग,

मा. प्रो. पराग जोशी विभाग प्रमुख आधुनिक भाषा विभाग, सर्व शिक्षकेत्तर अधिकारी, विभाग प्रमुख, कर्मचारी व रामटेक परिसरातील नागरिक उपस्थित होते. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अंकीत

मिश्रा यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्रप्रमुख संगणक विभाग डॉ. राजीवरंजन मिश्रा, आदित्य शुक्ला, पवन कळंबे, ब्रजेश सोमकुंवर, मनिषा सहारे यांचे सहकार्य लाभले.

संस्कृत संभाषन वर्ग

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक द्वारा संचालित Center for Outreach Programme विभागा अंतर्गत ''संस्कृत संभाषण'' वर्ग दिनांक 25.05.2024 ते 25.06.2024 पर्यंत घेण्यात आले होते या वर्गात 05 ते 15 वयोगटातील 25 मुला–मुलींना निःशुल्क ''संस्कृत संभाषण'' शिकविण्यात आले. या ''संस्कृत संभाषण'' वर्गाला शिकवियाचे कार्य प्रा. अंकीत मिश्रा व प्रा. श्रीवरदा माळगी यांनी यशस्वीरित्या पार पाडले.

* * *

भरतमुनी ललितकला केन्द्र

महिला, मुली व रामटेक परिसरातील इतर नागरिकांसाठी राबविण्यात आलेल्या कार्यक्रम व स्पर्धेचा तपशील

गायन, वादन वर्ग

एप्रिल २०२३ ते सप्टेंबर २०२३

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भरतमुनि ललित कला केंद्र विभागांतर्गत दर सहा महिन्यांनी गायन, वादन वर्गाची नवीन बॅच नियमित सुरु करण्यात येत असते. एप्रिल २०२३ ते सप्टेंबर २०२३ या काळात सहा महिन्यांची बॅच घेण्यात आली होती. या वर्गात एकूण १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदविला होता. या वर्गात गायन, तबला, हार्मोनियम शिकविले जाते. या वर्गाकरिता प्रति विद्यार्थी सहा महिन्यांचे २०००/— शुल्क घेतल्या जाते. या वर्गाला शिकविण्याचे कार्य श्री. विशाल चिमोटे यांनी केले होते. या वर्गाकरिता सर्व वयोगटातील विद्यार्थी येतात. या विद्यार्थ्यांची सहा महिने पूर्ण झाल्यावर परीक्षा घेण्यात येते व त्यानुसार त्यांना मार्क देऊन त्यांची श्रेणी ठरविल्या जाते.

गायन, वादन वर्ग

ऑक्टोंबर २०२३ ते एप्रिल २०२४

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भरतमुनि ललित कला केंद्र विभागांतर्गत दर सहा महिन्यांनी गायन, वादन वर्गाची नवीन बॅच नियमित सुरुयात येत असते. ऑक्टोंबर २०२३ ते एप्रिल २०२४ या काळात सहा महिन्यांची बॅच घेण्यात आली होती. या वर्गात एकूण ११ विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदविला होता. या वर्गात गायन, तबला, हार्मोनियम शिकविले जाते. या वर्गाकरिता प्रति विद्यार्थी सहा महिन्यांचे २०००/— शुल्क घेतल्या जाते. या वर्गाला शिकविण्याचे कार्य श्री विश्वनाथ दुंडे यांना या दिले होते. या वर्गाकरिता सर्व वयोगटातील विद्यार्थी येतात. या विद्यार्थ्यांची सहा महिने पूर्ण झाल्यावर परीक्षा घेण्यात येते व त्यानुसार त्यांना मार्क देऊन त्यांची श्रेणी ठरविल्या जाते.

“दहा दिवसीय संस्कृत संभाषण वर्ग”

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भरतमुनि ललित कला केंद्र, जनप्रभा कॉलेज तथा संस्कृतभारती, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृत महोत्सव २०२३ निमित्य दिनांक १७ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट २०२३ या काळात 'दहा दिवसीय संस्कृत संभाषण वर्ग' जनप्रभा कॉलेज, जनप्रभा संकुल, शैक्षणिक परिसर, रामटेक येथे घेण्यात आले होते. या कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी, मा. कृष्णकुमार पान्डेय, संचालक विस्तार सेवा मंडळ, मा. ललिता चंद्रात्रे समन्वयक भरतमुनि ललित कला केंद्र तसेच प्रा. सत्यजीत खताळ समन्वयक जनप्रभा कॉलेज हे उपस्थित होते.

“संस्कृत व शिक्षण द्वारा व्यक्तीमत्व विकास तथा अद्योजकता”

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भरतमुनि ललित कला केंद्र, जनप्रभा कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ ऑगस्ट २०२३ रोजी 'संस्कृत व शिक्षण द्वारा व्यक्तीमत्व विकास तथा अद्योजकता' कार्यक्रम जनप्रभा कॉलेज, जनप्रभा संकुल, शैक्षणिक परिसर, रामटेक येथे घेण्यात आले होते. या ऑनलाईन कार्यक्रमाचे अध्यक्ष कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी हे होते. या कार्यक्रमात मा. संचालक प्रो. कृष्णकुमार पान्डेय विस्तार सेवा मंडळ, व्याख्याते डॉ. विनय चंद्रात्रे, व्हायब्रंस कन्सल्टिंग पुणे, मा. ललिता चंद्रात्रे समन्वयक भरतमुनि ललित कला केंद्र तसेच प्रा. सत्यजीत खताळ समन्वयक जनप्रभा कॉलेज हे उपस्थित होते.

“संस्कृत श्लोक पठण स्पर्धा”

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भरतमुनि ललित कला केंद्र, जनप्रभा इंटरनॅशनल यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २६ ऑगस्ट २०२३ रोजी 'संस्कृत श्लोक पठण स्पर्धेचे आयोजन जनप्रभा इंटरनॅशनल येथे करण्यात

आले होते. या कार्यक्रम प्रसंगी संचालक भरतमुनि ललित कला केंद्र तसेच विद्याजागर फाऊन्डेशनच्या अध्यक्षा प्रो. ललिता चंद्रात्रे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. तर प्रमुख अतिथी म्हणून कुमारी मृणाल फडणवीस, जनप्रभा इंटरनॅशनलचे प्राचार्य सत्यजीत खताळ उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्वलाने झाली. या कार्यक्रम प्रसंगी जनप्रभा इंटरनॅशनल, आदर्श शाळा रामटेक, सी.बी.एस.ई स्कुल चारगाव, भवन्स स्कुल मौदा येथील विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत विजेते सहभागी यांना मान्यवरांचा हस्ते पारितोषिक देण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत शिक्षकही उपस्थित होते. अध्यक्षा जनप्रभा इंटरनॅशनल यांनी आपल्या मार्गदर्शक भाषणात विद्यार्थ्यांना आवाहन केले की, प्रत्येक स्पर्धेत सहभाग घ्यायला पाहिजे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सत्यजीत खताळ, आयोजन विद्या कोठाळे यांनी तसेच संचालन व आभार प्रदर्शन सुनिता शेन्डे यांनी केले.

* * *

महिला कक्ष आणि अंतर्गत तक्रार समिती

विश्वविद्यालयाच्या आयसीसी व महिला कक्षांतर्गत चालू शैक्षणिक वर्षात, ICC आणि महिला कक्षा अंतर्गत विविध स्तरांची अंमलबजावणी आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यासंबंधीच्या वार्षिक अहवालाचा तपशील खालीलप्रमाणे दिला आहे.

03 ऑक्टोबर 2023 रोजी ICC आणि महिला कक्षाने लैंगिक छळावरील महिला कायद्याच्या जागरूकता या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती, ज्याद्वारे विद्यार्थी आणि नोकरदार महिलांमध्ये लैंगिक छळावर महिला कायद्यांबद्दल जागरूकता निर्माण केली गेली. आयसीसी आणि महिला सेलच्या अध्यक्षा डॉ. राजश्री मेश्राम कार्यक्रमाच्या समन्वयक होत्या. या कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी व प्रमुख पाहुणे डॉ. इला. सुदामे नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी नागपूर हे उपस्थित होते. प्रो. कृष्णकुमार पांडे कुलसचिव, कॅम्पस डायरेक्टर, प्रो. अगस्ती, विभागाचे HoD शिक्षक, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी देखील उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन माधवी पाटील यांनी केले तर आभार सौ. कल्याणी देशकर यांनी मानले

दिनांक 12.03.2023 रोजी क.का.सं.वि. च्या ICC आणि महिला कक्षाने आयोजित केले. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या कार्यक्रमाची सुरुवात **मोफत आरोग्य तपासणी आणि नेत्र तपासणी शिबिराने** झाली. हा कार्यक्रम आयसीसी आणि महिला सेलच्या अध्यक्षा डॉ. राजश्री मेश्राम यांनी आयोजित केला होता आणि माननीय कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

या शिबिरात किमाया हॉस्पिटल्सच्या सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. गौरी पाठक यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात 200 विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नेत्र तपासले. या शिबिरात विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना मोफत चष्मे व आईडॉप देण्यात आले. आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

KKSUS ICC महिला सेल आणि योग आरोग्य विज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 14.03.2024 रोजी वर्णेकर सभागृहात **ऑफीस योगाचे** आयोजन माननीय कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. प्रो. हरेराम त्रिपाठी, कुलसचिव प्रो. कृष्णकुमार पांडे, वित्त अधिकारी (आय/सी) प्रो. कविता होले, प्रो. अगस्ती मॅडम डॉ. राजश्री मेश्राम आयसीसी व महिला कक्षाच्या अध्यक्षा तथा कार्यक्रम समन्वयक सौ.सुजाता द्राव्यकर यांच्या हस्ते कार्यालयीन योगासनांचे प्रात्यक्षिक करून कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक मार्गदर्शन करण्यात आले यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते व त्यांना कार्यालयीन योगाचा लाभ झाला. आसन व कार्यक्रम अशाप्रकारे यशस्वी झाला.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ चे ICC आणि महिला कक्षच्या वतीने दिनांक **26.02.2024** रोजी वर्णेकर सभागृह येथे **स्त्री परुष समानता** यावर कार्यशाळा आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात माननीय कुलुगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली, प्रमुख पाहुणे प्रो. मृणालिनी फडणवीस माजी कुलगुरू पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर सोलापूर विद्यापीठ, प्रो. हरेकृष्ण अगस्ती परिसर संचालक व डॉ. राजश्री मेश्राम कार्यक्रमाचे समन्वयक उपस्थित होते. या कार्यक्रमास शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आणि कार्यक्रम अशाप्रकारे यशस्वी झाला.

- **Workshop on Awareness of Women's Law and Sexual Harassment**
- **Program on Health Checkup and Eyes Checkup Camp**
- **Program on Office Yoga**
- **Workshop on Gender Equality**

*** * ***

सांख्यिकी विभाग

वार्षिक अहवाल २०२३–२०२४

- शैक्षणिक सत्र २०२३–२४ मध्ये प्रस्तुत विश्वविद्यालयात एकूण ३७१ संलग्नित महाविद्यालये आहेत.
- प्रस्तुत विश्वविद्यालय व त्याच्या सर्व संलग्नित/संचालित/पाठशाळा/RISS अंतर्गत महाविद्यालयात एकूण विद्यार्थी प्रवेश ७१,५२६ एवढे आहेत. त्यात प्रवर्गनिहाय खालीलप्रमाणे आहे.

एससी	–	१३,९०८
एसटी	–	६,९२३
एनटी	–	१०,१७१
ओबीसी	–	२१,६८९
एसबीसी	–	१३७४
एसईबीसी	–	२५२
ओपन	–	१७,२०९
एकूण विद्यार्थी संख्या –		**७१,५२६**

- विश्वविद्यालयाचे रामटेक शैक्षणिक परिसर, वारंगा परिसर व रत्नागिरी उपकेन्द्र येथील विद्यार्थी प्रवेशाची सांख्यिकीय माहिती खालीलप्रमाणे आहे.

पदव्युत्तर पदवी प्रवेशित विद्यार्थी	– २१९
पदवी प्रवेशित विद्यार्थी	– ४८२
पदव्युत्तर पदविका प्रवेशित विद्यार्थी	– ३६
पदविका प्रवेशित विद्यार्थी	– ५५
प्राकशास्त्री (अकरावी व बारावी समकक्ष)	– ३१
पीएचडी प्रवेशित विद्यार्थी	– २०
एकूण विद्यार्थी संख्या –	८४३

- प्रस्तुत विश्वविद्यालयाची २०२२–२०२३ या वर्षाची माहिती AISHE Portal वर भरण्यात आली तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांकडून २०२२–२०२३ या वर्षाची माहिती AISHE Portal वर माहिती भरून घेण्यात आली.
- प्रस्तुत विश्वविद्यालयाची २०२२–२०२३ या वर्षाची माहिती DHEMIS Portal वर भरण्यात आली तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांकडून २०२२–२०२३ या वर्षाची माहिती DHEMIS Portal वर माहिती भरून घेण्यात आली.
- प्रस्तुत विश्वविद्यालयाने २०२३–२०२४ NIRF Ranking मध्ये सहभाग घेतला.
- विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन यांच्याद्वारे मागितलेली माहीती वेळोवेळी पुरविण्यात आली

* * *

आस्थापना विभाग

वार्षीक अहवाल २०२३–२४ करीता आस्थापना विभागाची माहिती

महाराष्ट्र शासनाद्वारे अधिनियम क्र. ३३–१९९७ अन्वये प्रस्तुत विश्वविद्यालयाची स्थापना दि. १८ सप्टेंबर १९९७ रोजी झाली. शासनाने प्रस्तुत विश्वविद्यालयातील पाच शैक्षणिक विभागांकरिता एकूण ३५ शिक्षकीय पदे आकृतीबंधानुसार मंजूर केली आहेत. त्याचप्रमाणे ११४ शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध मंजूर केला आहे. पदांचा तपशील खालीलप्रमाणे –

शासनमान्य शिक्षकीय पदे

अ.क्र.	पदनाम	मंजुर पदसंख्या	भरलेली पदे	रिक्त पदे
१	प्राध्यापक	०५	०३	०२
२	सहयोगी प्राध्यापक	१०	०५	०५
३	सहायक प्राध्यापक	२०	८	१२
	एकूण	**३५**	**१६**	**१९**

शासनमान्य शिक्षकेतर पदे

अ.क्र.	संवर्ग	मंजुर पदसंख्या	भरलेली पदे	रिक्त पदे
१	अ	२२	१३	०९
२	ब	१०	०५	०५
३	क	५०	३७	१३
४	ड	३२	२१	११
	एकूण	**११४**	**७६**	**३८**

विश्वविद्यालय व्यवस्थापनाने निर्मित केलेली शिक्षकीय पदे शास्त्रविद्यागुरूकुलम् करिता

मंजुर पदसंख्या	भरलेली पदे	रिक्त पदे
०९	०६	०३

विश्वविद्यालय व्यवस्थापनाने निर्मित केलेली शिक्षकेतर पदे

मंजुर पदसंख्या	भरलेली पदे	रिक्त पदे
०२	०२	००

शिक्षकांची यादी २०२३–२४

अ. क्र.	नाव	पदनाम
१	डॉ. मधुसूदन न. पेन्ना	प्राध्यापक (धारणाधिकर)
२	डॉ. ललिता प्र. चंद्रात्रे	प्राध्यापक
३	डॉ. सी. जी. विजयकुमार	प्राध्यापक (धारणाधिकर)
४	डॉ. कृष्णकुमार सु. पाण्डेय	प्राध्यापक
५	डॉ. कविता सु. होले	प्राध्यापक
६	डॉ. कलापिनी ह. अगस्ती	प्राध्यापक
७	डॉ. प्रसाद श्री. गोखले	प्राध्यापक
८	डॉ. पराग भा. जोशी	प्राध्यापक
९	डॉ. किर्ती भ. सदार	प्राध्यापक
१०	डॉ. हरेकृष्ण शा. अगस्ती	प्राध्यापक
११	डॉ. दिनकर वि. मराठे	सहयोगी प्राध्यापक
१२	डॉ. अमोल म. मांडेकर	सहयोगी प्राध्यापक
१३	डॉ. राजश्री पू. मेश्राम	सहयोगी प्राध्यापक
१४	डॉ. हृषिकेश स. दलाई	सहयोगी प्राध्यापक
१५	डॉ. राजेंद्र चि. जैन	सहायक प्राध्यापक
१६	डॉ. जयवंत ज. चौधरी	सहायक प्राध्यापक

शास्त्रविद्यागुरूकुलम् शिक्षकांची यादी २०२३–२४

अ. क्र.	नाव	पदनाम
१	डॉ. आशीश जे.	सहायक प्राध्यापक
२	डॉ. अमितकुमार भार्गव	सहायक प्राध्यापक
३	डॉ. श्वेता शर्मा	सहायक प्राध्यापक
४	डॉ. राघवेंद्र भट्ट	सहायक प्राध्यापक
५	श्री. सचिन व्दिवेदी	सहायक प्राध्यापक
६	श्री. निशांत मिश्र	सहायक प्राध्यापक

शिक्षकेतर कर्मचा–यांची यादी २०२३–२४

अ.क्र.	नाव	पदनाम
१	प्रा. हरेराम त्रिपाठी	मा. कुलगुरू
२	डॉ. देवानन्द शुक्ल	मा. कुलसचिव
३	डॉ. दिपक ग. कापडे	ग्रंथपाल
४	डॉ. केशव श्री. मोहरीर	परीक्षा नियंत्रक
५	डॉ. कविता सु. होले	वित्त व लेखा अधिकारी (प्र.)
६	डॉ. स्मिता म. फडणवीस	उपकुलसचिव
७	डॉ. रोशन भा. अलोने	उपकुलसचिव
८	श्री. विजयेंद्र वि. पांड	उपकुलसचिव
९	श्री. सुमित म. कठाळे	सहायक कुलसचिव
१०	श्री. राजेंद्र धा. मेश्राम	सहायक कुलसचिव
११	सौ. कल्याणी कि. देशकर	सहायक कुलसचिव

अ.क्र.	नाव	पदनाम
१२	श्री. श्रीपाद म. अभ्यंकर	सहायक कुलसचिव
१३	श्री. संतोष कि. वाडीकर	उपअभियंता
१४	श्री. राजेश स. चकिनारपुवार	स्वीय सहायक
१५	सौ. माधुरी र. येवले	अधीक्षक
१६	श्री. अतुल ज. गाडे	अधीक्षक
१७	श्री. लोभाजी भा. सावंत	अधीक्षक
१८	सौ. रीता ग. अमीन	अधीक्षक
१९	डॉ. रेणुका श. बोकारे	जनसंपर्क अधिकारी
२०	श्री. राजेश न. भांडारकर	उच्चश्रेणी लघुलेखक
२१	श्री. नरेंद्र न. रहाटे	सहायक अधीक्षक
२२	श्री. अविनाश ज्ञा. फुसाटे	सहायक अधीक्षक
२३	श्री. सौरभ र. बाजपेई	सहायक अधीक्षक
२४	सौ. जान्हवी सु. देऊळगांवकर	सहायक अधीक्षक
२५	श्री. विजय मा. जामनकर	लेखापाल
२६	श्री. राजीवरंजन दे. मिश्रा	तांत्रिक सहायक
२७	श्री. प्रवीण ह. कळंबे	सुरक्षा अधिकारी
२८	श्री. अरविंद ता. कुचनकर	वरिष्ठ लिपिक
२९	श्री. धर्मेश अ. शुक्ला	वरिष्ठ लिपिक
३०	श्री. उमेशरा. पाटील	वरिष्ठ लिपिक
३१	श्री. अतुल न. खोडे	वरिष्ठ लिपिक
३२	श्री. योगेश बा. चौधरी	वरिष्ठ लिपिक
३३	श्री. कृणाल नं. कविश्वर	वरिष्ठ लिपिक
३४	श्री. धर्मेंद्र वि. भिडे	वरिष्ठ लिपिक
३५	श्री. निलेश गो. राठोड	वरिष्ठ लिपिक
३६	श्री. विनोद वि. बागडे	वरिष्ठ लिपिक
३७	श्री. नेमीचंद ता. मेश्राम	वरिष्ठ लिपिक
३८	श्री. महेश अ. येयेवार	वरिष्ठ लिपिक
३९	श्री. अनिल र. तिवारी	वरिष्ठ लिपिक
४०	श्री. नंदकिशोर धा. मेश्राम	वरिष्ठ लिपिक
४१	कु. मीना व्यं. पुजारी	वरिष्ठ लिपिक
४२	कु. प्रगती ज. ढेपे	ग्रंथालय सहायक
४३	कु. मिनाक्षी डो. मेश्राम	ग्रंथालय सहायक
४४	श्री. चेतन वा. पेलने	कनिष्ठ लिपिक
४५	सौ. नंदिनी म. बंड	कनिष्ठ लिपिक
४६	श्री. मंगेश कृ. आटे	कनिष्ठ लिपिक
४७	श्री. प्रविण कुमार सु. सरोदे	कनिष्ठ लिपिक
४८	सौ. प्रिती चं. लाडसे	कनिष्ठ लिपिक
४९	श्री. ललितकुमार रा. धुर्वे	कनिष्ठ लिपिक
५०	श्री. सुनिल ल. बावने	कनिष्ठ लिपिक
५१	श्री. रूपेश टि. मेश्राम	कनिष्ठ लिपिक
५२	श्री. दिपक चं. जोंधळे	कनिष्ठ लिपिक
५३	श्री. जावेद र. तुरक	कनिष्ठ लिपिक

अ.क्र.	नाव	पदनाम
५४	श्रीमती रजनी रितेश मेश्राम	कनिष्ठ लिपिक
५५	श्री. मुकेश ध. शहारे	ग्रंथालय परिचर
५६	श्री. पुरूषोत्तम प्र. कावळे	ग्रंथालय परिचर
५७	श्री. शैलेश शं. गेडाम	दप्तरी
५८	श्री. अजित मो. पांडे	दप्तरी
५९	श्री. दिलीप ना. राऊत	दप्तरी
६०	श्री. पुरूषोत्तम न. वझे	तारमार्गतंत्री व तारतंत्री
६१	श्री. सुशिल पां. वैद्य	चक्रमुद्रक
६२	श्री. राजेश रा. दारोडे	शिपाई
६३	श्री. शामसूंदर सा. डोबळे	शिपाई
६४	श्री. अविनाश नि. भैसारे	शिपाई
६५	श्री. पंकज र. पेठकर	शिपाई
६६	श्री. तात्याराव रा. वाघमारे	शिपाई
६७	श्री. हनुमंत अं. सिडाम	शिपाई
६८	कु. छाया शं. मसारकर	शिपाई
६९	कु. प्रणाली अ. ठाकरे	शिपाई
७०	सौ. मंजुषा प्र. कुकडे	शिपाई
७१	कु. सुरेखा वा. तिजारे	शिपाई
७२	श्री. रोशन पु. कुनघाटकर	शिपाई
७३	सौ. नलिनी सं. इंगळे	शिपाई
७४	श्री. ज्ञानेश्वर साबळे	शिपाई
७५	श्रीमती पुजा अ. राठोड	शिपाई
७६	श्री. अशोक हटवार	पहारेकरी
७७	श्री. अमित पां. वैद्य	माळी
७८	श्री. पवन कळंबे	अर्धकुशल तंत्रज्ञ (कंत्राटी)
७९	श्री. आदित्य शुक्ला	प्रयोगशाळा परिचर (कंत्राटी)

* * *

सामान्य प्रशासन विभाग

➢ **कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय कायदा, १९९७ कलम २५(२) अन्वये व्यवस्थापन परिषदेचे गठण करण्यात आले. सत्र २०२३–२०२४ मध्ये मा. व्यवस्थापन परिषदेच्या सभेच्या एकूण ३ सभा आयोजित करण्यात आल्या होत्या व त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

अ. क्र	दिनांक	नियमित/ आकस्मिक
०१	०९/०२/२०२४	नियमित
०२	१५/०९/२०२४	नियमित
०३	०६/०३/२०२४	नियमित

➢ **कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक विद्यापीठ कायदा १९९७ कलम २५(२) अन्वये २०२३–२०२४**
सत्रामध्ये मा. व्यवस्थापन परिषदेतील सदस्यांची यादी

मा. व्यवस्थापन परिषदेतील (२०२३–२०२४)

क्र.	कलम	विवरण	समिती सदस्यांचे नाव	पदनाम
1	**25(2)(i)**	कुलगुरू – सभापति (पदसिद्ध)	**प्रो. हरेराम त्रिपाठी** मा.कुलगुरु,क.का.सं.व, रामटेक	अध्यक्ष
2	**25(2)(ii)**	समकुलगुरू – सदस्य (पदसिद्ध)	**रिक्त**	सदस्य
3	**25(2)(iii)**	परिनियमांद्वारे विहित केलेला एक अधिष्ठाता	**प्रा. कविता होले** संस्कृत साहित्य विभाग, क. का.सं.वि, रामटेक	सदस्य
4	**25(2)(iv)**	महाराष्ट्र शासनाच्या संस्कृत स्थायी समितीमधील, कुलाधिपतीने अग्रक्रमाने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती	**प्रो. अम्बा कुलकर्णी** संस्कृत अध्ययन विभाग हैद्राबाद विद्यापीठ, हैद्राबाद	सदस्य
5	**25(2)(v)**	महाराष्ट्र विधानसभेच्या सभापतीने नामनिर्देशित करावयाचा महाराष्ट्र विधानसभेचा एक सदस्य	**मा. समीर मेघे** विधानसभा सदस्य	सदस्य
6	**25(2)(vi)**	महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अध्यक्षाने नामनिर्देशित करावयाचा विधानपरिषदेचा एक सदस्य	**मा. श्री. सुधाकर अडबाले** विधानपरिषद सदस्य,नागपूर	सदस्य
7	**25(2)(vii)**	सचिव, उच्च शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली, उपसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती (पदसिद्ध)	**प्रधान सचिव** उच्च व शिक्षण विभाग, मंत्रालय	सदस्य
8	**25(2)(viii)**	संचालक, उच्च शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची	**मा. संचालक,** उच्च व शिक्षण विभाग, पूणे	सदस्य

क्र.	कलम	विवरण	समिती सदस्यांचे नाव	पदनाम
		नसलेली व्यक्ती (पदसिद्ध)		
9	**25(2)(ix)**	परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे विद्यापीठ विभागाचा प्रमुख	**प्रा. पराग जोशी** क.का.सं.वि, रामटेक	सदस्य
10	**25(2)(x)**	परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे महाविद्यालय, परिसंस्था किंवा पाठशालेचा एक प्रमुख	**डॉ. भाऊ दांदडे** प्राचार्य, सीस्फा कॉलेज ऑफ फाईन आर्ट, नागपूर	सदस्य
11	**25(2)(xi)**	परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे, विद्यापीठ विभागामधील एक अध्यापक	**प्रा. ललिता जोशी** संस्कृत भाषा आणि साहित्य विभाग, क.का.सं.वि, रामटेक	सदस्य
12	**25(2)(xii)**	परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे, संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापकांमधून दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असलेला, व जो मुख्याध्यापक नाही असा एक अध्यापक	**रिक्त**	सदस्य
13	**25(2)(xiii)**	परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे अध्ययन मंडळाचा एक अध्यक्ष	**प्रा. दिनकर मराठे** अधिष्ठाता, प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्र, क. का.सं.वि, रामटेक	सदस्य
14	**25(2)(xiv)**	कुलगुरूने नामनिर्देशित केलेला, विद्वत् परिषदेचा एक सदस्य	**प्रा. मधुसुदन पेन्ना** अधिष्ठाता, भारतीय धर्मतत्वज्ञान तथा संस्कृती संकाय, क.का.सं.वि. रामटेक	सदस्य
15	**25(2)(xv)**	संचालक, नियोजन विकास मंडळ (पदसिद्ध)	**प्रा. प्रसाद गोखले,** संचालक, नि.वि.मं/ प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्र संकाय, क.का.सं.वि. रामटेक	पदसिध्द सदस्य
16	**25(3)**	कुलसचिव – सचिव (पदसिद्ध)	**प्रा. कृष्णकुमार पाण्डेय** कुलसचिव (प्र) क.का.सं.वि, रामटेक	पदसिध्द सदस्य
17	**25(4)**	वित्त व लेखा अधिकारी – स्थायी निमंत्रित	**प्रा. कविता होले** वित्त व लेखा अधिकारी, क.का.सं.वि, रामटेक	स्थायी निमंत्रित
18	**25(4)**	परीक्षा नियंत्रक – स्थायी निमंत्रित	**डॉ. जयवंत चौधरी** परीक्षा नियंत्रक क.का.सं.वि, रामटेक	स्थायी निमंत्रित

*** * ***

नियोजन व विकास मंडळ

—: वार्षिक अहवाल सत्र २०२३—२४ :—

१. सत्र २०२३—२४ मध्ये नियोजन व विकास मंडळ विभागात कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती.

Sr.no.	Name	Post
1	Prof. Prasad Gokhale	Director
2	Smt. Kalyani Deshkar	Assistant Registrar
3	Shri. Atul Khode	Senior Clerk
4	Shri. Nandkishor Meshram	Senior Clerk
5	Ku. Aishwarya Ashtankar	MTS Clerk
6	Shri. Sagar Wahane	MTS Clerk
7	Shri. Pankaj Pethakar	Peon

२. विद्यापीठाच्या उपलब्ध तरतुदीनुसार गठीत नियोजन व विकास मंडळ समितीच्या सदस्यांची यादी —

Sr. No.		Members Name	Position
1	Kulaguru-Adhyaksha	**Prof. Hareram Tripathi,** Hon'ble Vice-Chancellor.	Chairperson
2	Sama-Kulaguru if any (The Pro-Kulaguru)	----	Member
3	One Dean of Faculty, nominated by the Vidvat Parishad	**Dr. Madhusudan Penna,** Dean, Faculty of Bharatiya Dharma, Tattvajanana tatha Sanskrit Sankay, KKSU, Ramtek	Member
4	One Head or Director from amongst the Heads or Directors of the University Institutions or departments, not below the rank of Professor and who is not a Dean nominated by Vidvat Parishad.	**Dr. Dinakar Marathe,** HoD, Vedanga Jyotisha Department, KKSU, Ramtek.	Member
5	One teacher imparting post-graduate instruction having not less than sixteen years of teaching experience, nominated by Kulaguru.	**Dr. Kavita Holey,** Professor, Faculty of Sanskrit and other Languages, KKSU, Ramtek.	Member
6	One teacher imparting under-graduate institution having not less than sixteen year of teaching experience, nominated by Vyavasthapana Parishad.	**Dr. Parag Joshi,** HoD, Department of Adhunik Bhasha, KKSU, Ramtek.	Member
7	One principal of an affiliated College of Sanskrit, nominated by the Vyavasthapana Parishad from among the principal who are members of the Vidvat Parishad.	**Dr. Rajashri Meshram,** Principal, Kalidas University's B.Ed. College, Ramtek.	Member
8	One principal of an affiliated professional College nominated by Kulaguru.	**Dr. Sandhya Purecha,** Principal, Sarfojiraje Bhosale Research Centre, Dadar, Mumbai.	Member
9	Two experts, co-opted by the Board from amongst the Heads of National and State Level research institutions.	**Dr. C. G. Vijayakumar,** Vice-chancellor, Maharshi Panini Sanskrit Evam Vaidik University, Ujjain.	Member
10		**Dr. Sacchidanand Mishra ,** Member, ICPR, New Delhi.	Member

11	Sanchalaka of Niyojana-Vikasa Mandala-Member Secretary.	**Dr. Prasad Gokhale,** Director (I/c), B.P.D., Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek.	Member Secretary

३. शैक्षणिक सत्र २०२३–२४ करिता एकूण ६४ महाविद्यालयांना विशेषीकृत अभ्यासासाठी मान्यताप्राप्त परिसंस्था (RISS) अंतर्गत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

४. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय कायदा क्र. ३३/१९९७ मधील कलम ६२ (५) अन्वये प्राप्त एकूण ५४ नवीन महाविद्यालयांना शैक्षणिक सत्र २०२३–२४ पासून संलग्नीकरण प्राप्त झाले आहे.

५. विश्वविद्यालयात विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांसोबत शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आले व या कराराचे क्रियान्वयन करण्यासाठी समन्वयकांची नेमनूक करण्यात आली.

1	Nepal Sanskrit University Dang Nepal	Dr Prasad Gokhale	31-10-2023 3 Year
2	Techno spectra Edtech pvt ltd Nagpur	Shri Vijayendra Pande	08-11-2023 3Year
3	Smt. Manoramabai Mundle College of Architeture Nagpur	-------	23-02-2023 3Year
4	Dr Rammanohar Lohia Awadh University Ayodhya	Dr Anilkumar Dubey	05-02-2024
5	Indian Society for Buddist Studies,Gole market Gandhi Nagar Jammu	Dr Prasad Gokhale	10-02-2024 1 Year
6	MIDC Ratnagiri	-------	21-02-2024 3 Year
7	Chaitnya Bharti Institute of Technology Osmansagar road Gandipet Hyderabad 500075	DR Rajendra Jain	26-04-2024 3 Year

६. राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियान RUSA 2.0 Closure Report सोबत जोडला आहे.

७. अष्टादशी प्रोजेक्ट.

Sr No	Name of the Project Title	Name of the Investigator	Sanction Grant In Aid, Rs	Sanction Grant Released Rs
1	Two Day National Seminar on Mass Communication & Sanskrit Journalism in the light od Indian Knowledge Syatem (IKS)	Dr. Renuka S.Bokare	1,00,000	Not yet Received
		Total	1,00,000	

८. शैक्षणिक सत्र २०२३–२४ करिता एकूण ५ महाविद्यालयांना Recognized Institute for Skill & Professional Education (RISPE) अंतर्गत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

